# अभिव्यक्ती



अडत व्यापारी शिक्षणसंस्थेच्या

देगलूर महाविद्यालय, देगलूर चे वार्षिक प्रकाशन अंक – सहावा-वर्ष सहावे १९७२-७३

S. PARAGON

# देगलूर महाविद्यालयाचे

## – प्राध्यापक –

श्री. हेमचंद्र धर्माधिकारी ( प्राचार्य व तत्त्वज्ञान विभाग प्रमुख )
,, रवीन्द्र मनोहर
,, सत्यनारायण जाजू ( उप-प्राचार्य व हिन्दी विभाग प्रमुख )
,, हरिकिशन राठौर
,, लक्ष्मीकांत तांबोळी ( मराठी विभाग प्रमुख )
,, सुग्राम पुल्ले
,, पुरुषोत्तम् देशमुख ( इंग्रजी विभाग प्रमुख )
,, पंढरीनाथ लांडगे
,, श्रीराम करडखेडकर
,, रवीन्द्र कुळकर्णी ( राज्यशास्त्र विभाग प्रमुख )
,, लक्ष्मीकांत कुलकर्णी
,, रामविलास बाहेती ( अर्थशास्त्र विभाग प्रमुख )
,, रामचंद्र धोंगडे
,, दत्तप्रसन्न साठे ( इतिहास विभाग प्रमुख )
,, गंगाधर कल्याणपाड
,, मनोहर सोनटक्के ( वाणिज्य विभाग प्रमुख )
,, प्रभाकर डुब्बेवार
,, माधवराव कुलकर्णी ( गणित विभाग प्रमुख )
,, विनायक कठाळे
,, एकनाथ विसपुते ( रसायनशास्त्र विभाग प्रमुख )
,, लक्ष्मीकांत करडखेडकर
,, रघुकृष्ण शेटये ( वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख )
,, एम्. बाबू
,, शंकर देशमुख ( प्राणीशास्त्र विभाग प्रमुख )
,, व्यंकटेश जोशी
,, नारायण कुळकर्णी ( पदार्थ विज्ञान प्रमुख )
,, विश्वनाथ येरमुने
,, जी. के. मांजरमकर ( क्रीडा विभाग )

अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे

## देगलूर महाविद्यालय, देगलूर

# अभिव्यक्ती

वार्षिक : वर्ष सहावे : अंक सहावा

१९७२–७३

अभिव्यक्ती
वर्ष १९७२–७३
अंक ६ वा

•

संस्थापक व प्रकाशक : प्राचार्य हेमचंद्र धर्माधिकारी

•

कार्यकारी संपादक : प्रा. लक्ष्मीकांत तांबोळी

•

विभागीय संपादक :

श्री. गंगाधर जोशी ( मराठी ) प्रा. लक्ष्मीकांत तांबोळी

श्री. रेणगुंटवार ( हिन्दी ) प्रा. हरिकिशन राठौर

•

मुद्रक : टायपोग्राफीका प्रेस सर्व्हिसेस, २१८१ सदाशिव पेठ पुणे ३०.

•

या अंकातील मतांशी व विचारांशी संपादक वा महाविद्यालय सहमत असेलच असे नाही. अंकातील लेखनाची संपूर्ण जबाबदारी संबंधीत लेखकांची आहे.

संपादकीय

# ही एक माणूसकीची ओळखण

आज महाराष्ट्राचे मन दुष्काळाने पार होरपळून निघाले आहे. त्या संकटाच्या सावटाखाली उमेद झांकळून गेली आहे. अशा बिकट परिस्थितीत जिवंत राहण्यासाठी लागते जिद्द. ही जिद्दच दैनंदिन व्यवहार चालू ठेवते. दैनंदिन व्यवहार थांबवून हतबल होण्यात पुरुषार्थ तो कोणता? म्हणूनच आम्ही हा अंक प्रकाशित करीत आहोत. सर्व आघाड्यावर आज आपण दुष्काळाशी सामना देत आहोत. आम्हीही मागे नाहीत. महाराष्ट्रातील हजारो दुष्काळग्रस्त लोकांच्या पाठीशी आपण आपले सामर्थ्य उभे केले पाहिजे. जे लोक प्रत्यक्ष दुष्काळग्रस्त आहेत, तरीही दुर्दम्य निष्ठेने, या संकटाशी झुंज देत आहेत, त्या सर्वांविषयी सहानूभूती म्हणून आम्ही हा अंक त्यांनाच समर्पित करीत आहोत. सर्व काही नाहीसे झाले तरी चालेल परंतु माणुसकी नाहीशी होऊ नये. आमच्या माणुसकीची हीच ओळखण !

## राष्ट्रीय एकात्मतेची प्रतिज्ञा

भारताचा निष्ठावंत नागरिक या नात्याने, मी सर्व प्रकारचे मतभेद शांततेच्या मार्गाने मिटविले जावेत या सुसंस्कृत समाजाच्या सर्वमान्य तत्त्वावर माझी दृढश्रद्धा व्यक्त करतो; आणि लोकांमधील भावनिक एकात्मतेची निकड लक्षात घेऊन धार्मिक, भाषिक, प्रादेशिक अथवा अन्य सार्वजनिक विषयांबाबतच्या कोणत्याही विवादामध्ये हिंसात्मक मार्गांचा कधीही अवलंब करणार नाही अशी प्रतिज्ञा करतो.

महाविद्यालयास भेट —



आमदार श्रीमती मृणाल गोरे भाषण करीत असताना



प्राचार्य धर्माधिकारी भाषण करीत असताना

# देगलूर महाविद्यालय
# कार्यवृत्तांत १९७२-७३

### प्रास्ताविक

१९६३ साली प्रारंभ झालेल्या आमच्या महाविद्यालयाची वाटचाल सतत प्रगतीच्या कक्षा वाढवीतच सुरू आहे. निकालाच्या वाढत्या आलेखाबरोबरच शिक्षण आणि समाजजीवन यातील अंतर दूर करण्याचा प्रयत्न म्हणून आम्ही करीत असलेल्या उपक्रमांचा आलेखही असाच वाढता आहे. खालील माहिती आपणांस याची ओळख करून देऊ शकेल.

### विद्यार्थी संसद

दरवर्षी प्रमाणे यंदाही (१९७२–७३ सालासाठी) विद्यार्थी संसदेच्या विविध पदाधिकाऱ्यांच्या निवडणुका शांततेने खेळीमेळीच्या वातावरणात पार पडल्या. विद्यार्थी संसदेचे उद्घाटन समाजवादी थोर नेत्या व आमदार मृणाल गोरे यांच्या हस्ते झाले. विशेष म्हणजे यावर्षी विद्यार्थी संसदेचे अध्यक्ष श्री. सुरेश तोटावार यांची मराठवाडा विद्यापीठाच्या स्टूडन्टस् वेलफेअर कॉन्सीलवर ' सदस्य म्हणून निवड झाली. तसेच ' मराठावाडा विद्यापीठ स्टूडन्टस् असोसिएशन वर विद्यार्थी संसदेचे चिटणीस श्री. नीळकंठ पाटील हे सदस्य म्हणून निवडून आले.

विद्यार्थी संसदेने या वर्षी अनेक महत्वाची कामे केली विद्यापीठाच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन ह्या वर्षी संसदेनें स्नेहसंमेलन व इतर खर्चीकबाबी रद्द करून दुष्काळग्रत व गरीब विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी या रकमेचा उपयोग करण्यात आला. विद्यार्थी संसदेने स्वयंस्फूर्तपणे देगलूर. शहरात ' देगलूर महाविद्यालय ' कलापथकाचा कार्यक्रम घेऊन जवळ जवळ २००० रु. चा निधी जमविला या शिवाय दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांना मदत म्हणून देगलूर शहरातील व्यापारी व नागरिक यांच्याकडून जवळ जवळ ५०० रुपये देणगीच्या स्वरूपात गोळा केले. दुष्काळपीडित विद्यार्थ्यांना विद्यार्थी संसदेच्या ह्या कार्यामुळे बहुमोल आर्थिक साहाय्य झाले.

— श्री. प्रा. सोनटक्के
— श्री. सुरेश तोटावार (अध्यक्ष)
— श्री. नीलकंठ पाटील (चिटणीस)

### मराठी वाङ्मय मंडळ

१ मराठी वाङ्मय मंडळाच्यावतीने खाडिलकर जन्मशताब्दी मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून शिवाजी कॉलेज (परभणी) चे प्राचार्य रामदास डांगे यांचे ' खाडिलकर जीवन व कार्य ' विषयावर व्याख्यान झाले.

२ मराठीतील सुप्रसिद्ध कवी ' सादरकर्ते राम पिंगळीकर यांचे प्राचिन मराठी कवितेतील अंत:प्रवाह व प्रेरणा या विषयावर व्यासंगपूर्ण व्याख्यान झाले.

३ मंडळाच्या वतीने अभिव्यक्ती संपादकत्वासाठी एक निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

प्रा. सुग्राम पुल्ले

**हिन्दी विभाग**

हिंदीविभागातर्फे यावर्षी खालील कार्यक्रम घेण्यात आले.

१४ सप्टेंबर ' हिंदी दिना ' निमित्त निबंध वाचनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या प्रसंगी सर्वस्वी देशमुख, कुरें, वाघमोडे, कुलकर्णी या विद्यार्थ्यांनीं ' मेरा प्रिय कवि ' या विषयावर अनुक्रमे महाकवि तुलसीदास, सूरदास, कबीर, बिहारी व बच्चन यांच्या काव्यांचा अभ्यासपूर्ण परिचय करुन दिला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान हिंदी विभाग प्रमुख प्रा. जाजू यांनी भूषविले.

हिंदी भाषेचे सुप्रसिद्ध नाटककार श्री. मोहन राकेश यांच्या आकस्मित निधनानिमित्त श्रद्धांजली अर्पित करण्यासाठी एक शोक सभा घेण्यात आली. मराठवाडा विद्यापीठाचे माजी विभागाध्यक्ष डॉ. तेलंग यांनी या प्रसंगी स्व. मोहन राकेश यांच्या नाटकाचा थोडक्यात परामर्ष घेतला.

नांदेड येथील पीपल्स कॉलेज चें हिंदी विभाग प्रमुख प्रा. श्री. बा. ह. जोशी यांनी ' हिन्दी के पौराणिक नाटक ' या विषयावर उद्‌बोधक व्याख्यान दिले.

' अभिव्यक्ति ' वार्षिकाच्या हिंदी विभागासाठी संपादकाच्या निवडीसाठी एक निबंधस्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत गुणानुक्रमे प्रथम आलेले विद्यार्थी श्री. रमेश रेणगुटकर यांचीं संपादक पदी निवड झाली.

प्रा. हरिकिसन राठौर

**इंग्रजी विभाग**

विद्यार्थ्यींच्या सततच्या आग्रहामुळे १९७२–७३ या शैक्षणिक वर्षापासून महाविद्यालयात इंग्रजी वाङ्मय हा ऐच्छिक विषय Puc व I yr. BA पासून सुरू केला आहे. गेली काही वर्षे महाविद्यालयात हा विषय शिकवला जात नव्हता.

' अभिव्यक्ती ' च्या इंग्रजी विषयाचा संपादक विद्यार्थ्यांतून निवडण्यासाठी एक निबंधस्पर्धा ठेवण्यात आली होती. त्या स्पर्धेत श्री. सौदागर ( B. Sc., I.) हे संपादक म्हणून निवडले गेले. त्यांचे अभिनंदन.

प्रा. पुरुषोत्तम देशमुख

**ग्रंथालय**

**१ ) ग्रंथालयाच्या कामकाजाची वेळ :–**

वृत्तांत वर्षी ग्रंथालय एकूण २५५ दिवस खुले राहिले. ग्रंथालयाचा वाचन विभाग १२० दिवस खुला ठेवण्यात आला. विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी डिसेंबर ७२ ते फेब्रुवारी ७३ पर्यंत रविवार व सार्वजनिक सुट्टी व्यतिरिक्त वाचन विभाग खुला ठेवण्यात आला.

वाचन विभाग खुला राहण्याच्या वेळा खालील-प्रमाणें होत्या

जुलै ७२ ते ऑक्टोबर ७२ सोमवार ते शनिवार सकाळी १० ते सायं. ४ पर्यंत.

डिसेंबर ७२ ते फेब्रुवारी ७३ सोमवार ते शनिवार सकाळी ८ ते सायं १० पर्यंत

**२ ) ग्रंथाची वाढ :–**

| पूर्वीची संख्या | | यंदाची वाढ | | एकूण ग्रंथ संख्या |
|---|---|---|---|---|
| १४२८५ | + | २४३८ | = | १६,७२३ |

**३ ) नियतकालिके :–**

ग्रंथालयात येणाऱ्या एकूण नियतकालिकाची संख्या १२५ असून त्यापैकी १२० नियतकालिकांची वर्गणी भरण्यांत येते. व पाच नियतकालिके विनामूल्य येतात.

| | |
|---|---|
| पूर्वीच्या नियतकालिकाची संख्या | १२५ |
| यंदाची वाढ | १० |
| एकूण नियतकालिके | १३५ |

यंदाचे वर्षात १० नियतकालिकांची वाढ झाली आहे.

४ ) देवघेव विभाग :–

यंदाचे वर्षातील वाचकांची संख्या ६५५

| | |
|---|---|
| १ ) विद्यार्थी | ५८५ |
| २ ) प्राध्यापक | ३० |
| ३ ) कर्मचारी | २० |
| ४ ) नविन सभासद | १५ |
| २ ) इतर | ०५ |
| | ६५५ |

वृत्तांत वर्षात वाचली गेलेली पुस्तक संख्या ४३४५

**बाइंडिंग**

जुन्या पुस्तकांच्या बाइंडिंगचे काम विद्यार्थ्यां-कडून केले आहे. व त्या कामाचा विद्यार्थ्यांना पुरेपूर मोबदला दिला जातो. श्री. काजळे डी. व्ही. हा विद्यार्थी हे काम करतो. आतापर्यंत सुमारे २०० पुस्तकांची बाइंडिंग करण्यात आली. काम अजूनही चालू आहे.

**सायंकालीन अभ्यासाची सोय**

या वर्षी पहील्यांदाच महाविद्यालयाने वाचनालयास जोडून रात्रीच्या वेळी १० वाजेपर्यंत विद्यार्थ्यांची अभ्यासाची सोय केली. दररोज सुमारे ७० – ७५ विद्यार्थ्यांनी नियमीत या सोईचा फायदा घेतला. संदर्भ ग्रंथ व क्रमिक पुस्तके विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन देण्यात आली. वाचनालय सकाळी ८ ते रात्रौ १० वाजेपर्यंत नियमीत उघडे ठेवण्यात आले.

**प्रा. शंकर देशमुख**

**व्यवसाय मार्गदर्शन केन्द्र**
**Career Advising Unit**

महाविद्यालयाच्या सुरुवातीस प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी केंद्रातर्फे महाविद्यालयातील ज्ञानशाखेची माहीती देण्यात आली. व्यवसाय मार्गदर्शन केंद्राच्या सुचना फलकावर वेळोवेळी विविध प्रशिक्षण, नोकऱ्या, शिष्यवृत्ती ह्या बद्दलच्या जाहीराती लावण्यात आल्या. याचा लाभ बऱ्याच विद्यार्थ्यांनी विविध ठिकाणी नोकऱ्यासाठी अर्ज पाठविण्यास करून घेतला.

केंद्रातर्फे श्रीयुत बोर्डे, तहसीलदार देगलूर यांचे 'स्पर्धात्मक परिक्षा' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्यामुळे विद्यार्थ्यांना अशा परीक्षेच्या तयारीबद्दल वगैरेची माहीती मिळाली.

अमरावती येथील व्यवसाय मार्गदर्शन केंद्राचे संचालक श्री. पु. रा. पारनेरकर यांना मुद्दाम व्याख्यानासाठी बोलावण्यात आले होते. त्यांचे "विविध व्यवसाय – कला व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांसाठी' या विषयावर उद्‌बोधक असे व्याख्यान झाले.

डिसेंबरमध्ये मराठवाडा विद्यापीठ अेम्प्लॉयमेंट ब्युरोचे प्रमुख प्रा. तेलंग व अेम्प्लॉयमेन्ट ऑफीसर श्री. बहुलकर यांनी महाविद्यालयाच्या व्यवसाय मार्गदर्शन केंद्रास भेट दिली व केंद्राच्या कामकाजाबद्दल समाधान व्यक्त केले. यावेळी श्री. बहुलकर यांचे "व्यवसायबद्दल माहीती गोळा कशी करावी व व्यवसाय कसा निवडावा" या विषयावर व्याख्यान झाले. महाविद्यालयाच्या वाचनालयात विविध व्यवसायाबद्दलची माहिती देणारे अनेक ग्रंथ आहेत. विद्यार्थी त्यांचा लाभ घेतात.

केंद्रातर्फे, विद्यार्थ्यांना शिक्षणक्रम पूर्ण केल्यावर सरकारी नोकऱ्यांच्या मागे न लागता स्वत:च्या खाजगी उद्योग कसा सुरू करावा या बद्दल माहीती देण्यासाठी देगलूर येथील औद्योगिक निरिक्षक यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले.

महाविद्यालयातील व्यवसाय मार्गदर्शन केंद्रातर्फे चालणाऱ्या विविध उपक्रमांचा फायदा जास्तीत जास्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी व परिसरातील इतर विद्यार्थ्यांनी व संबंधित पालकांनी (आपल्या पाल्यासाठी) करून घ्यावा.

**प्रा. माधव कुलकर्णी**

**शिष्यवृत्ती विभाग**

१९७२–७३ या वर्षात महाविद्यालयातील बऱ्याचशा विद्यार्थ्यांना अनेक प्रकारच्या शिष्यवृत्त्या मिळाल्या. जवळपास २२५ विद्यार्थ्यांना मागासलेल्या जातीजमातीच्या शिष्यवृत्त्या, १५ स्वातंत्र्य सैनिकांच्या मुलांना शिष्यवृत्त्या, २ राष्ट्रीय कर्जाऊ गुणवत्ता शिष्यवृत्त्या प्राप्त झाल्या. कांही अल्प उत्पन्न गटातील विद्यार्थ्यांनाही शिष्यवृत्त्या मिळतील अशी अपेक्षा आहे. तसेच कांही शिक्षणप्रेमी व्यक्तींनी जाहीर केलेंल्या शिष्यवृत्त्या विविध वर्गातून, विविध विषयात सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयातर्फे देण्यात आल्या. या शिक्षण प्रेमी मंडळीत डॉ. देगलूरकर, श्री. तारासिंग, श्री. वसंतराव पळणीटकर, श्री. गोविंदराव मत्सावार, श्री. उत्तमराव दिक्षित, प्रा. साठे, प्रा. जोशी, प्रा. धर्मापुरीकर, सौ. धर्मापुरीकर, प्रा. राठौर यांचा अंतर्भाव होतो. आणखीहि कांही मान्यवर व्यक्तीकडून शिष्यवृत्त्या जाहीर केल्या जाव्यात असे आवाहन महाविद्यालयातर्फे करण्यात येत आहे.

प्रा. माधव कुलकर्णी

**अर्धवेळ काम** (Part time service)

एप्रिल, मे, जून या महिन्यात काही मुले झाडांना पाणी देत होती. ही संख्या ४० चे जवळपास होती. जुलै, ऑगष्ट, सप्टेंबर, ऑक्टोबर, नोव्हेंबर डिसेबर या सहा महिन्यांत रोज सुमारे दोनशे ते अडीचशे विद्यार्थी सकाळी ६ ते ८ पर्यंत खेळाचे मैदान बांधकाम, रस्ते बांधणी होती. पाणी पुरवठा ही कामे करीत जानेवारी, फेब्रुवारी, मार्च मध्ये परीक्षा असल्यामुळे कामे बंद होती. वरील विद्यार्थ्यांना दोन तासांचा रोज एक रुपाया या हिशोबाने दिला किंवा वसतीगृहसाह्य देण्यात आले. या योजनेखाली चारशे विद्यार्थी म्हणजे १/३ संख्येने सवलत घेतली.

प्रा. लक्ष्मीकांत करडखेडकर

**वसतीगृह**

आमच्या वसतीगृहात सुमारे ४०० विद्यार्थी रोज जेवतात व दोनशे राहतात. वसतीगृहाचा दर रु. ३० दरमहा आणि भाडे रु. ५ असा आहे. ज्या विद्यार्थ्यांना अधिक सोयी हव्या असतात त्यांना अधिक दर आकारण्यात येतो. या सोयी करण्याचे कारण ग्रामीण भागातील बहुसंख्य विद्यार्थी खोलीवर ३० रु. व ५ रु. भाडे देऊन राहतो पण त्यांचा त्रास कमी व्हावा यादृष्टीने हे स्वस्त दरात वसतीगृह चालविण्यात येते. जेवणाचे व राहण्याचे पूर्ण स्वातंत्र्य आहे. कसलेच बंधन नाही. गरीब विद्यार्थ्यांना अर्धवेळ कामे देण्यात येतात त्यामुळे हे राहणे सोईचे होते.

— प्रा. लक्ष्मीकांत करडखेडकर

**श्रमदानः—**

श्रमदान हे महाविद्यालयाच्या परिसरात वर्षाचे बाराही महिने सकाळी ६ ते ८ अव्याहत चालू असते. महाविद्यालयाचे भव्य क्रिडांगण ह्याच श्रमदानातून तयार झाले आहे. त्यासाठी १०० दगडाच्या लॉऱ्या व १०० मुरुमाच्या लॉऱ्या आणण्यात आल्या. तसेच महाविद्यालयीन परिसर सुशोभित करण्याच्या दृष्टीने नवीन वृक्षारोपण, बागेतील झाडांना सतत पाणी पुरविणे, नवीन बांधकामासाठी पाया खोदणें, महाविद्यालयातंर्गत रस्ते तयार करणे व दुरुस्ती करणे ह्या सारखी अनेक कामे सातत्याने केली गेली.

**शेतीः—**

महाविद्यालयाचा भव्य परिसर लक्षात घेऊन क्रिडांगणाव्यतिरिक्त जागेत विद्यार्थ्यांतर्फे शेतीद्वारे उत्पन्न काढण्याचा यशस्वी प्रयोग करण्यात आला आणि त्यामुळे शेतीतून ४ क्विंटल संकरित ज्वारीचे उत्पादन खरीप हंगामात मिळाले. यात सुमारे पाचशे रुपये मिळाले. तसेच रब्बी हंगामात मुख्यतः करडीचे पीक घेण्यात आले आणि त्यापासून सुमारे एक हजार रु. चे उत्पन्न मिळाले. याव्यतिरिक्त वसतीगृहाच्या दैनंदिन वापरासाठी मिरची व भाजीपाला यांचे उत्पन्नहि घेण्यात आले.

**दुष्काळी कामेः--**

यंदाच्या दुष्काळी परिस्थितीत वसतीगृहाच्या खर्चाची तोंड मिळवणी करण्याच्या दृष्टीने विद्यार्थ्यांनी 'शहापुर ते लिंबा' या दुष्काळी रस्त्याचे काम करून सुवारे १२०० रु. मिळविले. त्याचप्रमाणे 'देगलूर-उदगीर' मार्गांवर रस्त्याच्या दुतर्फा वृक्षारोपण करण्यासाठी २५६ खड्डे खणण्याचे कामही जिल्हा परिषदेच्या आधिकाऱ्यांच्या सौजन्याने मिळवून पूर्ण केले.

**क्रीडावृत्त**

यावर्षी स्वतंत्र असा क्रीडाविभाग प्रथमच सुरू झालेला आहे. या विभांगाचा विद्यार्थी भरपूर उपयोग करून घेतात. कबड्डी, व्हॉलीबॉल, बुद्धीबळ, टेबल-टेनिसच्या खेळात २ फेऱ्या जिंकून विद्यार्थ्यांनी कौशल्य सिद्ध केले आहे.

विद्यापीठाने जानेवारी महिन्यात घेतलेल्या चांचणीत आमच्या महाविद्यालयाचे १) श्री. रमेश कळसकर, (१०० मि. धावणे) २) श्री. विठ्ठल पाटील (५००० मि. धावणे) (३) श्री. काशीनाथ जाधव (१६०० मि. धावणे) हे ३ विद्यार्थी विद्यापीठात सर्व द्वितीय आले. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे श्री. रमेश कळसकर ह्या खेळाडूची अहमदाबाद येथील आंतरविद्यापीठ सामन्यात ४०० मि. रिले मध्ये निवड झाली.

श्री. जी. के. मांजरमकर

**सहली–**

श्री. मांजरमकर यांच्या नेतृत्वाखाली विभागीय क्रीडा स्पर्धेच्या निमित्ताने विविध ठिकाणी विद्यार्थ्यांच्या सहली काढण्यात आल्या.

**बाग–**

महाविद्यालयाच्या परिसरात एक सुंदर बाग तयार करण्यांत आली. विविध प्रकारची झाडे, व वेली लावण्यात आल्या. प्रा. एम् बाबू यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी बागकाम केले.

**छायाचित्रण–**

श्री. बाबुराव उप्पलवार यांचे मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना फोटोग्राफीचे प्रशिक्षण देण्यात आले. त्यासाठी स्वतंत्र कॅमेराही महाविद्यालयाने उपलब्ध करून दिला. महाविद्यालयातील कार्यक्रमांचे फोटो याच विभागाने घेतले. ओळखपत्रावरील फोटोचे कामही या विभागातर्फे चालते.

**संगीत शिक्षण वर्ग–**

यंदा नव्यानेच हा विभाग सुरू करण्यात आला. गुणी व होतकरू विद्यार्थ्यांना संगीताचे शिक्षण देण्यांत येते, महाविद्यालयाने यासाठी पेटी, तबला इत्यादी वाद्ये उपलब्ध करुन दिली आहेत. ५० च्या वर विद्यार्थ्यांनी याचा उपयोग करून घेतला. श्री. उप्पलवार हे या विभागाचे काम पाहतात,

**राष्ट्रीय सेवा योजना–**

गेल्या दोन वर्षांपासून राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्य आपल्या महाविद्यालयात सुरु आहे. यावर्षी एकंदर ७५ विद्यार्थ्यांनी या योजनेच्या अंतर्गत विविध प्रकारच्या प्रकल्पात कार्य केले. गेल्या वर्षी सुरु झालेल्या या योजनेने आपल्या महाविद्यालयात चांगलेच मूळ धरले आहे. गेल्या वर्षी योजनेचे पंधरा विद्यार्थी प्रा. मनोहरासमवेत माना येथील बांगला निर्वासित शिबिरात सेवाकार्यासाठी गेले होते. त्याचप्रमाणे जालना येथील पाझर तलावासाठी श्रमदान करण्यासाठी आयोजित केलेल्या मध्यवर्ति शिबिरातही आपल्या महाविद्यालयाच्या दहा विद्यार्थ्यांनी भाग घेतला. याशिवाय रामपूर-रामलिंग हा एक किलोमीटर रस्ता तयार करून गरीब विद्यार्थ्यांच्या निधीस सुमारे सात सहस्त्र रुपये मिळवून दिले. या वर्षीच्या कार्यक्रमांमध्ये प्रामुख्यानें खालील गोष्टींचा उल्लेख करावा लागेल.

**१) झोपडपट्टीतील साक्षरता प्रसार--**

स्वातंत्र्य रौप्यमहोत्सवी वर्षी झोपडपट्टीतील लहान मुलांना साक्षर करण्याचे कार्य आमच्या योजनेतील

सहा विद्यार्थ्यांनी श्री निवळीकर यांचे नेतृत्वाखाली हाती घेतले. निवळीकर बंधु, श्री. गोरे, डोनगावकर, कलबुग, आणि कांबळे या विद्यार्थ्यांनी यात परीश्रम घेतले. एस. टी. स्टँड व वसतिगृह याजवळील दोन झोपडपट्ट्यामधील एकंदर सुमारे २५० लहान मुलामुलींना अक्षर ओळख, उजळणी व सामान्य ज्ञान यांचे धडे देण्यात आले.

याच मुलांना दसऱ्यासाठी चांगले कपडे मिळावेत यासाठी वरील विद्यार्थ्यांनी देणगी रुपाने चांगले कपडे जमवून त्यांना वाटले. प्रा. साठे व प्रा. कठाळे यांनी मुलांच्या प्रगतीची पाहणी करून कौतुक केले.

**२) गरीब विद्यार्थ्यांसाठी मदत कार्य--**

परिषदेकडून सु. ४०० रु. किमतीचे झाडांसाठी खड्डे खणण्याचे काम मिळवून ते पूर्ण करण्यात आले. याचप्रमाणे शहापूर-लिंबा रस्त्याचेही सुमारे १/२ कि. मीटर काम करून त्याचे पैसे गरीब विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी प्राचार्य हेमचन्द्र धर्माधिकारी यांचे स्वाधीन करण्यात आले.

**३) कलापथक--**

जवळपासच्या खेडेगावातील लोकांशी संपर्क साधण्यासाठी विद्यार्थ्यांच्या कलागुणांचा उपयोग झाला. विद्यार्थ्यांच्या एका गटाने 'ओपन टू क्लोज' आणि 'आता आलं लक्षात' हे वग नाट्य प्रयोग जवळपासच्या २० खेडेगावातून केले. याद्वारे गरीब विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्यही मिळाले.

**४) कुटुंब नियोजन प्रसार—**

देगलूर येथे भरलेल्या कुटुंब नियोजन शिबिराचे निमित्ताने राष्ट्रीय सेवा योजनेचे ३४ विद्यार्थी जवळ पासच्या सुमारे वीस गावात प्रचारार्थ जाऊन आले. कुटुंब नियोजनाचे प्रचारकार्य तर त्यानी केलेच पण त्याचबरोबर कुटुंबनियोजन विषयक उपचार करून घेण्यासाठी लोक आपणहून पुढे का येत नाहीत याबद्दलचा एक Survey सुद्धा या विद्यार्थ्यांनी घेतला.

**५) दुष्काळग्रस्त खेड्यांची पहाणी--**

जवळची बल्लूर, रामपूर, लिंगन केरुर, शहापूर, वन्नाली ही गावे निवडून तेथे दुष्काळी कामांची निकड किती लोकांना आहे. जवळपास दुष्काळी कामे किती अंतरावर आहेत वगैरे बाबत विद्यार्थ्यांनी माहिती मिळवली. याबाबत वेळोवेळी माननीय तहसीलदार श्री. बोर्डेसाहेब यांच्याशी चर्चाही करण्यात आली. वरील कार्याशिवाय महाविद्यालयाच्या परिसरात बागकाम, क्रिडांगण रस्ते बांधणी या कार्यातही सेवा योजनेचे विद्यार्थी वेळोवेळी सहभाग घेतात.

वरील कार्यक्रमात आम्हाला आमचे प्राचार्य, सहकारी प्राध्यापक विशेषत: उपप्राचार्य श्री. जाजू प्रा. करडखेडकर, प्रा. एम. बाबू यांचे सहकार्य व मार्गदर्शन वेळोवेळी सहाय्यक ठरले. याशिवाय उपजिल्हाधिकारी श्री सगणेसाहेब, मा. तहशीलदार बोर्डेसाहेब आणि जि. परिषदेचे श्री. वझरकर साहेब व श्री. खैरनार साहेब यांनी केलेल्या सक्रिय सहकार्यानेच आमचे उपक्रम यशस्वी होऊ शकले. इंजिनियर गाडगीळ साहेब व तेजेसाहेब यांनी तर विद्यार्थ्यांच्या उत्साहाला अनेक तऱ्हेने साद देऊन आम्हास उपकृत केले आहे.

**रवीन्द्र मनोहर**
प्रभारी प्राध्यापक
राष्ट्रीय सेवा योजना

**परीक्षा विभाग–**

विद्यापीठाच्या बदलत्या धोरणामुळे या वर्षी महाविद्यालयाने प्रथम सत्र परीक्षा न घेण्याचे ठरविले होते. परंतु प्रत्येक विभागाने आपआपल्या विषयाच्या सर्व वर्गाच्या परीक्षा घेतल्या आहेत. विद्यार्थ्यांची १० टच्युटोरिअल्स लिहिली.

परीक्षा विभागाने नविन उपक्रम म्हणजे विद्यार्थ्यांच्या सामान्य ज्ञानांत भर पडावी व विद्यार्थ्यांनी सामान्य ज्ञानाच्या अभ्यास करावा या उद्देशाने सामान्य ज्ञानाच्या परिक्षा घेतल्या आहेत. एकूण तीन परीक्षा घेण्यात आले आहेत. प्रत्येक परीक्षेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली.

पहिले पारितोषिक —— २५ रुपये.
दुसरे " —— १५ रुपये.
तिसरे " —— १० रुपये.

एकाच दिवशी देगलूर तालुक्यातील वेगवेगळ्या ७ हायस्कूलमध्ये सामान्य ज्ञानाच्या परीक्षा घेण्यात आल्यात. या परीक्षा घेण्यात विद्यार्थ्यांनी बरेच सहकार्य दिले. हे विशेष नमुद करण्यासारखे आहे.

सामान्य ज्ञान परिक्षेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांना प्राचार्य अ. ग. एकताटे, सुभाष महाविद्यालय नांदेड यांचे शुभहस्ते दिनांक १५ – २ – ७३ रोजी देण्यात आली.

रघुकृष्ण शेटये
प्रभारी प्राध्यापक, परिक्षा विभाग

**तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभ**

यंदा महाविद्यालय सोडून जाणाऱ्या बी. ए, बी. कॉम. व बी. एस्सी. च्या तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला. निरोप समारंभ प्राचार्य धर्माधिकारी यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाला अनेक विद्यार्थ्यांची भाषणे झाली. प्राध्यापकांच्यावतीने बी. ए. च्या विद्यार्थ्यांसमोर प्रा. तांबोळी यांनी आपल्या शुभेच्छा व्यक्त केल्या.

**प्रयोग शाळेचे बांधकाम–**

विद्यापीठ अनुदान मंडळाने या वर्षी महाविद्यालयास तीन लाख रुपयांचे अनुदान प्रयोग शाळाचे बांधकाम करण्यासाठी मंजूर केले होते या अनुदानातून प्रयोग शाळेसाठी ४०x २५ चे सहा हॉल्स बांधण्यात आले आहेत. या हॉल्सना रंग फ्लोअरिंग कांचेचे ब्लॅक बोर्ड लायटींग व पंख्याची व्यवस्था करून प्रयोग शाळा सर्व दृष्टीने अद्यावत करण्यात आल्या आहेत. हे सर्व काम एका वर्षाच्या आत पूर्ण करण्यात आले. इमारतीच्या मध्यभागी १६x १२x ८ या आकाराचा अंडाकृती एक सुंदर हौद ही बांधण्यात आला.

**वसतीगृह –**

प्रयोग शाळांच्या बांधकामा शिवाय वसतीगृहाच्या ही १०x १५ आकाराच्या ९ खोल्या बांधण्यात आल्या व ४०x ५० या आकाराचे भोजनगृह व वसती ग्रहाच्या अतिरिक्त ९ खोल्यांचे बांधकाम हाती घेण्यात आले आहे बांधकाम रूफ लेव्हल पर्यंत पूर्ण झाले असून पाण्याच्या अभावी हे काम थांबवावे लागले आहे. वसतीग्रहाच्या बांधकामावर जवळपास दोन लाख रुपयें खर्च करण्यात आले.

**महाविद्यालयाच्या परिसराचे विद्युतीकरण–**

महाविद्यालय व वसति-गृहाच्या परिसरात प्रकाश राहावा व विद्यार्थ्यांना रात्री फिरण्यास त्रास होऊ नये म्हणून ३७ विद्युत पोल लावले असून त्यावर टयूब लाईटस् मरक्युरीचे दिवे बसवून संपूर्ण परिसरात वीज खेळवली आहे.

प्रा. सत्यनारायण जाजू

**विद्यार्थी वस्तू भांडार**

विद्यार्थी वस्तू भांडाराची स्थापना होऊन आता ५ वर्षाचा काळ लोटला आहे. या सहा वर्षात भांडारान बरीच प्रगती केली आहे. विद्यार्थ्यांना नित्योपयोगी अशा वस्तु (वहया, पुस्तके, डिसेक्शन बॉक्स साबण, पेन्स इ०) भांडारातर्फे पुरविल्या जातात. विद्यार्थी वस्तु भांडाराचे एक संचालक मंडळ आहे. ह्यात विद्यार्थ्यांना देखील प्रतिनिधित्व आहे.

प्रा. रविंद्र कुलकर्णी

**एन. सी. सी. अहवाल**

१) दि. १६ जून १९७२ ते १५ जुलै १९७२ ह्या एक महिन्याच्या प्रशिक्षण शिबिरासाठी पुरंदर येथील एन. सी. सी. अॅकेडेमीस प्रा. साठे गेले होते.

२) यंदा झालेल्या वार्षिक प्रशिक्षण शिबिरास उदगीर येथे प्रा. साठे व ५१ कॅडेटस् गेले होते.

३) ५२ महाराष्ट्र बटालियन एन. सी. सी. यांच्या विविध स्पर्धांत खालील विद्यार्थ्यांनी नैपुण्य दाखविलें व त्याबद्दल त्यांना प्रशस्ती पत्रे मिळाली.

अंडरऑफिसर वि. सा. बोगुलवार व. अं. ऑ. डुमंकर ह्यांना बायोनेट फायरींग बद्दल प्रशस्ती पत्र मिळाले.

कॅडेट व्ही. आर. पाटील यांना क्रॉस कंट्री २ मैल पळण्याच्या शर्यतीत द्वीतीय आल्याबद्दलचे प्रशस्ती पत्र मिळाले.

यंदा शेषराव कुलकर्णी (सार्जंट) यास कंपनीतील सर्वोत्कृष्ट छात्र म्हणून निवडण्यात आले.
कॅडेट नांदेडकर हा २१दिवसांच्या Advance Leadership शिबिरास बंगाल मधील कॉलिमपाँग येथे गेला होता.

यंदा 'बी' सर्ट परिक्षेस १२ विद्यार्थी बसले आहेत.

**स्वातंत्र्यदिन, १५ ऑगस्ट ७२**

स्वातंत्र्य मिळून भारताला २५ वर्षे झाली, हे वर्ष रौप्य महोत्सवी देगलूर येथील विख्यात स्वातंत्र्य सैनिक श्री. पोशेट्टी उनग्रतकर यांचे हस्ते सकाळी ७-३० ला ध्वजवंदन झाले. विद्यार्थ्यांना या दिवसांचे महत्त्व विशद करण्यात आले. राष्ट्रसेनेने मानवंदना दिली.

**प्रजासत्ताक दिन २६ जाने. ७३**

यावर्षी महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थितीमुळे प्रजासत्ताकदिन अत्यंत साधेपणाने साजरा करण्यात आला. संस्थेचे उपाध्यक्ष व स्वातंत्र्य सैनिक श्री. पोशेट्टी उनग्रतवार यांचे हस्ते ध्वजारोहण झाले प्राचार्य श्री. धर्माधिकारी यांनी 'भारतीय एकात्मतेच्या प्रतिज्ञेचे' वाचन केले, सर्वांनी अत्यंत गांभीर्याने प्रतिज्ञा घेतली.

**चर्चा सत्र व निबंध वाचन–**

महाविद्यालयात नियमीतपणे एक चर्चा सत्र चालविले जाते. या निमित्ताने प्राध्यापक सायंकाळच्या वेळी महाविद्यालयात एकत्र येऊन विविध विषयावर चर्चा घडवून आणतात. या चर्चा सत्रात प्रथम निबंध वाचन होते व त्यावर नंतर चर्चा करण्यात येते. प्राचार्य धर्माधिकारी यांनी 'कलेची परिभाषा' हा निबंध वाचला. या निबंधावरील चर्चेत प्राध्यापकांनी भाग घेतला. प्रा. ताबोळी प्रा. राठौर यांच्या निबंधाचे वाचन होऊन त्यावर चर्चा झाली.

**निरोप**

आमच्या महाविद्यालयातून या वर्षी खालील प्राध्यापक अन्यत्र गेले आहेत.

१) प्रा. गोविंद गोपछडे (अर्जापूर येथे प्राचार्य म्हणून)
२) प्रा. रामप्रसाद बलरावत (सिल्लोड येथे प्राध्यापक म्हणून)
३) प्रा. गीताराम कुलकर्णी (बीड येथे प्राध्यापक म्हणून)
४) प्रा. रमेश देशमूख ( आर्जापूर येथे टयूटर म्हणून)
५) प्रा. श्रीकृष्ण धर्मापूरीकर ( नांदेड येथे प्राध्यापक म्हणून )

आम्ही या सर्वांना प्रेमपूर्वक शुभेच्छा व्यक्त करतो.

**स्वागत**

श्री. कल्याणपाड, श्री. एम् बाबू, श्री. एल्. एस. कुलकर्णी श्री. श्रीराम करडखेडकर श्री. जी. के. मांजरमकर या नव्या सहकाऱ्यांची आमच्या महाविद्यालयात नियुक्ती झाली आहे. त्यांचे आम्ही मनःपूर्वक स्वागत करतो.

— प्रा. रा. वा. घोंगडे

**कार्यालयीन कर्मचारी–**

**कर्मचारी वर्गात नव्याने आगमन**

श्री. बोगुलवार, श्री· अल्लमवार, श्री. बंगाळे श्री. वडगावे, श्री, मंदाडे यांची कार्यालयीन कर्मचारी म्हणून नव्याने नियुक्ती झाली आहे. आम्ही त्यांचे स्वागत करतो.

**निरोप–**

श्री. लक्ष्मण लिंगमपल्ले यांची अर्जापूर येथे अकाउंटंट म्हणून नियुक्ती झाल्यामुळे त्यांना प्रेमपूर्वक निरोप देण्यात आला. आम्ही त्यांना शुभेच्छा व्यक्त करतो.

# विद्यार्थी संसद



श्री. तोटावार सुरेश शंकरराव
बी. ए. द्वीतीय
अध्यक्ष विद्यार्थी संसद



श्री. येवतीकर माणिक विठ्ठलराव
उपाध्यक्ष विद्यार्थी संसद



श्री. पाटील निळकंठ किशनराव
सेक्रेटरी विद्यार्थी संसद



श्री. देगलूरकर खाजा शेख फरीद
माजी अध्यक्ष विद्यार्थी संसद



श्री. देशमुख यशपाल अनंतराव
माजी उपाध्यक्ष विद्यार्थी संसद



श्री. अलमवार गंगाराम गणपती
माजी जनरल सेक्रेटरी वि. संसद

## वर्ग प्रतिनिधी



श्री. मुगांवकर शिवराज बापुराव
बी. कॉम्. तृतीय
वर्ग प्रतिनिधी



श्रीा शेकापूरे व्ही. एम्.
बी. ए. प्रथम
वर्ग प्रतिनिधी



श्री. सौदागर अब्दुल अजीज
बी. एस्सी. प्रथम
वर्ग प्रतिनिधी



श्री. दरेगांवकर अशोक विठ्ठलराव
पदवी पूर्व कला
वर्ग प्रतिनिधी



श्री. मुखेडे व्यंकट टी.
पदवी पूर्व कला
वर्ग प्रतिनिधी



१५ ऑगस्ट एन. सी. सी. सलामीचा फोटो



भटक्या जमातीच्या मुलाना शिकवणी ( एन. एस. एस. च्यातर्फे )



भटक्या जमातीच्या मुलाना शिकवणी ( एन. एस. एस. तर्फे )



श्री. बोनलावार एम. एल.
माजी गेम्स सेक्रेटरी

# अभिव्यक्ती

'मराठी असे आमुची मायभाषा'

# मराठी विभाग

मार्गदर्शक –
प्रा. लक्ष्मीकांत तांबोळी

संपादक –
श्री. गंगाधर जोशी
बी. ए. तृतीय

# शेवंता

रामकृष्ण वि. कलबुर्गे,
बी. ए. उपांत्य

अचानक भैरापूर पाटीजवळ बस थांबली. एक तरुण स्त्री आणि पन्नाशी उलटून गेलेला एक गृहस्थ या दोन जीवांना अंधाराच्या काळ्या सागरात सोडून भर वेगाने काळोख कापीत निघून गेली. अमावस्येचा काळा कभिन्न अंधार पसरला होता. सडकेच्या डाव्या बाजूला लहानश्या उंचवटयावर वसलेल्या भैरापूरचे दिवे चमकत होते. शेवंताच्या अंगावर भीतीने रोमांच उभारले होते. ते दोघे त्या सडकेवर उभे होते. फक्त त्या दोघांत उभी होती काळोखाची प्रचंड भिंत ! अस्पष्ट आवाजात ती म्हणाली - " किती भयंकर अंधार आहे नाही का हो ? माझं अंग तर भयानं गारच झालय बाई. ! "

किचीत हसून तो म्हणाला. " भित्री आहेस तु सुनबाई ! अग, आता कुठे नवाचा सुमार झाला असेल ! पण तुला माहित आहे कि हुरडयाच्या दिवसात रात्री बारा वाजता सुद्धा मी एकटा शेतावर फेरी मारायला नव्हतो का जात ? मग मी सोबत असतांना सुद्धां तु कसली भिती बाळगतेस."

सासऱ्याच्या त्या आपलेपणाच्या व धीराच्या शब्दांनी त्या दुबळया स्त्रीच्या हृदयातील चिताग्नी शांत झाला. म्हातारा पुढे होऊन काळोखातून वाट काढीत होता. आणि दोन्ही हातांनी आपला पदर छातीशी घट्ट धरुन त्याच्या पावलावर पाऊल टाकीत ती चालत होती. पहाता पहाता अर्ध्या मैलाचं अंतर त्यांनी मागे टाकलं ... म्हातारा उगीच मध्येच थांबून मागे फिरुन पहात होता. त्याची चाल पण मंदावली. तिच्याशी लगट करुन चालण्याचा तो प्रयत्न करु लागला. पायवाटेवरुन किंचीत बाजूला सरुन म्हणाला, " सुनबाई ! पाय दुखत असतील नाही का तुझे ? बसू य आपण थोडसं इथे."

त्याच्या स्वरात विलक्षण कंप होता. तिला काहीच बोलायची आवश्यकता वाटली नाही. तो जिथे बसला होता, त्याच्या पासून थोडया अंतरावर ती बसली. डोक्यावरील मुंडसे काढुन ठेवून तो उगीच खरबरीत डोक्यावरून हात फिरवीत होता. आणि मधून मधून निबरट ओठावरुन जीभ फिरवीत डोळे मिचकावून तिच्याकडे पहात होता. तिने सहज त्याचा चेहरा न्याहाळला. त्या अंधारातसुद्धा त्याच्या सुरकुतलेल्या चेहऱ्यावर एक विलक्षण धुंदीची चमक तिला दिसली. एकदम तिचे सर्वांग भितीने शहारले.

" तुला भिती नाही का वाटत सुनबाई ? दुर का जवळ बस ना अशी, अंधाराचा टाईम आहे उगी विंचू किडयाची भिती ! " असे म्हणत तोच पुढे सरकला. ती थोडीशी भांबावली आणि रागानेच म्हणाली – " इश्श ! हे हो काय मामाजी ? "

पुढे काय होणार या भयंकर कल्पनेने तिचे काळीज धडधडत होते. गार वारा त्या दोघां भोवती घुटमुळत होता. तिच्या तारुण्याच्या मुग्ध सुगंधाने त्याच्यातील मेलेला काम पुरुष जागा झाला. त्याने तिच्या जवळ ती अमंगल शरिर सुखाची मागणी केली. आणि पुढे सरकून आपला एक हात तिच्या मऊ गुबगुबीत खांद्यावर टाकला. तशी ती त्याचा हात झिडकावून चवताळलेल्या नागीणी सारखी दुर जावून उभी राहिली. तिचे शरीर भितीने थरथरत होते. थरथरत्या ओठानें ती म्हणाली– " मामाजी, हा क्षणीक मोह सोडा. ही अधःपाताची पायरी चढू नका. मामाजी ! तुमच्या मुलाची शपथ आहे तुम्हाला ! दादाला दिलेले वचन विसरु नका, अजुनहि मी तुम्हाला माफ करते ! "

किळस वाणे हास्य करुन तो म्हणाला. " येडी आहेस तू शेवंता ! अग, नाती, गोती, धर्म, निती, विश्वास, अशा किती तरी गुळगुळीत शब्दाचे मुखवटे केवळ जगाच्या डोळयात धुळ फेकण्यासाठी असतात. मनाच्या पडद्याआड मात्र शरिरसुखा शिवाय सब

झुट ! '' असे म्हणत क्रुर वाघाप्रमाणे त्याने त्या निष्पाप स्त्रीवर झडप घातली. सारे बळ एकवटून तिने त्याला दूर झिडकारुन टाकले. आणि मोठ्या चपळाईने अंधारात चाचपडून एक धोंडा मिळवला. कसलाही विचार न करता तिने तो धोंडा त्याच्यावर फेंकला. धोंडा नेमका त्याच्या कपाळावर सादला. म्हातारा मट्कन खालीच बसला...

क्षणाचाही विलंब न लावता वेगाने ती काळोखातून निघाली. शिकाऱ्यापासून जीव वाचवण्यासाठी बेफामपणे धावणाऱ्या हरिणी सारखी ! पण पुढच्या झाडीत दडून बसलेल्या दुसऱ्या पारध्याची अचुक जाणीव तिच्या भांबावलेल्या मनाला कुठून असणार ! डोळ्यातून अश्रू गाळीत अंधारातून ती झपाझप चालत होती. गेल्या एका वर्षातील साऱ्या आठवणी सजीव होऊन तिच्या छिन्नविछिन्न झालेल्या मन पडद्यावर क्रमाक्रमाने येत होत्या...

...शेवंताच्या अल्लड वयातच तिचे आई वडील वारले होते. तिचा एकूलता एक थोरला भाऊ माधव ! त्याने कधीच तिला आई वडिलाची उणीव भासू दिली नाही. तिचे कोणतेही हट्ट तो जातीने तिच्याकडे लक्ष देवून पूर्ण करीत असे. भावाच्या कृपाछत्राखाली ती वाढत होती. दिवसेंदिवस तिच्या कृश शरिरावर यौवनाचा तजेला येत होता. शेवंता जशी मोठी होत होती तशी माधवची एक चिंता वाढतच होती. एकदाचं तिचं लग्न उरकल्यावर तो सर्व कर्तव्यातून मुक्त होणार होता. आवडी निवडीची एकच तर बहीण होती त्याला ! चारा पाहून गाय बांधण्याच्या खटपटीत तो होता.

एके दिवशी कांजाळवाडीची मंडळी शेवंताला पहायला आणि ठरवायलाच आली. घराणं चांगल होतं. आप्पाराव पाटलाचा एकूलता एक मुलगा होता. गावात मान होता. घर धान्यानं संपन्न होतं...लग्न झालं आणि एका शुभ दिवशी शेवंता नांदायला गेली. हा हा म्हणता तीन-चार महिने गेले. आप्पाराव पाटलाचे कुटुंबही छोटेच होते. तेवढ्या मोठ्या वाड्यात फक्त चारच माणसे होती. शेवंता, तिचा पती, सासरा आणि सासऱ्याच्या दुरच्या नात्यातली एक म्हातारी !

आप्पाराव पाटलाच्या दोन मुली लग्ने होऊन सासरी गेल्या होत्या. लहानपणीच आई वारल्यामुळे नवरा बिचारा वडिलाच्या आज्ञेत वागून दुबळ्या स्वभावाचा बनला होता. वडिलापुढे धीटपणे बोलण्याचे सुध्दा त्याचे धैर्य होत नसे. वडिलाच्या राकट आणि करारी स्वभावापुढे त्याचे काहीच चालत नसे. घरात सासऱ्याशिवाय पान हलत नव्हते.

सुगीचा दिवस होता. शिवारात भरघोष पिक आलं होतं. शेवंताचा नवरा नोकरीच्या गड्याबरोबर शेतावर राखण करायला जात असे. ती मात्र रात्रभर अंथरुणावर तळमळत पडायची. अशीच एके रात्री ती एकटींच झोपली होती. तिचा डोळा लागतो न लागतो तोच दारावर "टक् टक्" असा आवाज आला. आश्चर्यानंच तिनं दार उघडलं. तिच्या हृदयाला जबर हेलकावाच बसला. वासनेने पेटलेले लालबुंद डोळे घेवून तिचा सासराच तिच्या समोर उभा होता. ती घाबरून एका कोपऱ्यात उभी राहीली. पलंगावर बसत हसून तो म्हणाला, "घाबरू नकोस बरं का सुनबाई ! मी काही तुला जास्त त्रास देणार नाही. फक्त एकदाच ग. शेवंता ! फक्त एकदाच तुझ्या ह्या सासऱ्याची फार दिवसाची तहान भागव ग ! " असे म्हणत तो पलंगावरून उठला. तिने बेभान होवून कोनाड्यातली कुऱ्हाड उचलली आणि त्याच्यावर रोखून गरजली.

"खबरदार मामाजी, जवळ याल तर ! मी कोण आहे हे विसरू नका. मी...मी तुमच्या मुलाची धर्मपत्नी आहे. तुमच्या मुलीच्या ठिकाणी आहे मी ! मुकाट्यानं निघून जा इथून नाहीतर जीवच घेईन मी तुमचा !"

तसा तो फुस्कारून म्हणाला, "दीड दमडीची तू बायल, उलटतेस माझ्यावर ! याद राख, जातीस कुठवर ! आज ना उद्या माझं म्हणणं मानावच लागेल तुला ! " असे म्हणून पाय आपटीत तो बाहेर गेला. मोठ्या चपळाईनं तिनं दार लांवून घेतलं. त्या रात्री रात्रभर ती तडफडली. अश्रूच्या पुराने डोक्याखालची उशी भिजवून टाकली. त्या एका रात्रीत तिच्या संसाराची सारी मधूर स्वप्ने मातोमोल झाली. दुसऱ्या दिवशी तिने रात्री घडलेला सर्व प्रकार नवऱ्याला

सांगितला. तो तरी काय करणार. खालमान्या आणि सांगकाम्या होता बिचारा! खाली मान घालून तो म्हणाला, "मी तरी काय सांगू ग! बाबाचा स्वभावच जिद्दी आहे." नवऱ्याच्या त्या बुळगट स्वभावाची तिला चीड आली. त्याच दिवशी, "ताबतोब मला इथून घेऊन जा. नाही तर मी जीव देईन." असा निरोप तिने भावाकडे पाठवला.

—आज सात आठ महिने झाले ती भावाकडेच होती. आपल्या अंतःकरणातील हे दुःख ती भावाला सांगू शकली नाही. ती मनातच कुढत, झुरत बसली होती. "त्या घरी मी सुरक्षित नाही. मला फार जाच होतोय. मी पुन्हा जाणार नाही." एवढेच ती भावाला सांगू शकली. मध्यंतरी तिचा बावळट नवरा आला होता. माधवने त्याची चांगलीच कानउघाडणी केली होती.

आणि आज स्वतः सासराच येवून माधवच्या पायावर लोटांगण घालून विनवीत होता. या पुढ कसल्याही प्रकारचा त्रास करणार नाही म्हणून मुलाची शपथ घेऊन अक्षरशः त्याचे पाय धरून माफी मागत होता. तेव्हा शेवंताची समजून घालून त्याच्यावर विश्वास ठेवून त्याने त्याच्या बरोबर तिला पाठवले होते.

बस स्थानकावर विक्कार गर्दी असल्यामुळं दुपारी तीनची लातूर जाणारी बस त्यांना मिळू शकली नाही. त्यानंतर लातूर जाणाऱ्या शेवटच्या साडेसहाच्या गाडीचा सात वाजले तरी पत्ता नव्हता. तेव्हा तिने सासऱ्याला परत घरी चलण्याबद्दल विनविले होते. पण त्याने तिच्या बोलण्याकडे पूर्ण दुर्लक्ष करून म्हटले "एकदा घरून निघाल्यावर परत जाणे बरोबर नाही. पुढे फक्त दोनच मैल आहे आपलं गाव. तेव्हा तू भिती कसली बाळगतेस! शेवटी तीचा नाइलाज झाला.

......मध्य रात्रीचा सुमार होत होता. वारा शांत झाला होता. जवळजवळ सात आठ मैलाची सडक तिने मागे टाकली. तिचा पाय चालल्याने भेंडाळून आल्यागत झाला. तिच्या अंगाला दरदरून घाम आला. एक प्रदीर्घ निःश्वास टाकून तिने समोर आकाशाकडे पाहीले. एक तेजस्वी चांदणी अचानक तुटून विद्युत वेगाने खाली येऊन अंधारात दिशेनाशी झाली. तिच्या काळजात कापल्यागत चर्रर्र झाले. समोर सडकेच्या उजव्या बाजूला आमदापूर होते. अंधाराचा काळा शालू पांघरून ते छोटेसे गाव शांतपणे विश्रांती घेत होते तिला थोडासा धीर आला. कारण इथून तिचे माहेर तीनच मैल होते. ती लगालगा चालतच होती. अचानक तिच्या कानावर पुढील विषारी शब्द पडले.

"कोण आहे? थांब!"

बाणासारखे ते शब्द तिच्या काळजात घुसले. तिच्या हृदयाचे पाणी पाणी झाले. काळपुरुषासारखा तो धिप्पाड माणूस तिच्या समोर उभा होता. दोन्ही हात छातीशी घट्ट धरून कापऱ्यास्वरात ती म्हणाली, "मी कांजाळवाडीची आहे. इकडे माझ्या भावाकडे जात आहे."

यावर तो उपहासाने हसून म्हणाला. "अशा बेरात्री कुणाशी तरी व्यभिचार कर्म करून पळून जाणारी महापतिव्रता दिसतेस तू! असाच पोलीस पाटलाकडं ओढीत नेतो तुला."

केवढी जबरदस्त जखम झाली तिच्या निष्पाप मनाला! ती गयावया करून म्हणाली, "नाही हो अम्मा! मी तसी नाही केवळ सासऱ्याच्या जाचाला कंटाळून मी माहेरी जात आहे जावू द्या मला."

"थुत् तुझ्या आयची पानचट रांड! मला अम्मा म्हणतेस! तुझ्या त्या पापी मुखानं." असे दरडावीत तिच्या अगदी जवळ येवून हळूच तो म्हणाला मीच आहे इथला पोलीस पाटील मुकाट्यानं माझ्या बरोबर इकड चलं. जर का ओरडलीस तर — चावडीत मानसं पानं खेळत बसलेत—तुझ्या आवाजानं ते जर आले, तर उसाच्या चोथ्यागत पिळून काढतील तुला!" असे म्हणत त्याने तिला ओढीतच नेले.

पुढच्याच क्षणी त्या निच दलालाने त्या निरापराध गाईला त्या शेतात लोळवले तिने त्याला खूप विनविले. मासळीसारखी तडफडली. पण व्यर्थ! कदाचीत ती ओरडेल म्हणून त्याने तिच्या तोंडात

आपला रुमाल कोंबला होता. अखेर तिचा पवित्र देह विटाळला. कितीतरी वेळ अत्यंत निदर्यपणे त्याने तिच्याशी कामचेष्टा केल्या. कधीही न शमणारी वासना तृप्तीची तहान भागविली. मनगटाच्या बळावर क्रूरपणें तिला हासडले. खरोखर अंधार म्हणजे एक प्रचंड अजगरच! अत्यंत भयंकर आणि अमानुष अशी कृत्ये अजगराप्रमाणें आपल्या पोटात सहज गिळू शकतो. त्या दुष्ट राक्षसाने त्या बिचारीचा मनसोक्त उपभोग घेतला आणि वासनापूर्ण झालेवर एक लाथ हाणून तो पशुतुल्य माणूस निघून गेला.

शेवंताचे सर्वांग वेदनांनी ठणकत होते. तिच्या ब्लाऊजची बटन तुटली होती. साडीच्या चिंधडया उडाल्या होत्या. काळजाचे तुकडे तुकडे झाले होते. घायाळ अंतकरणाने अश्रू ढाळीत हुंदके देत त्या काळोखात ती निघाली. दूऽरऽऽ अती दूऽऽर चालतच होती आणि काळोखातच दिशेनाशी झाली.

## जगातील वैचित्र्य

सत्तावीस दरवाजे असणारी इटालीत एक हवेली आहे. तिच्या पासून काही अंतरावर उभे राहून कोठ-ल्याही शब्दाचा उच्चार केल्यास त्या शब्दाचा प्रतिध्वनी साठ वेळा स्पष्ट आवाजात ऐकू येतो.

अमेरिकेतील बोस्टन या शहरातून अमेरिकेचे पहिले वर्तमानपत्र १६९० मध्ये प्रसिध्द झाले.

★

अवधच्या नबाबनें त्या काळातील हाजामाने केलेल्या हाजामतीवर संतुष्ट होऊन १,९४,००० डॉलर्स किंमतीचे बक्षीस दिलें होते.

तिबेटमध्ये एका बाईला चार-चार नवरे असतात.

रशियातील बँका रविवार शिवाय एक वर्षाच्या काळात फक्त पाच दिवस बंद असतात.

★

१९५८ साली मृत्यु पावलेंल्या रॉबर्ट अर्ल ह्यूजेस या अमेरिकन माणसाचं वजन १००० पौंड होत.

चिनी लिपी आणि भाषा यात इतकी गुंतागुंत आहे की हुशारातला हुशार टायपिस्ट एका मिनिटाला चार किंवा पाच शब्दापेक्षा अधिक वेगाने टायपिंग करू शकत नाही.

न्युयॉर्क येथील 'मेक्स पोष्ट' या नावाच्या तरुणीने अकरा औंस वजनाच्या मुलीला जन्म दिला.

★

चिनी मुलींची नांवे सुद्धा ठेवली जात नाहीत. पहिलीं, दुसरी, तिसरी, चौथी असे म्हटलें जाते.

भारतातील सर्वात पहीला मुकपट मद्रास मध्ये १९०९ साली दाखविला गेला.

★

इंग्रजी भाषेत जवळ जवळ ८,००,००० शब्द आहेत. परंतु त्यापैकी फार तर ६०,००० शब्दांचा उपयोग केला जातो.

# झापड

**कळसे वैजनाथ रावणकोळकर**
बी. ए. उपात्य

दूपारची शाळा सुटली, अन् मी पळतच घराकड निगालो. सकाळच्यापारी एगदाच जेवलतो, ते बी थोडकूसच ! मायन रातच्याला खाता खाता थोड ठेवलती, माझ्यासाठी ! दूपारपासून पोटात भूक लागलती परीक दूपारा घरी रोटीच नव्हती. सकाळची शाळा सूटलतवा बक्कळ पोर शेव, भजे, चिवडा हाटलातून आणून खात व्हती. परीक माज्याजवळ एकबी पैसा नव्हता. पोर खावलाल्ते तवा माज्याबी तोंडाला बक्कळ पाणी सूटलतं.

खाकतलं दप्तर बाजवर टाकून दिलो. घरात वाकून बागीतलो, तर मायन खरा खरा डोस्क खाजवीत, चूलीपूड बसून कडा ऽऽ क ऽऽ ड जांभळचा देत व्हती, मंग म्या बी काय वळकायच ते वळक्लो ! मंग मी बी तस्सच माईच्या तोंडाकडं बगत बसलो. मंग मायन आपूण होऊनच म्हंटली, " काय र ! चार वाजले का ? " " मंग म्हंटलो हूं ! " आणिक इच्यारली, " काय लीव्हलासर ! आज साळत ? " मी म्हंटलो, " कायबी न्हाय ! कालचीच उजळणी म्हणून दाकविले आणिक गांधीजीकी जय बोला, धडा लीवून दाकविलो " ! !

मायला इचारलो " माय बाबान सकाळ पास्न दाणे आंपटला न्हई का ये " ? मायन म्हटली " न्हाय बाबा " ! ते काल कामावर गेल्ते तो मालक आज गावाला गेलाय म्हण ! कालचीबी मंजूरी न्हाई, अन् आज तर कामावर गेल्या बिगर कोणी दाम देयना ! आज तूजा बा गंवडचाच्या हाताखाली कामाला गेलाय, आता सा वाजले की आल्यावर दुकाणातून दाणे आणूत, मंग रोटचा भाजी करुत. रोटचा भाजीची ध्यान झालय बरुबर माझ्या थोंडातल्या जीबेवर आपलापूनच पाणी सूटल. मंग मी मायच्या गळचा पडत इचारलो, " माय ! हामच्या शाळतली पोर रोज आपल्या बा कडून पैसे आणून चाकलीट, शेव, भजे, खात्तया बग ! बाबान एकाबी रोजी मला पैसे देयना ! मायन माझ्याकडच बगत लूगडचाच पदर डोळचाला लावली, डोळचातलं गरम गरम थेंब माज्या कपाळावर पडलं ! मला वंगळच वाटलं, मायला उगचूच मंटलो म्हणून माईच्या गळचा पडून ढस्सऽ ढस्सऽऽ रडलो मायन माज्यावरून लूगडचाच पदर पांघरून हालू हालू थोपटून समजूत काडली. आपूण व्हवूनच मंटली हेबक बटा, तूझा बा घरी आले की, तुला चार आणे पैसे देयला लावते मंग तू घेवून खा " ! मी मंटलो अन् माय बाबाला तर दोनच रुपये मजूंरी येतींयाय ! त्यात दाणें किती आणाव अन् मिरच्या, दांल कीती ? मंग मायन ध्यान करून दिली, आर ! बाबाचे कालचेबी पैसे येत्यात ! मला थोडकस बरच वाटलं मायनं कधि नाही ते बा कडून चार आणे देणार व्हतीं.

दिवस मावळलालता, थोड थोडी झापड पडालालती मीन् माय बा ची वाट बगत बाजवर, बसलतो, तितक्यात दूरूनच बा येत आसल्याचा दिसला बा च्या तोंडाकड बगीतलो तर आज बा च तोंड जरा खूलूनच दिसत होतं, तरी भूकेची झावळ तोंडावर दिसत व्हती मायनं सांगीतलयावनीच बा आज दोन रोजची मंजूरी मिळालती मी, बा दुकाणातून दाणे, दाल आणून मायला दिलो. मायनं मला चार आणे पैसे देयाला बा ला सांगीतली. बा न बी कधि नाही ते बर मंटल, हामी मोटर ठेसणाच्या हाटेलाकड निघालो. मायन सुपात दाणें निचायला घेवून बसता बसता म्हंटली " अर हेबक हाटेलातून शेव घेताच तस्साच कागदाचा पूडा बांधून घेवून घराकड ये बग बर की "! मी ऐकून नसलयावनीच करीत बाच्या म्हागे जाम पळालो.

ठेशनावरच्या हाटेलात जाताच बान एका पोराला एक च्याचीं आडर दिला, तस्सच छटाक वचीशे बी त्या हाटेलातली वासघाण (माज्या नाकात

फसकन शीरली मला कसकीच मळमळल्यावनी वाटलं ) ठेसनात बक्कळ मोटरा हूबा न्हायल्ल्या हाटेलातल्या पोरान कागदात शेव बांधून देताना ते पूडा हातात घेवून 'हूं'! घराकड पळत जावून मायला कवा दाकवाव की वाटत होत. तवर जोकना बाच च्या बी पीन झाल्त. मी बाच बोट एका हातात धरून, एका हातात शेवचा पूडा धरून उगच मोटरा बगत चल-लल्तो. ठेसनात माणसाची चिक्कार गर्दी व्हती. काई गोऱ्यापाण बाया पान खावून पच् पच् थूकत व्हत्या, काईच्या कमरवर तेयच्यावनीच गोरेपण लेकर व्हते, त्यांच्या हातात लाल हिरवे काई बाई बक्कळ व्हत अन् त्या हातातल्या सामानाला बगून ते लेकरू आणकी इतक चेकाळत होत. तितक्या लोकामश्वी बी त्या बाया लेकराचे गालगुच्चे घेऊन पटा पट मूक्के घेत व्हते, एकदाच माझ माय केळाच्या सलपटावरून घसरल, बान धरजो, धरजोकना म्या भोईबरुबर झालो. हातातला शेवचा पूडा झप म्हणून भोईवर आपटला, शेवच्या काड्या मातीत मिसळल्या बान तोडान चूक चूक करीत धूळीतल्या एक एक शेवच्या काट्या येचुन घेत व्हता. तेवढयात एक सूट पॅटवाला आला अन् म्हटला "अबे छोड दे, जो गया सो गया अब क्यो मिट्टी मे मिला हुवा ले रहा है ? " मंग बान तस्सच काड्या टाकून उटला. मी नंतर ते कागद हातात धरून उभा व्हतो. त्या शेवाच्या काड्यांना बगताना माजे डोळे भरून आले, तितून बान मला खसकन वडल, तितक्यातच नविन करकरींत बुट लेवलेला माणूस त्या शेवच्या काड्यावरूनच गेला. माज्या काळजावरच पाय ठेवल्यावनी वाटल माझ्या मागून मोटरचा पोगा वाजला मी बाजूला झालो ते मोटर बी शेव वरूनच गेली, मोटरच्या चाकारीत शेवचा चुरा चुरा होवुन गेला.

मी घरला जाण्या बरुबर माईच्या गळचा पडून रडलो. मायन भाजी रोटी करून ठेवल्ती परीक मी भाजीला ढुंकुणबी बंगीतलो न्हाई, मायन, अन् बान बक्कल जेव म्हटल परीक मला जेवुच वाटल न्हाई. आता भाईर चांगलीच झापड पडलती, मायन आंतरून घातली, बान बी इळबरच्या कामान थकून गेल्ता मी मायच्या गळचाला गच्च धरून निजल्तो, डोळचावर कवा झापड पडली हे बी कळलं न्हाय !

## जगातील वैचित्र्य

लडंनमध्ये 'हँडल बार क्लब' या नावाचा एक क्लब आहे. त्याचा सभासद होण्यासाठी एक वैशिष्टपूर्ण अट घातलेली आहे. त्या क्लबचा सभासद होण्यासाठी सायकलच्या हँडलसारख्या मिशा असणें अवश्यक आहे. १९४७ मध्ये या क्लबची सुरुवात झाली. आज त्याचे सभासद मोठ्या प्रमाणावर झालेलें दिसून येतात. प्रत्येक वर्षी हुबेहुब हँडलसारखी मिशी ठेवणाऱ्यास या क्लबतर्फे बक्षीस म्हणून चांदीचा चषक दिला जातो. बक्षीस पात्र ठरणारा सभासद असणें आवश्यक आहे.

वुल्फगांज नावाच्या २१ वर्षे वयाच्या एका तरुणानें आपल्या भूतपूर्व शिक्षिकेशी लग्न करण्याचे ठरविले होते. तो पश्चिम जर्मनीतील राहाणारा होय. शिक्षिकेचे वय ४१ वर्षे असून तिचे नांव मीरीया लिटर असे होते सहावर्षापूर्वी वुल्फ गंगा शाळेत तो शिकत होता त्यावेळी ती शिक्षिका इतिहास शिकविण्यासाठी होती तेव्हां पासून त्यादोघांच्या इतिहासाला सुरुवात झाली होती.

# करम

गोविंद डोनगांवकर, बी. ए. उपात्य

गावात नुस्ती कुच कुच चल्ली व्हती. जिततित एकच गराण चल्ल व्हत. ' सजीची सुन बेपत्ता हाय सजीची सुन पळून गेली.. का गेली ? कोना बर गेली ? याच मातर कोडंच झाल्ल सगळचाला.

त्या दिसी आक्रा वाजले व्हते परीक आजून काई हिव गेल न्हवत. आदून मदून थंड वारं येत व्हत आन आंगाला झोबून गुदगुली करुन जात व्हतं. हिवानं झाडाचे पान पंद्रा दिसा पसून गळाले व्हते. त्याचा आंगणात नुस्ता खसच पडला व्हता वरच्यावर झाड बुच्चं व्हयालं व्हतं. वारं आलं की एकांदी नवरानवरी वर अक्षादा टाकल्यावनी पानं भराभरा गळायचे. ... म्या आंगणात वट्टचावर बसलो व्हतो. पानाची मज्या कात बसलो व्हतो. माईचंबी जेवनं झालंत. तिनबी येवून झाडाच्या बुडाली टेकली.

आंगणांतून म्हाराची सजा गडबडीनं चल्ली व्हती. माय तिच्याकडं बग्ली आन् मनाली, " सजा "

" जी माय " सजा मनाली

" ये की " माय मनाली

" आले हिंगं " सजा मनाली

" आसी उबी का बस की " माय मनाली. सजा बसली म्या नुस्ताच तेयच्याकड बगतन् बोलनं आयकत न्हायलो.

" कैकी नाराज दिसतीस " माय मनाली.

" काय सांगू माय करमकानी " सजा मनाली

" धोडचा यगळं काडलाय का तूला ?"

" न्हाई "

" मंग सुन जाच कराली ? "

" न्हाई. "

" आगं मंग झालं तरी काय तूला ? "

" करमगतीसच न्यारी माय मजी "

" आग झालं काय सांगून बी टाकणास ... "

" दयवात हाय ते ते बगाव लागते यंका माय " मनत तिनं डोळचाला पदर लावला.

हिंग बग सजा, आपल्या मनाचं दुक कोणाला सांगल्या बिगर का कमी व्हते. त्याच्यासटी मन मोकळं ठिवाव मानसानं "

" मजा नातू गेला माऽऽय ! " सजानं डोळचाला पदर लावून पानी पुसलं.

" आऽऽयोऽऽ काय झालं गं माय लेकराला ?"

" मजा नातू राज्या. गोरटेला नाकी डोळीं निट्टास व्हता. गोड बोलत व्हता. खेळत व्हता. आक्षी मला आजीऽ आज्जीऽ मनत व्हता. च्यार वरसाचं होतं माय लेकरु. आजून त्याची मुरत मज्या डोळचा-पुडून जायना झाली माय ! सुन च्यार म्हयन्याची गरवार व्हती. जाऊ नको ए म्हायेरा मन्लो परीक मजं आयकनासी गेली संगं लेकराला घेवून गेली. तिकडी गेल्यावर लेकराला हागोन लागली. दुकळानं खायाला मिळना झालं तितं आवशिदाला कुटला पैका ? "

" होय माय, लई कटीन येळ " माय म्हणाली

" तिन म्हैने झाले मी धोंडचाला वाट लावले आणाया. त्यानं गेलान् लेकराला हातावर घेवून बायकोला घेवून आला. लेकरु वाळून चिच झालं व्हतं. मी हातावर घेतले आन् घरात नेले. बेसुद व्हतं लेकरु. बापूऽ बापूऽऽ मनून हाक मारली. डोळे उळगडून मज्याकड फायलन हाळूनं आज्जी मन्लंन् डोळे पांढरे करुन मान टाकलं ते गेलंच की माऽय ! " सजानं डोळे पुसले.

" काय व्हते सजा ज्याच व्हत त्यानं नेलं. प्रालब्द लई येगळच न्हाते माय एकेकाचं ! आपल्या दयवात हाय ते ते बगाव लाग्ते. लडू नको उगं बस "

"माय आता सुन कोनीनिगाय झाली मनुन म्या बाजारा गेले. शेरबर घऊ, शेरबर तांदूळ, सा मासे पारा सा मासे लस्कापूर ठेवून आले. नअू म्हने पुरे झाले न्हवते आठ दिवसं कमीच व्हचे. तवा एका राती तिचं पोट दुकालं. आन् पडूनबी गेलं! मला मेल्यावुन लई दूक झालं. लडून लडून डोळे सुजून गलं. देवानं मला नातवाचं सुक बगू देयना गेलं माय!! मोट्टी इच्या फोल झाली! मजा सोभाव बदल्ला. सुनला खिस खिस वस वस करू लाले. एका दिसीं तिचा भाऊ येवून बोलून नेला, आन तिकडीच दुसऱ्यावर म्होतर लावून देला. आता काय घ्या त्याचं? हामी काय बोटं चोळीत बसल्या."

"नवी सुन केलीस जून की?"

"हां केलाव माय पनिक तिनं घर बुडीली इज्जत येशिला टांगली. हालाकट रांड!"

"का ए काय झालं?"

"जें झालं ते सांगायलाई लाज वाटते यमा. इतकं वंगळ डाग लावली बगा."

"सजा तू सांगलीं न्हाईस तरीबी कळतेच कवा ना कवा."

"बरं तर ऐका. त्या पोरीचं म्होतर करून देल्यावर म्याबी कंबर बांधली. मज्या धोंडयाला बायको आनीन तर तिच्या परीस चांगली. गंगाराम पाटलाकडं गेले. तेयच्यापसून याजनं शंबर रुपै काडले. देवापूरची पोरगी बनून आले. आन् आट रोजात सोयरीक जमिली. ठचँ दिन्या म्होतेर वाजून दिले. पोरगी नादाय आली. पैसे म्हयन्याच्या बोलीवर आन्ले व्हते."

"बरीच हिमंत केलीस माय!"

"हां म्हयन्यापसून गंगाराम पाटील घराच्या भवताल खेटा घालू लाला. पैसे काई देयाला मिळनात. मजी सुन चांगलीच व्हती. गोरटेली, नाकी डोली निट्टास, चुणचुणीत व्हती. तीं त्याच्या डोलचात भरली."

"लई वंगाळा माय माणूस."

"हां एका दिसीं पोरगं आवताला मजूरीनं गेल्तं. म्या लाकडं आणाया रानात गेल्तो. दुपारा दोन वाजता लाकडाची मोळी घेवून आले. कवाड लावून व्हतं. सुन कुटं गेली आसल बा आसा इच्यार मनात आला. तवा घरातून हासण्याचा आवाज आला. म्या कवाडाच्या सामटीतून बग्ले. गंगाराम पाटील तिला घोळसाला व्हता तीबी त्याला बिलगत व्हती. ते बगून मज्या आंगाचं इस्तू इस्तू झालं. तळ पायाची आग मास्तकाला गेली. म्या रागानं बेभान झाले. थोंड्या येळानं त्यानं भाईर आला. मज्या डोळ्यातून ठिनग्या निघानल्त्या त्याला मन्ले, "पाटील गरीबाची इज्जत..." तर त्यानं मनाला, "थुऽऽ तुज्या मायची थेरडी मारी, तुला कशाची इज्जत हाय. आता पतोर इज्जत आसली तर पैसे देत व्हतीस. आदी फेक मजे पयसे मज्याच पयशातून करून आनलीस की तिला. याज देयनास तर देयनास. मोदल देवून टाक. न्हाई तर पयसे जवर देयनास तवर मला तिच्याबरं न्हावू दे. काय बिगडलय? म्या कोनाला पता लागू देयना. घाबरू नको. न्हाईतर गडबड केलीस तर हाडूक ठिवणार न्हाई जाग्यावर कुटं दाद लागना तूजी पोलीसठाणा खिशात हाय मज्या. धुळदान उडीन घराची ऐकलीस काय थेरडी. ध्यानात ठिव. आऽव."
आन तो राकेस निगून गेला माय.

त्या दिसी सुनरांडला बक्कळ बडून काडले. आट दिस राकणच न्हायले. एकदाचं झालं गेलं इसराव मन्ले नव्या दिसी मंजीनी काल पुना कामासटी रानात गेल्ते. दुपारा आल्यावर बगते तर पुनाकवाड बंद. म्या मातर आता चवताळले. बेभान व्हवून कवाडाला लात हान्ले. कवाड निगालं. मदी जावून बग्ते तर कायबी न्हाई, रीकामच घर! इकडी तिकडी बग्ले परीक तिचा कुट पत्ता लागनां. दोन घंटयानं चांदया निजाम बादावून आला. मला गाट पडला तवामनाला, "सज्या माय तूजी सुनन् गंगाराम पाटील मोटरत बसून चल्ले व्हते. तयची बस मला येसगीवर आडळली. म्या इच्यारजेकोर मंजीनी बस सुटली." तवा मला काई सुदरना तवा मटकून खालीच बसले. आसी कानी झाली बगा माय दयवाची."

"दईवच फुटकं निगते बग सजा एकेकाचं."

"जाते माय बक्कळ वाडोळ झालं." मनुन सजा अटून घरला गेली.

# प्रायश्चित

भालचंद्र डोंगळीकर,
पि. यु. सी. सायन्स

सारीं झाडं झोपी गेली व्हती परीक निल्या जागत व्हता. त्याच्या हातात एक चाकू व्हता त्यो भयाण जंगलात उभा व्हता कोणची तरी शिकार येतीया काय की म्हणून त्यो नेमानं वाट बगु लागला, परीक वाटानं कोणी बी येत न्हवत घटका घटक्यान निल्या नाराज व्हत व्हता त्येंची आय झोपडीमंदी बिमार व्हती. तिच्या औषधाला पैसा न्हवता म्हुनशान निल्या पैसे मिळवाया आला व्हता. आवसाची रात व्हती म्हणून, एवढी आंधार व्हता की डोळ्यासमोर आंधारच यवाव. तरीबी निल्याला सारं दिसत व्हतं. एका हातामंदी चाकू आन् एका हातात सोल घेऊन उबा व्हता. त्यों पळत्या घोडीला आवराय सारकं व्हता त्येच्या आंगामंदी मस्ती बी तशीच व्हती कोणी बी न्हाय म्हुनशान त्यो एका दगडावर डोस्क्याला हात लावून बसला, त्येच्या मनामंदी म्हागी केलेल्या कामाचं वार शिरलालत बिचारी रत्नी... गरीब आप्पा... बाळ केशव सारे सारे त्याच्या डोळ्याम्होरं उभी न्हाऊन हासत व्हती ...

...... साळंमंदी आबासायबाच्या पोराचं डोस्कं फोडल्यापास्न निळ्याची शाळा सुटली व्हती घरी मात्र शिवादेयाची निल्याला निलकंठ म्हणून कोणी बी म्हणत न्हवतं. त्यापायी त्यो सरवाव रागानं न्हायाचा. त्याच्या घरची नुसती हालत झाली व्हती. निल्या आठ वरसाचा आसतांनीच त्येचा बाप मरुन गेला व्हता. निल्याला वणवण फिरायची लई सवय व्हती. झाडावर चढायचा, ढेकळं मारुन बोरं, चिंचा पाडायचा, उंच दगडावरुन उड्या हानायचा ह्या त्याच्या खोड्या बगून म्हातारी माय लई कटाळून गेली व्हती. ती निल्याला म्हणायची, " निल्या ! आसं फिरलंतर पोटाला कसं येतयां रं, काम तर उद्या करावं रं पोरा " " बरं ! तसंच करतो " आसं म्हणायचा परीक परतुन पडायचा न्हाय. तसा निल्या गुणाचा व्हताच. त्येला धंदाच न्हवतां. काय बी आया बैनी हिरीवर पाणी आणाया आली की निल्या शिटच्या मारुन त्येंना डोळा मारायचा आन् पाणी आणाया आलेल्या बाया त्याच्यावर बोटं मोडायची निल्या कोनालाबी जुमानत न्हवता, गावच्या पाटलांच्या पोरीला एकदा बेदम म्हटला, " आगं आशी सात मजल्यावर बसून कशाला हासतेस. आवसंच्या राती खाली ये म्हजी दावितो मी कोण हाय ते. " मंग तवापास्नं त्याचा दरारा गावच्या साऱ्या तरण्या पोरींवर पसरला. साऱ्या पोरी त्याच्यासंग जपून वागत व्हत्या. हे सारं खर व्हतं परीक निल्याला येळाला रोटी भेटनां झाली. चार चौकाला निल्या दाणं उसनं मागुन बगला कोणीबी देयना झालं. म्हातारी तर चक्क त्याला शिव्या देऊ लागली. आसजे तंवर म्या पोसले आता कुटून आणावं दाणं आसं म्हातारी म्हणत व्हती. तवा निल्या एकटाच निगाला दाण्याच्या शोदांमंदी. एक आडाणी माणूस त्येला वाटंत बेटलं. निल्या हात जोडून त्येला म्हंटला, " दादा ! पोटाला कायबी न्हाय कसं करावं व्हं " मग त्यो किडक्या दाताचा माणूस हासून म्हणाला, " असं ! चोरी करावं ... चोरी " मग निल्याच्या डोस्क्यात परकास पडला निल्या " बिंगरी जंगला " मंदी जायाचं पकं केला. ते बिंगरी जंगल लई दाट झाडीचं व्हतं. त्या मद नएक पाय वाट व्हती बस्सं वाल्याकोळी बनायचं. आन् म्हातारीचं समाधान करायचं. आसं म्हणून निल्या जंगलमंदी जाऊन डबा न्हायला कुराड घेऊन. मडके इकलेली कुंबाराची बाई रत्नी त्या वाटनं आली. निल्या त्या बाईला आडविला आन् पैसे काढून घेऊन कुराड उचलला. " दादा ! मारु नगं रं ! " तरीबी कुराडीचा धपका मानावर बसला ...... तिच्या मागनं घरोघरी भीक मागायचा आप्पा आला. त्याचं पीट सारं काडून घेऊन त्यो तर कळवळून इनंती केली. " दादा ! मला दोनचार लेकरं हायती. मला मारु नगं रे ! " तरी निल्या राकेसावनी हासला आन् त्याच्या पोटात चाकू हानला ... त्या मागनं साळा सुटल्यावर बाळ केशव आला. त्याच्या जवळ पांच रुपय व्हते. जेवढे झाले तेवढें म्हणून निल्या त्याचाबी निकला लावला.

आज तर म्हातारी बेमार व्हती. घेतलेली सारी संपत्ती त्याला पुरतच न्हवती. फुकाचा पैसा हा न्हात न्हाय म्हंत्यात खरंच व्हय त्यो डाकू हाय म्हणुन त्याला सारे दुसमानच झाले व्हते. त्याला कोणी बी बोलना तवा त्यो ह्या काळघा रातचं इतं आला व्हता. ह्या काळघा रातचं त्यो काळं काम करणार व्हता. त्याला म्हायतच हाय की पोलीस लोक त्याच्या पाळती-वर हायेत म्हुन. तरी बी त्यो लई हिंमतवान व्हता. कुटं तरी पायापाशी दूर काजवा चमचम करीत व्हता निल्या ठरविलेल्या जागेवर टपून बसला. तोंच वाट-वरचा पाचोळा वाजला मग निल्या सावध झाला. तो चाकू लई हुशारीनं धरला व गुडघा टेकून तयारीने बसला. पाचोळ्याचा आवाज थोडं थोडं जवळ येत व्हतं. वाळलेली पानं चर चर असा आवाज काढीत व्हती. खरंच एक माणूस जवळ आला नीट येवून निल्यासमोर उभा न्हायला. निल्या चाकू रोखूत बोलला.

"कोण रं तू ? कुटनं आलास ? "

"मी दिल्लीचा सी. आय. डी. इन्पेक्टर."

"सी. डी. बी फी डी...कीटी...हे काय लाव-लास." निल्याला त्याचं कायबी समजलं न्हवतं. तरी त्यो माणूस त्याला म्हणाला, "निलकंटराव ! आता संपलं तुमचं सारं काम." यावर निल्या म्हणाला,

"काय ? मी ! ह्या वागाला कोणी धरू सकणार न्हाय...साली दुनियाची" परीक त्यो माणूस शिटी मारताक्षणी चारी बाजुनी बॅटऱ्या चमकल्या व पंचीस-तीस पोलीस पुढं आले व निल्याला हातकडी बसली.

"निल्या ! तुजी माय कालच मेली. तुझ्या पापी हातान तिच मढं आमुद व्हईल म्हणून हामी तिला पुरून तिची समाधी बांदलोत. निल्या ! तू आयला काय दिल्यास रं ! आता तूला कोण हायरं ! तुझ्या हाइत आता चार भिंतीच रं ! " पोलीसामधूनच कोणी शेजारी बोलत व्हता. निल्या कळवळून म्हणाला, "सरकार ! मजी आकरी इच्छा एक हाय वं, मज्या मायची समादी मी बगतो वं." तो रडू लागला. मग त्याला त्याच्या गावी नेऊन त्याच्या आईच्या समाधी-जवळ नेण्यात आलं. समाधीवर फुलं सुकलेली व्हती. निल्या समाधीवर धाडकन पडुन ती सुकलेली फुलं भिजवू लागला "माय! मला क्षमा कर गं...मी पापी गं...माय..." त्याच्या डोकीखाली एक कोमल फूल कुस्करलं गेलं. तो रडत व्हता...अश्रू गाळीत व्हता.

## जगातील वैचित्र्य

जपानी लोक संध्याकाळी जेवण झाल्यानंतर स्नान करत असतात.

जगांतील सर्वात मोठा राजवाडा रोम मध्ये आहे त्या राजवाडयाचे नांव 'व्हेटिकन' असे आहे.

डेमलर नावाच्या एक जर्मन पुरुषानें सर्व प्रथम १८८५ साली लाकडी मोटार सायकल बनविली.

ढेकणांची मिशी दोन केसांनी बनलेली असते व तिची लांबी एक पंचमांश इंच असते.

'ऑस्ट्रेलिया' हा ग्रिक शब्द आहे. त्याचा अर्थ दक्षिण देश असा होतो.

जगांतील सर्वात जास्त वजनदार मुलाला ब येथे राहाणाऱ्या 'मेरी किंच' नांवाच्या तरुणीनें जन्म दिला जन्मलेंल्या बाळाचे वजन १७ पौंड व ३० औंस असल्याचे आढळून आले.

# नाट्याचार्य खाडिलकर

देवीचरण राठौर,
( कला उपान्त्य )

खाडिलकरांच्या नाटयलेखनातून प्रकट होणारी त्यांची वाङ्मयमूर्ती ही उग्रप्रकृति व विलक्षण तत्त्वनिष्ठ आहे. खाडिलकरांचा मितभाषणीपणा, त्यांची प्रखर तत्त्वनिष्ठा, त्यांच्या आचारविचारातील विलक्षण शिस्त, त्यांच्या मनाचे औदार्य, त्यांचे द्रष्टेपण, प्रसिद्धी-पराङ्मुख वृत्ती, कर्तव्य बुद्धी, निर्भयता अशा किती तरी गुणविशेषाने त्यांचे व्यक्तीमत्व नटलेले आहे. अनेक व्यक्तींनी काकासाहेबांसंबंधीच्या आपल्या आठवणी नोंदल्या आहेत. प्रत्येकांना वेग-वेगळया संदर्भात खाडिलकरांच्या विविध विशेषांची जाणीव झाली. असे असले तरी त्यातून साकारलेले त्यांचे व्यक्तिमत्व मात्र एकसंध असेच आहे.

खाडिलकरांचे जीवनचरित्र थोडक्यात असे सांगता येईल. इ. स. १८७२ साली त्यांचा जन्म झाला. वयाच्या १७ व्या वर्षी म्हणजे १८८९ साली ते मॅट्रीकची परीक्षा उत्तीर्ण झाले. मॅट्रीकची परीक्षा उत्तीर्ण झाल्या-नन्तर त्यांनी ' फर्ग्यूसन ' कॉलेजात प्रवेश घेतला. केवळ अेकच वर्ष ते या कॉलेजात राहिले. १८९१ साली त्यांनी डेक्कन कॉलेजात प्रवेश घेतला. ' तत्त्वज्ञान ' हा विषय घेऊन १८९२ मध्ये ते बी. ए ची परीक्षा उत्तीर्ण झाले. या नन्तर १८९५ साली त्यांनी एल. एल. बी. चा चा अभ्यास सुरु केला. याच वर्षी न. चिं. केळकर व श्री. कृ. कोल्हटकर यांच्याशी त्यांचा परिचय झाला. ' सवाई माधवरावांचा मृत्यु ' चे त्यांनी कोल्हटकर यांचेजवळ वाचन केले व ' विस्तारां ' तून त्याला प्रसिद्धीही मिळाली. त्यानन्तर १८९६ मध्ये 'विस्तारां' तील 'ब्राह्मण व त्यांची विद्या ' या ग्रंथावरील टीकात्मक निबंधामुळे लो. टिळकांशी त्यांचा परिचय झाला. याच वर्षी त्यांचा ' केसरी ' शी संबंध आला. १ व ८ सप्टेंबर १८९६ च्या केसरीत ' राष्ट्रीय महोत्सव ' हा त्यांचा पहिला अग्रलेख प्रकाशित झाला. याच वर्षाच्या नोव्हेंबर महिन्यांत विजापूरचा मोडकळीस आलेला किल्ला पाहुन ' कांचनगडची मोहना ' या नाटकाची त्यांना कल्पना सुचली. १८९७ मध्ये त्यांनी केसरीत प्रवेश केला. १८९९ मध्ये लो. टिळकावर राजद्रोहांचा खटला भरण्यात आला. १९०१ मध्ये ' गनिमी काव्याचे युद्ध ' ही त्यांची लेखमाला प्रकाशित झाली.

दि. २४–१२–१९०१ ला 'कांचनगडची मोहना ' या नाटकाचा पहिला प्रयोग पुणे येथे सादर करण्यात आला. १९०२ साली त्यांनी नेपाळकडे गमन केले. १९०२ ते १९०५ या कालखंडात त्यांचे नेपाळला वास्तव्य होते. दरम्यान त्यांच्या ' कांचगडची मोहना ' या नाटकाच्या प्रयोगाने महाराष्ट्र नाटक मंडळीची सुरवात झाली ( इ. स. १९०४ ). त्यानन्तर ते नेपाळ-हून सांगलीला परतले आणि ' केसरी ' शी पुनः संबंध प्रस्थापित केला.

वयाच्या ३५ व्या वर्षी ( इ. स. १९०७ ) ते तिसऱ्या नाटयसंमेलनाचे अध्यक्ष झाले. १९०८ साली लो. टिळकांना ६ वर्षाची काळयापाण्याची शिक्षा झाली. आणि याच वर्षी त्यांनी ' केसरी ' चे संपादकत्व स्विकारलें. याच काळात ते ' मराठयाचे ' चे संपादन करीत होते. १९०९ मध्यें जॅक्सनचा खून झाला. लंडन-टाईम्स मध्यें किंकेड यांनी ' कीचक वधा ' वर दोन लेख लिहिले, आणि खाडिलकरांवर राजद्रोहाचा आरोप ठेवण्यात आला. १९१० मध्ये त्यांच्या ' कीचकवध ' या नाटकावर बंदी व जप्ती आणण्यात आली. याच वर्षी त्यांनी ' केसरी ' चे संपादकत्व सोडले. १९१३ मध्ये त्यांची बाल्कन युद्धावरील लेखमाला प्रसिद्ध झाली. १९१४ साली त्यांनी

'चित्रमय जगत्' मधील महायुद्धावरील लेखमालेला प्रारंभ केला.

इ. स. १९१७ मध्ये वयाच्या ४५ व्या वर्षी, पुण्यास झालेल्या नाटयसंमेलनाचे ते अध्यक्ष होते. १९१८ मध्ये लो. टिळक अिंग्लंडला गेल्याने त्यांनी पुन्हा 'केसरी' चे संपादकत्व स्विकारले. त्याच्या पुढल्याच वर्षी १९१९ मध्ये त्यांनी 'द्रौपदी' च्या लेखनासाठी ४ महिन्याची रजा घेतली. या रजेनन्तर त्यांनी 'केसरी' चे संपादकत्व सोडले, पुन्हां त्यांचा 'केसरी' शी संबंध आला नाही. १९२१ साली त्यांनी 'लोकमान्य' या पत्राचे संपादन केले. याच वर्षी गांधर्व महा-विद्यालया तर्फे झालेल्या संगीत परिषदेचे ते अध्यक्ष होतें. १९२२ ला त्यांनी 'लोकमान्या' चे संपादकत्व सोडले. १९२३ च्या एप्रिल महिन्यात 'नवाकाळ' दैनिकाची सुरवात झाली. पण १९२५ मध्ये या दैनिकाचे रुपान्तर साप्ताहिकात करण्यात आले.

इ. स. १९२९ मध्यें राजद्रोहाच्या खटल्यात खाडिलकरांना १ वर्षाची शिक्षा झाली. तुरुंगवासाच्या काळात त्यांनी 'सावित्री' चे लेखन केले. १९३३ साली नागपुरात झालेल्या १८ व्या साहित्य-संमेलनाचे ते अध्यक्ष होते. याच वर्षी सांगलीला दत्तमंदिराची प्रस्थापना करण्यांत आली. १९३३ ते १९३८ या कालखंडात दरवर्षी उन्हाळयात व दिवाळीत सांगलीला येऊन अध्यात्मावर प्रवचने देत. १९४० ला 'पहिले महायुद्ध (१९१४–१८)' मध्यें चित्रमय-जगत् मासिकातील लेखाचे संकलन केले. या नन्तर मृत्युपर्यंत (इ. स. १९४८) त्यांनीं अध्यात्मीक विषया-वर तेजस्वी प्रवचने दिलीं; यात 'संध्यावन्दन व पुरुषसुक्त', 'तैत्तिरीयोपनिषद्', 'ॐ काराची उपासना', 'याज्ञवल्क्य-मैत्रेयी संवाद', त्रिसुपर्णाची शिकवणूक' आणि 'ऐतरेया' आणि ईशावास्योप-निषद्' अशा विविध विषयांचा उल्लेख करता येईल.

खाडिलकरांसंबंधीच्या आठवणी वाचतांना एक गोष्ट लक्षात येते ती अशी की खाडिलकर एकाला एक प्रकारचे व दुसऱ्याला दुसरे असे कधीच भासले नाहीत. त्यांच्याविषयीच्या आठवणीतून व्यक्त होणारे त्यांचे व्यक्तिमत्व एकसंघ आणि तेजस्वी असे आहे. राज-कारणाच्या क्षेत्रात वावरुन ही ते सत्ता, अधिकार, संपत्ती, या पासून अलिप्तच राहिले. खाडिलकर केवळ अध्यात्मवादी विचारसरणीचे नव्हते तर अध्यात्मविचार त्यांनीं पूर्णपणे आत्मसात केलेला होता. त्याच्यामुळेच त्यांच्या अंगी निर्भयवृत्ती बाणलेली दिसते. अशी निर्भय-वृत्ती केवळ श्रेष्ठ दर्जाच्या अध्यात्मवाद्यांच्या ठिकाणी दिसते. तत्त्वनिष्ठा, निर्भयवृत्ती निष्काम कर्मवाद आणि अध्यात्मपरता अशा गुणाविशेषांनी विशोभीत झालेल्या टिळकांच्या व्यक्तिमत्वाचे त्यांना आकर्षण वाटणे सहाजिकच होते. ते पुरुषार्थाचे उपासक होते. टिळकांच्या तेजस्वी व्यक्तीमत्वात त्यांना या पुरुषार्थाचा साक्षात्कार झाला. त्यांनी आपल्या नाटकातून पुरुषा-र्थाची चित्रे सतत रेखाटली. जी श्रेष्ठ मूल्ये त्यांनीं पूजनीय मानली ती आचरलीं ही आणि या मूल्यांचा त्यांनी आपल्या नाटकातून जयजयकारही केला. त्यांचे प्रभावी व्यक्तिमत्व त्यांच्या नाटकातून राम, हरिश्चन्द्र, श्रीकृष्ण, रामशास्त्री, भीम अशा व्यक्तीचित्रातून प्रकटते.

खाडिलकरांचे नाटयलेखन १८९८ ते १९३६ च्या दरम्यान असले तरी त्यांच्या नाटयप्रतिभेच्या उमेदीचा काळ म्हणजें १९०६ ते १९२०, साधारणतः पंधरा वर्षांचा या काळातील उल्लेखण्यासारखी नाटके केवळ पांचच आहेत. 'कांचनगडची मोहना' (१८९८) 'मेनका' १९२६, 'सवती मत्सर' (१९२७), 'सावित्री' (१९३३) व 'संगीत त्रिदंडी संन्यास' (१९३६). अुरलेली दहा नाटके १९०६ ते १९२० या काळात रंगभूमीवर अवतरली. १९०६ ते १९१४ या नऊ वर्षांच्या काळात तर अेकन्दर आठ नाटकें रंग-भूमीवर अवतरली. या काळात प्रत्येक वर्षी एक तरी नवे नाटक रंगभूमीवर अवतरतांना दिसते. 'सवाई माधवरावांचा मृत्यु', 'कीचक वध', भाऊबंदकी', 'मानापमान' 'विद्याहरण' आणि 'सत्त्वपरीक्षा', ही उत्तम नाटकेही याच काळातील त्यानन्तर 'स्वयंवर' (१९१६) व 'द्रौपदी' (१९२०) ही नाटके महत्वाची आहेत. या दहा-पंधरा वर्षांच्या काळात एका-मागून-एक अशी सरस नाटके रंगभूमीवर येण्याचे दृश्य मराठी साहित्यात अपूर्व आहे !

खाडीलकरांच्या ऐन उमेदीच्या काळात गडकऱ्यांची नाटके एका मागून एक अशी रंगभूमीवर

अवतरली. त्यांची सर्वच नाटके अत्यंत यशस्वी ठरली. गडकऱ्यांच्या आकर्षक नाट्यलेखनाने, श्रीपाद कृष्णाचे लेखन निस्तेज करून टाकले; पण खाडिलकरांवर मात्र याचा काहीच परिणाम झाला नाही. खाडीलकरांकडे गडकऱ्यांसारखे असामान्य कल्पना वैभव नव्हते, त्यांचे चकित करणारे कोटित ही नव्हते आणि भाषेचा चमकदारपणाही नव्हता; पण खरेखुरे नाटक म्हणजे काय, याची त्यांना पुरेपुर जाणीव होती. विविध आणि प्रभावी नाट्य प्रकट करण्याची असामान्य शक्ती आणि श्रेष्ठ दर्जाची वैचारिकता त्यांच्याकडे होती. खाडिलकरांच्या नाटकाचा पाया भक्कम असल्यामुळे त्यांची नाटके, गडकऱ्यांच्या नाटकांच्या ऐन उमेदीच्या काळात ही खंबीरपणे उभी राहिली.

संगीत रंगभूमीचा हा ऐन वैभवाचा काळ होता. या सर्वातून आगळेपणाने रसिकाचे लक्ष वेधून घेणे तितकेसे सोपे नव्हते, पण हे सर्व खाडिलकरांच्या नाटकांना सहजगत्या साधले. त्यासाठी त्यांना वेगळे प्रयत्न ही करावे लागले नाहीत. शिवाय त्यांनी जाणीवपूर्वक नवे प्रयोग फारसे केलेले नाहीतच. त्यांनी आपल्या नाटकाची रचना शेवटपर्यंत बदलली नाही. १९१०–११ मध्ये त्यांनी आपल्या नाटकाची जी रचना ठरविली ती १९२० नंतरही तशीच राहीली.

'कांचनगडची मोहना' पासून ते 'स्वयंवर', 'द्रौपदी' पर्यंतचा त्यांचा नाट्यलेखनाचा प्रवास लक्षणीय आहे. यातील महत्त्वाचे टप्पे म्हणजे 'कीचकवध' 'भाऊबंदकी', आणि 'विद्याहरण' हे होत. श्रेष्ठ दर्जाच्या व्यक्तीमत्त्वात दडलेले स्वभाव नाट्य आणि त्या व्यक्तिमत्वाच्या संघर्षातून निर्माण होणारे विचार नाट्य अशी खाडिलकरांची तेजस्वी नाट्यप्रतिमा वर उलेखिलेल्या नाटकातून प्रकटते. एवढे मात्र निश्चित की त्यांच्या नाटकाची गुणवत्ता 'संगीत त्रिदंडी सन्यास' (१९३६) मध्ये कमी झालेली दिसते एवढा अपवाद सोडला तर बाकीची सर्वच नाटके अत्यंत उच्च दर्जाची आहेत. त्या नंतर 'मेनका' (१९२६), 'सवतीमत्सर' (१९२७) आणि 'सावित्री' (१९३३) या त्यांच्या उत्तरकालीन नाटकात तेच प्रभावी दडलेले व्यक्तीमत्व अवतरलेले असले तरी त्यात 'कीचकवध', 'भाऊबंदकी', 'स्वयंवर' मधला जोम नाही.

## जगातील वैचित्र्य

फ्रान्सचा थेमिनिक पासेन या नावाचा एक मनुष्य स्वतःचा एक केस परत मिळविण्यासाठीं सतत २३ वर्ष कोर्टात भांडत होता.

卐 卐

श्रीमती फ्रेडरीक कुक नावाच्या एका स्त्रीनें ९५,१४० शब्द संख्या असलेले मृत्यूपत्र लिहिले होते.

卐 卐

आश्चर्यानें तोंडात बोटे घालण्याची गोष्ट अशी की रॉबर्ट स्वीनी या नांवाचा एक मुलगा आपल्या बोटांना गाठी मारीत असे.

चीन मध्ये मुलगा झाल्यास आनंद प्रदर्शीत करण्यासाठी घरोघर लाल अंडी पाठविण्याची प्रथा आहे.

卐 卐

आश्चर्याची गोष्ट ही की, ब्रह्मी लोक चिनि लोकांना आपले चुलत भाऊ समजत.

卐 卐

जपानमधील एका क्लबचा सभासद होण्यासाठी एक अट घातलेली आहे. ती अट अशी – 'ती व्यक्ती दीड फूट दाढी असलेली असावी.'

# साहित्यसम्राट न. चिं. केळकर

कळसकर गंगाधर,
पी. यू. सी. ( कला )

साहित्य सम्राट कै. न. चिं. केळकर यांचा जन्म २४ ऑगस्ट १८७२ मध्ये झाला. केळकरांना संपूर्ण महाराष्ट्र ओळखतो. ह्यांना महाराष्ट्र सरकारने 'साहित्य सम्राट' ही पदवी बहाल केली. केळकरांना सृष्टीचे देण म्हणतात. केळकरांनी 'भारतीय तत्त्वज्ञान' हा ग्रंथ १९३४ मध्ये प्रसिद्ध केला. १९४६ मध्ये 'ज्ञानेश्वरी सर्वस्व' हा ग्रंथ प्रसिद्ध झाला. 'एलथडीचा मोक्ष' हा मौल्यवान लेख त्यांच्या १९४८ मध्ये निधनानंतर प्रसिद्ध झाला. १८९८ ते १९१५ मध्ये त्यांनी 'गीतेती समतावाद,' 'संस्कृतीची मीमांसा,' स्मृतिची आवश्यकता,' महाभारत ग्रंथाचे संशोधन, विश्राम मंडळातील, 'वेदमहोत्सव', 'येशुख्रिस्ताचे तत्त्वज्ञान' यासारखे व्यावहारीक व आध्यात्म चिंतनपर विचार करणारे असे अनेक लेख केळकरांनी लिहीले आहेत.

**तत्वज्ञान म्हणजे काय** : तत्वज्ञान म्हणजे रीकामपणाची कामगिरी असा समज आहे. सामान्य माणसाच्या गैरसमजाचे निराकरण करून त्यांना विषय समजाऊन सांगण्यासाठी केळकर विनोद नेहमी देतात. तत्वज्ञान म्हणजे काय ? आंधळ्या कोशींबीरचा खेळ आहे. पण केळकर म्हणतांत तसा समज खोटा आहे. आपल्या रिकामपणाचा उपयोग निःस्वार्थीपणे सखोल चिंतन करुन ते जनतेंस समाजावुन सांगणे. तत्वज्ञान म्हणजे फिलॉसाफी. हा मूळ ग्रीक शब्द सोफीया म्हणजे शहाणपण फिलीत म्हणजे प्रेम करणे. शहाणपणा विषयांचे प्रेम म्हणजेच फिलॉसाफी मनुष्य शहाणा असतो असे काही नाही. ज्ञान धावते पण शहाणपण रांगते शहाणपण हे परिस्थिती सापेक्ष असते. ज्ञान हे परिस्थिती निरपेक्ष आहे. असे सर्व गुण संपन्न म्हणजे ईश्वर आहे. शहाणपणाद्वारे ईश्वरप्राप्तीची श्रेयाची महत्वकांक्षा प्रत्येकानी बाळगावी. तत्वज्ञान हेच शिकवत असते. असे केळकरांचे मत आहे.

**केळकरांचे डौलदार निबंध** : तात्यासाहेब केळकरांच्या इतका बहुश्रुत निबंधकार आपणांस मराठीत क्वचितच भेटेल. मराठी निबंध हा वृतपत्रांतून व नियतकालिकातुन विकास पावत आला. आगरकर, टिळक, परांजपे, यांचे वृतपत्रातील अनेक अग्रलेख आज विवेचन म्हणून आज आपल्यासमोर आहेत. केळकरांचे पुष्कळसे निबंध प्रथम वृत्तपत्रातून अग्रलेख म्हणून लोकांपुढे आले. तरी त्यांच्यात वाङ्मयगुणांचा आढळ सर्वत्र होतो. वृत्तपत्रीय लेख व निबंध यांत तसा थोडासा फरक आढळतो. केळकरांची लेखणी इतकी स्वतःसिद्ध होती की वाङ्मय गुणांचा स्पर्श त्यांच्या सर्वच लेखनाला झाला आहे. 'भविष्य-कथन' भाषा व राष्ट्रीयत्व 'येशू ख्रिस्ताचे तत्वज्ञान बुद्धी प्रामाण्य' हास्यरसांचा व्यावहारिक उपयोग इत्यादी निबंध आजही आपणास विचार प्रवर्तक वाटतील असे केळकरांचे निबंध आहेत.

**दुर्मिळ गुणसंपदा** : केळकरांचे व्यक्तिमत्व हा एक दुर्मिळ गुणसंपदेचा मिलाफ होता. प्रांजळपणा व सद्हृयता, ज्ञाननिष्ठा व सौजन्य समतोलपणा व औचित्य विवेक मध्यक्रमाचे अनुसरण व स्वतंत्र विचारशैली असे अनेक गुण या थोर पुरुषाच्या ठायी संमिलित झालेले दिसतात. या गुणांचा प्रभाव केळकरांच्या निबंध लेखनावर पडला असल्यास त्यांत नवल नाही प्रसादमय अलंकारयुक्त भाषाशैलीचे वरदान केळकरांना प्रथमपासूनच लाभले. उग्र, प्रखर, स्वरुपांचे प्रचारकी थाटांचे घणाघती असे निबंध केळकरांनी क्वचितच लीहींले वाचकांचा ज्ञानकोश समृद्ध करणारे विचार घण मोठ्या प्रयासाने गोळा करुन ते मराठी जनतेच्या पदरी बांधण्याचे बहुमोल कार्य निबंधकार केळकर आजन्म करीत राहीले. ज्ञान लालसा असलेला असा एक विशीष्ट रसिक वाचकवर्ग केळकरांना लाभला होता. केळकर त्यांची भूक आपल्या लेखणीने सदैव भागवीत होते.

**केळकरांची लोकप्रियता** : तात्यासाहेब केळकरांनी जीवनांतल्या सर्व गोष्टींवर प्रेम केले. पण त्या प्रेमांत

स्वत:ला कोठे झोकून दिले नाही. संगीतातल्या चीजांच्या मराठी करणापासून ते भारतीय चलनपद्धतीपर्यंत नाना विषयांवर त्यांनी लेख लिहीले. ललित साहित्यातल्या तर प्रत्येक शाखेत त्यांनी लेखणी चालवली. निरनिराळी सार्वजनिक कार्य करण्यासाठी उभारलेल्या संस्थाची अध्यक्षपदे भूषविली. कुठे सल्लागार झाले, कधी अंगचोरपणा केला नाही. म्हणून त्यांना लाभलेल्या प्रतिष्ठेला लब्धप्रतिष्ठित पणाचा डाग लागला नाही. केळकर म्हणतात की नेटका प्रंपच करणे म्हणजें राष्ट्रसेवेत उणें पडणें अशी आजहि सार्वजनिक जीवनांत कार्य करणाराविषयी समाजाची कल्पना असते. देशासाठीं फकिर हे इमेज लोकांना पाहायला फार आवडते. केळकरांनी ती इमेज पुरवली नाही. पण केळकर लेखणी आणि वाणी ही दोन साधने लोकांसाठीच वापरली. तिथें मात्र त्यांनी कंटाळा केला नाही. ते कधी वाचनाला कंटाळले नाहीत. लेखन तर अव्याहत चालू असे. भाषणांचा आमंत्रण नसलेला एकही आठवडा त्यांनी सार्वजनिक आयुष्यांत प्रवेश केल्यानंतर गेला नसेल. त्यांचे अध्यक्षपद हा कधी कधी थट्टेचा विषय व्हायचा पण तात्यासाहेबांचे अध्यक्षीय भाषण त्यांचीच उपमा द्यायची झालीतर संमारंभाच्या पोहचावर ताज्या खोबऱ्यांची पखरण करुन समारंभ अधिक रुचकर करून जात असे. लोकमान्याच्यासारख्या ज्वालामुखीच्या सहवासांत तात्यासाहेब फुलले. तात्यासाहेबांची सारी लोकप्रियता त्यांच्यातल्या अलौकिकापेक्षा लौकिकत्वातच होती. अलौकिक गुणामुळे त्यांचे साहित्य सम्राट्‌पदाला चढले नाही. ललित साहित्यांचे इतके प्रकार त्यांनी हाताळले, पण डोळे दिपऊन टाकील किंवा वैचारिक धक्याने डोक्याला झीण झीण्या आणील अशी मराठी साहित्यात त्यांची कुठलीही कृति नाही. त्यांच्या यशाचे रहस्य असामान्यत्वाच्या अफाट उंचींत नाही. परन्तु आपल्या सारख्याच पण वितभर अधिक उंच. तात्यासाहेबानी मध्यम वर्गीय माणसाला अतिशय आवडणारी अशीप्रीत प्रतिमा दिली ते केवळ केळकर कुटुंबांना आधाखंड नव्हे तर गुण्यागोंविदाने एकत्र नांदनारे कुटूंब ह्या कल्पनेत जो आधारवड सारीच मध्यम वर्गीय माणसे पहात असत किंवा आजही पहात असतील त्यांना हवीहवीशी वाटणारी कुंटूबप्रमुखाची मुर्ती तात्यासाहेबांच्यात पहावयास मिळाली. धन्यो-ग्रहस्थाश्रम असे मानून जगणारांना त्यांच्यामध्ये आदर्श ग्रहस्थ आढळला. कलांचे भोक्ते होते. अध्यात्माचे अभ्यासक पण अंगास भस्म लाऊन हिमालयांची वाट धरणारे नव्हते. मोडण्याऐवजी जोडण्याकडे प्रवृत्ति होती. जीवनातल्या विसंगतीचे दर्शन नर्म विनोदातून घडविणारा असा हा पुरुष तत्कालीन मराठी समाजाला आदर्श पिता वाटत होता. संपादकीयाबद्दल राजद्रोहाचा खटला होऊन त्यांना सजा झाली. सोलापूरला मार्शल लॉ पुकारुन ब्रिटीश सरकारने हत्याकांड चालविले. त्या काळांत केळकर अग्रलेख लिहीले तेव्हां त्यांच्यावर राजद्रोहाचा खटला भरण्यांत आला. तेव्हां त्यांना चार पांच वर्षें तुरुंग भोगावे लागले.

मंत्र न जपणारा मनाचा मवाळ आणि वाचेचा रसाळ असा हा देखणा वृद्ध रसाळपणांतही बरक्या फणसासारखा गिळगिळीत गोडवा असणारा नव्हे काप्यासारखा बांधेसुद टपोरे आणि मधूर बोलणारा अनेक संस्थांच्या आणि व्यक्तिच्या अडीअडचणीला उभा राहिलेला माणूस सुशिक्षीत समाज त्यांच्याकडे पाही.

तात्यासाहेब केळकर हे महाराष्ट्रांतले शेवटचे नेते. एका दीपावलीच्या प्रंसगी त्यांनी मनांच्या कृतकृत्य अवस्तेला मृत्यूस अवाहान केले. मृत्युने ही त्यांच्या अवाहनास प्रतिसाद देताना सभ्यतेच्या मर्यादा सोडल्या नाहीत. सभ्यतेने पाचारण करुन आजवर अनेक संस्थाच्या कार्यवाहानीं त्यांना आपआपल्या गावी नेले होते. तशाच सभ्यतेनें इहलोकातून परलौकात नेले. असंख्य भिजलेल्या डोळयांनी त्यांना श्रद्धांजली वाहीली. नाना तऱ्हेच्या ऋणांनी बांधलेले समाजातल्या सर्व थराचे लोक त्यांच्या अंतयात्रेत होते. जुन्या गृहस्थाश्रमी सभ्यतेच्या कल्पनांना एवढया प्रंचड प्रमाणांत लाभलेली ती शेवटची श्रद्धांजली होती.

लोकमान्याचे निधन टिळक युगांचा सूर्यास्त होता. केळकर वारले आणि त्या युगांचा चंद्रास्तही झाला.

# नटवर्य केशवराव दाते

दीपक कासराळीकर,
कला ( अंत्य )

मराठी रंगभूमीच्या नभोवितानात अपूर्व दीप्तीने तळपलेला आणखीन एक तेजस्वी तारा नटवर्य केशवराव दात्यांच्या निधनाने निखळून पडला. बालगंधर्वाच्या निधनानंतर हा मनाला सुन्न करून टाकणारा दुसरा आघात आहे. ५० वर्षांहून अधिक काल त्यांनी मराठी रंगभूमीची सेवा केली. स्त्री भूमिका देखील त्यांनी उत्तम रितीने वठविल्या. जिवापाड परिश्रम व अभ्यास करण्याची जिद्द आणि भूमिकेशी तन्मय होण्याची क्षमता हे दोन्ही गुण त्यांच्या ठिकाणी प्रकर्षाने होते. आणि त्यांच्या यशाला मुख्यत्वे करून हेच कारणीभूत होते. रंगभूमीवरील नट चित्रपटात यशस्वी होतोच असे नाही, दाते त्या क्षेत्रातही यशस्वी ठरले. हट्टाग्रह, अहंभाव, सर्वज्ञतेची वृत्ती, मी पणा ह्या गोष्टी त्यांच्या स्वभावातच नव्हत्या, उलट नवनवीन शिकण्याची वृत्ती, परिश्रम करण्याची तयारी आणि दुर्दम्य असा आत्मविश्वास यांनी त्यांचे व्यक्तीमत्व जोपासले होते. चित्रपटसृष्टीत व रंगभूमीवर यश मिळविण्यास त्यांचे हेच व्यक्तीमत्व कारणीभुत आहे. ते आदर्श गुरु आदर्शशिष्य होते.

आदर्शशिष्य ह्या नात्याने 'महाराष्ट्र नाटक मंडळी 'चे नाट्याचार्य खाडिलकरांच्या कडक तालमीचा केशवरावांनी कधी कंटाळा केला नाही. उलट तो ईश्वरी प्रसादच मानला. दिलेल्या भूमिकेचा ते २४ तास चिंतन, मनन करीत. पहिल्यांदा नायक म्हणून आलें ते 'प्रेमध्वज' नाटकात ; यानंतर मिळालेल्या प्रत्येक भूमिकेचे त्यांनी सोने केले. कारण प्रत्येक कामावर भरपूर विचार केलेला असायचा, भरपूर मेहनत व्हायची आणि मनापासून काम केलेले, मग सोने होणार नाही तर काय ?

अभिनयाची विविधता हे तर त्यांचे ठसठशीत वैशिष्टच त्यांची प्रत्येक भूमिका वेगळी असायची. ज्यांच्या एका भूमिकेंसारखी दुसरी भूमिका दिसली नाही असा हाडाचा कलावंत म्हणजे केशवराव ! प्रत्येक भूमिकेचा ढंग स्वतंत्र, अगदीं अभिनव, चालणे बोलणे वेगळे, नजरेची फेक वेगळी, मुद्रेवर सुक्ष्म मनोविकारांचे दर्शन त्यांच्यासारखे अद्याप कुणी घडवूच शकले नाही. या बाबतीत सर्वश्रेष्ठ भूमिका 'आंधळ्याची शाळा' मधील मनोहरची.

अष्टपैलू हे विशेषण केशवरावांना अगदी सार्थ ठरते. हे त्यांच्या भूमिकेतील विविधता पाहताच घ्यानी येते. पाताळ यंत्री, कावेबाज औरंगजेब हा ते एवढा जबरदस्त उभा करीत की केवळ 'औरंगजेबा'साठी 'आग्र्याहुन सुटका' या नाटकाला तोबा गर्दी होत असे. 'कीचक वध' मधील 'एक घाव दोन तुकडे' या बाण्याचा भीम ते तितक्या सफाईदार रितीने रंगवीत तितक्याच सहजतेने ते सतरा उचापती करणारा केशवशास्त्री रंगवीत ( सवाई माधवरांवाचा मृत्यु ! ) या सर्व भूमिकेत त्यांनी मिळविलेले श्रेय अव्वल दर्जाचे होते. केशवराव म्हणजे मुद्राभिनयाची खाणच !

ह्या त्यांच्या सर्वगुणामुळेच महाराष्ट्र नाटक मंडळी'चा वारसा त्यांच्याकडे आपोआप आला. नाटकांची तालीम घेण्याची जबाबदारी त्यांच्या अंगावर आली. या नाटक मंडळीचे मालक होण्याचे भाग्य त्यांना लाभले ; परंतु ते पैशाच्या जंजाळात अडकलेच नाहीत. पैशाचा कारभार त्यांनी दुसऱ्याकडे सोपविला. ते फक्त कलाविभागाकडे लक्ष पुरवु लागले. भावनांची सखोलता रसपूर्ण बारकाव्यानिशी दाखवावी ती त्यांनीच ! आपल्या भूमिकेच्या अविर्भावाच्या बळावर त्यांनी रंगमंचावर स्पृहणीय यश संपादन केले.

'महाराष्ट्र'ची मालकी १० वर्षानंतर केशवरांवानी स्वखुषीने सोडली. कांही काळ 'समर्थ नाटक मंडळीत' राहुन ते नवतरुणानी सुरू केलेल्या 'नाट्यमन्वंतर'मध्ये प्रविष्ट झाले. नवे शिकावे, नवरंगभूमींच्या परिचय करून, रंगभूमीला आलेले 'स्टॅग्ने-

शन ' दूर करावे अशी स्वप्ने बाळगुन ते ' नाटच-मन्वंतरात ' आले होते. इथे त्यांनी ' लंपडाव ', ' आंधळ्याची शाळा ' ही नाटके गाजविली.

रंगभूमीला पडता काळ आल्यावर १९३५ साली ते चित्रपटसृष्टीत शिरले कुंकू, अमृतमंथन, संत तुळशीदास या सारख्या चित्रपटातून त्यांनी आपल्या अभिनयाची ताकद रुपेरी पडद्याला दाखविली. शांतारामबापूंनी 'राजकमल' सुरू केल्यानंतर ते त्यांच्या बरोबरच राहीले. दोन श्रेष्ठ, ज्येष्ठ कलावंत एकत्र आले मग एकापेक्षा एक सरस, अविस्मरणीय भूमीका या काळात या दोघातर्फे पेश केल्या गेल्या.

पाखराने आस्मानात कितीही उंच भरारी मारली तरी, त्याची दृष्टी पृथ्वीवरल्या आपल्या घरट्याकडे असते. ते घरट्याकडे परततेच. केशवरावांचे तसेच होते. रंगभुमी त्यांचे घरटे होते. त्याच्याशी त्यांनी सतत संपर्क ठेवला. नाटकांचे दिग्दर्शन केले. नाटच-महोत्सवात साहित्य संघाच्या ' भाऊ बंदकीने ' पहिला नंबर पटकावला त्याचे दिग्दर्शन केले होते ते केशवरावांनीच !

नाटक हे फक्त करमणूकीचे साधन आहे हे त्यांनी कधीच मान्य केले नाही. नाटक हेतूप्रधान हवे, समाजाला त्याने कांहीतरी दिले पाहिजे, मार्गदर्शन केले पाहिजे असे ते म्हणत. 'सत्वपरीक्षा' मधील हरिश्चंद्राची भूमिका त्यांना बऱ्याच कारणासाठी आवडे. समाज कल्याणाचे कंकण हातात बांधून नाटके लिहणारे खाडिलकर हे त्यांच्या दृष्टीने सर्व श्रेष्ठ नाटककार होते. फालतु गोष्टी रंगभूमीवर दाखवू नका असे ते म्हणत ' In life there is much, that is unworthy, which in art should be omited ' हे नेपोलियनचे वाक्य ते शिरोधार्थ मानीत.

नटवर्य दाते यांना रंगभूमी विषयी किती आदर, किती जिव्हाळा वाटत असे याची २ उदाहरणे पाहील्यास कळून येईल. ' मराठी रंगभूमीचीं काळजी करणे दात्यांनी सोडून द्यावे ' असे त्यांच्या सत्कार प्रसंगी कांहींनी सुचविले तेव्हा त्यांना उत्तर देताना हा वृद्ध तपस्वी म्हणाला ' मी म्हतारा माणूस रंगभूमीची काळजी करून करून ती किती करणार ? एखादा आजोबा गावाला निघताना नातवंडाना ' जपून रहा ' असे सांगतो ना ! तसेच मीं सांगतो आहे. त्याची नातवंडाबद्दलची काळजी त्यात व्यक्त होते, तितपतच माझी काळजी आहे, याहून अधिक काळजी मला करावयाची नाही ' आणि हे बोलताना त्यांचा स्वर बाष्पगद्‌गद् झाला होता, डोळे पाणावले होते. किती जिव्हाळा किती प्रेम !

दुसरे उदाहरण रंगभूमीच्या पवित्रपणाबद्दल, त्याच्या विषयीच्या नितांत आदराविषयीचे आहे.

' संघाच्या जुन्या, उघड्या थिएटरात ' अंमलदार ' नाटकाच्या वेळी, पादत्राणे घालून रंगभूमी कशी ओलांडायची, म्हणून हे हातात पादत्राणे घेऊन, रंगमचंकावरून पलीकडे रंगपटात गेले !

असे हे केशवराव दाते आपल्याला सोडून गेले त्यांचा मृत्यू हा मराठी रंगभूमीवरचा युगांत आहे. खऱ्या अर्थाने ते रंगभूमीचे सम्राट होते. अभिनयाची जन्मजात जाणीव त्यांना होती. त्यांच्या रुपाने रंगभूमीवरची सात्वीकता जणू अंतर्धान पावली. उत्कट व भव्य याचेच रंगभूमीवर दर्शन घडवा असे सांगणारा ' शेलारमामा ' गेला. ' गिधाडे ' काय दाखविता ' गरुड ' ही दाखवा असे तळमळीने सांगणाऱ्या तपस्वी कलावंताला महाराष्ट्र मुकला. त्या थोर नाटचसृष्टीतील ' रामा'ला शतश : प्रणाम !

## जगातील वैचित्र्य

इजिप्तमध्ये बंद पेटीतून मुलीला सासरी पोहोंचवितात.

ताश्कंद मधील एका रस्त्याचे नांव ' लाल बहादुर शास्त्री मार्ग ' असे ठेवण्यात आले आहे.

# शारीरिक शिक्षणाचे आधुनिक स्वरूप

जी. के. मांजरमकर,
फिजिकल इन्स्ट्रक्टर,

जीवनात आपणास स्वास्थ्य व सुरक्षितता लाभावी व शत्रू पासून स्वसंरक्षण करण्याचे सामर्थ्य प्राप्त व्हावे म्हणून अनादि कालापासूनच मानवाने शरीराची जोपासना करण्याचे प्रयत्न केले. तेव्हा आज आपण ज्यास शारीरिक शिक्षण म्हणतो त्याचे उगमस्थान पाहू म्हटले तर आपल्याला अति प्राचिन कालाकडेच पाहावे लागते. स्वसंरक्षण व सामाजिक स्वास्थ्य प्राप्ती याकरिता मल्लयुद्ध किंवा गदायुद्धासारख्या व्यायामाद्वारे बलसंवर्धनाची जी प्रथा त्या काळात सुरू झाली, तीत पुढे कसरतीचे व्यायाम (gymnastics) सांघिक व मनोरंजक खेळ यांचेही नवे प्रवाह मिसळलें. त्यामुळे शारीरिक सुदृढतेबरोबर फुरसतीच्या वेळेचा सदउपयोग करण्याचा एक नवा मार्ग अनायासे उपलब्ध झाला.

## शारिरिक शिक्षणाची तात्विक भूमिका

शारीरिक शिक्षणास प्रथम तात्विक बैठक दिली ती ग्रीक राष्ट्राने. त्या राष्ट्रातील लोकांनी शारीरिक शिक्षण हे वयक्तिक विकासाबरोबर समाज स्वास्थ्यासही आवश्यक आहे. या विचाराची जोपासना केली. आजच्या युगात मैदानी खेळ ह्या नावाने 'ऑलिम्पिक स्पर्धांत' 'सिंहाचा वाटा' असणाऱ्या धावणे, उड्या मारणे, भाला फेंकणे इत्यादी क्रीडा प्रकाराची सुरवात प्रथम ग्रीसमध्ये झाली. आणि ह्या ऑलिम्पिक सामान्याद्वारे स्पर्धक राष्ट्रांत स्नेहभावाची विश्वबंधुत्वाची आणि खेळाडूंमध्ये खिलाडू वृत्तीची जोपासना होऊ लागली.

अशा रीतीने मानवीं मूल्याचे जतन करण्याचे एक प्रभावी साधन म्हणून ग्रीकांनी शारीरिक शिक्षणाचा उपयोग केला. तर रोमन लोकांनी शारीरिक शिक्षणाचा वापर मुख्यत: सैनिकीकरण करण्याच्या हेतूने केला. व त्या दृष्टीने पोहणे, घोड्यावर बसण अडथळयांच्या शर्यती इत्यादीवर अधिक भर दिला. जर्मनीने खुल्या मैदानावरील कसरतीचें व्यायाम (out door gymnastics) अवजड साधनयुक्त व्यायाम (Heavy apparatus) सांघिक कसरतीचे व्यायाम (mass gymnastics) याची महत्वपूर्ण भर घालून शारीरिक शिक्षणाचे क्षेत्र व्यापक व संपन्न बनवले. ब्रिटिशांना सांघिक खेळ फारप्रिय त्यातूनच संघभावना व खिलाडू वृतीचा विकास करण्याचा प्रयत्न त्यांनी केला.

## शारिरिक शिक्षणात भारताची परंपरा

ह्या क्षेत्रात भारताने काय केले हे पाहू गेले तर शारीरिक शिक्षण द्वारे शरीरसंवर्धन, स्वसंरक्षण, राष्ट्र रक्षण व मनोरंजन या सर्वच गोष्टीवर भारताने भर दिली आहे असे दिसून येते. दंड, बैठका, सूर्यनमस्कार, आसने, कुस्ती, दांडपट्टा, लाठी, मलखांब लेझीम, नृत्य इत्यादी विविध व्यायाम प्रकाराचा समावेश भारताने आपल्या पद्धतीत केला आहे. खोखो कबड्डी, आट्यापाट्या या सारखे विना साहित्य व लहान जागेत खेळता येण्या जोगे खेळहि भारताच्या शारीरिक शिक्षणाचा एक महत्वाचा भाग आहे. उतारवयातसुद्धा शरीरस्वास्थ व निकोप प्रकृतीचे ऐश्वर्य प्राप्त करून देणारी 'योगासने' तर आज आंतरराष्ट्रीय मान्यता मिळवीत आहेत.

## शारीरिक शिक्षणातील प्रचलित वाक्प्रयोग

शिक्षण क्षेत्रात शारिरिक शिक्षणास मान्यता मिळण्यापूर्वीपासून कांही शब्दप्रयोग प्रचलित आहेत ते असे.

१. शरीर संवर्धन (Physical Culture)
२. शरीराभ्यास (Physical Training)
३. व्यायाम (Physical exercise)
४. खेळ (Sports)
५. कवायत (Drill)

ह्या निरनिराळ्या शब्द प्रयोगांतून शारिरिक शिक्षणाचा व्यापक अर्थ अभिप्रेत न होता त्याच्या काही विशिष्ट उपांगावर भर देऊन या विषयाचे क्षेत्र मर्यादित झालेले आढळून येते.

**१. शरिर संवर्धन** ( Physical culture )

शरीराला रेखीव व आकर्षक आकार प्राप्त व्हावा ह्यासाठी स्नायु संवर्धन करण्याची पद्धत बरीच जुनी आहे. ह्या प्रकारात वैयक्तिक व्यायाम, वजन उचलणे स्प्रिंगचे व्यायाम, डंम्बेल, कसरतीचे व्यायाम, ( Gymnastics ) इत्यादीचा समावेश स्नायुसंवंधक व्यायाम पद्धतीत होतो. या पद्धतीतून जरी प्रभावी व्यक्तीमत्व व डौलदार शरीर तयार करण्याचे प्रयत्न होत असेल तरी तीत काही दोष आहेत.

स्नायुसंवंधनाबरोबर शरीर विकास होतोच असे नाही. चापल्य, दमदारपणा, शारिरिक हालचालीचे कौशल्य इत्यादिंचा प्रभाव असा मानसात असू शकतो. स्नायुसंवर्धक व्यायाम पद्धतीत चारित्र्य व बौद्धीक विकासास पोषक अशा कार्यक्रमाचा अभाव असतो. मनोरंजनास फारसा वाव या पद्धतीत नसतो म्हणून ही एकांगी मानली जाते.

**२. शरिराभ्यास** ( Physical Trainning )

ह्या पद्धतीमध्ये शरीराच्या हालचालीच्या प्रभुत्वावर भर दिला जातो. कोणतेही चातर्य एकच व्यायाम प्रकार वारंवार करून आत्मसात करण्याचा प्रयत्न होतो. शरीराकडून एखाद्या यंत्राप्रमाणेच काम करून घेतलें जाते. ह्या पद्धतीत आवड, मनोरंजन, हेतु प्रधान वातावरण ह्यास फारसा वाव नसतो. सर्कशीतील जी कामे आपण पहातो ती शारिरिक अभ्यास पद्धतीने सर्कसपटू आत्मसात करतात. एकच व्यायाम वारंवार त्याच तत्रंपद्धतीने करीत राहाणे यास शारिरिक अभ्यास म्हणतात. यात व्यक्तीव्यक्तीतील फरक विचारात न घेता एका साच्यास महत्त्व असते.

**३. व्यायाम** ( Physical Exercise )

दंड, बैठका, जोडी, वजन उचलणे, धावणे वगैरे प्रकारास व्यायाम ही संज्ञा बऱ्याच वेळा देतात. ह्यात साधारणपणे वैयक्तीक रीतीने भाग घेतला जातो. शरीराचा विकास व स्नायु आणि मज्जासंस्था यांच्यात सहकार्य निर्माण होण्यास अशा तऱ्हेच्या व्यायामाचा उपयोग होतो. व्यायाम हा शारिरिक शिक्षणाचा एक भाग आहे. ही एक स्वतंत्र पद्धती होऊ शकत नाही.

**४ खेळ** ( Sports )

खोखो, आट्यापाट्या, कबड्डी हॉकी, फुटबॉल, व्हॉलीबॉल, बास्केट बॉल इत्यादी मैदानी खेळांचा जरी शारीरिक शिक्षणात समावेश होत असला तरी खेळ म्हणजे शारिरिक शिक्षण नव्हे. बऱ्याच ठिकाणी शारीरिक शिक्षणाच्या तासास खेळाचा तास व या शिक्षकास खेळाचे शिक्षक म्हणण्याचा प्रघात आहे. शारिरिक शिक्षणात खेळास जरी महत्त्वाचे स्थान असले तरी हे शिक्षण खेळापुरते मर्यादीत नाही.

**५ कवायत** ( Drill )

कांही वेळा कवायत म्हणजें शारिरिक शिक्षण मानले जाते. कवायतीत हुकमाप्रमाणें काम करवून घेतले जाते. कवायतीत हालचालीमध्ये एकसूत्रीपणा व हुकमाचे आज्ञापालन यांना फार महत्त्व असते. पण मुलांना त्यांच्या विद्यार्थिदशेत कवायतीतील कडवेपणा व लादलेली शिस्त हितावह होतेच असे नाही.

यावरून असे दिसून येते की स्नायुवर्धन, शरिराभ्यास, व्यायाम, खेळ, कवायत इत्यादींच्या रुपाने शारिरिक शिक्षणाचे मर्यादीत स्वरूप प्रकट होत असे, म्हणून या शिक्षणास शिक्षणशास्त्रात योग्य ते स्थान मिळण्यास कालावधी लागला. एकंदरीत असे आढळून येते, की शारीरिक शिक्षणाचा एकांगी पद्धतीच प्रत्यक्ष व्यवहारात प्रचलित असल्यामुळे यास शैक्षणिकदृष्ट्या योग्य ते स्थान लवकर प्राप्त झालें नाही.

**शारिरिक शिक्षण म्हणजे काय ?**

शारिरिक शिक्षणाची आधुनिक कल्पना शिक्षणाच्या व्यापक दृष्टीकोनास व सध्याच्या शैक्षणिक परिवर्तनास अनुसरून अशीच आहे. शारीरिक शिक्षण

हे मुख्यतः शिक्षण आहे. शिक्षणाच्या आधुनिक कल्पने-प्रमाणे ही एक प्रक्रिया आहे.

शरीराचा विकास किंवा बुद्धीचा विकास स्वतंत्र-पणे होऊ शकत नाही. बुद्धी व मन ह्यांचा विकास होण्याचे मेंदू व मज्जासंस्था हे जे माध्यम आहे ते एकाच शरीराचे भाग आहेत. तेव्हा स्नायुसंस्थेचा विकास अथवा मज्जातंतु संस्थेचा विकास स्वतंत्रपणे होऊ शकत नाही. शिकणारा मुलगा हा अविभाज्य आहे हे ध्यानात घेऊन कोणत्याही प्रक्रियेत तो त्याच्या सर्व शरीराने व मनाने भाग घेत असतो. ती दोन्ही संस्कारक्षम असतात हा शैक्षणिक दृष्टिकोन आता सर्व मान्य झाला आहे.

शारीरिक शिक्षणातून आता फक्त स्नायुसंस्थेचा विकास किंवा बलसंवर्धन करावयाचे नसून शरीर मन व बुद्धी या सर्वांचा विकास या शिक्षणातून साध्य करावयाचा विचार दृढ झाला आहे. शारीरिक शिक्षणा-तून व्यक्तीचा सर्वांगीण विकास साध्य करण्याच्या दृष्टीने आता शारीरिक शिक्षण वैयक्तीक किंवा एकाकी असून चालावयाचे नाही. विद्यार्थी हा केंद्र बिंदू मानून त्याच्या भोवती योग्य ते सांघिक वातावरण निर्माण करावयाचे. त्याला समाजप्रिय, सामाजनिष्ठ बनवावयाचे आहे. ठराविक व्यायामाच्या घोकंपट्टीपेक्षा मनोरंजक अशा सांघिक खेळातून त्याची कौशल्य व क्षमता वाढविण्याचा प्रयत्न होणे श्रेयस्कर आहे. त्याच्या सहज मनोप्रवृतीत वाव देणाऱ्या क्रीडन – पद्धतीच्या ( Playwork ) माध्यमाने विद्यार्थांच्या व्यक्तीमत्वास वाव देऊन तो कृति प्रधान बनेल असेच प्रयत्न शारिरिक शिक्षणातून झाले पाहिजे.

एकंदरीने शारिरिक शिक्षणाची शैक्षणिकदृष्ट्या आधुनिक कल्पना अशी आहे. ' शरीराच्या माध्यमातून उपलब्ध होणारे जे शिक्षण ते शारीरिक शिक्षण होय. ज्या शिक्षणामध्ये आरोग्य शारिरिक सुदृढता, शारीरिक कौशल्य, बौद्धिक विकास, समतोल व्यक्तीमत्व यास पुरक असे कार्यक्रम आहेत तेच शारीरिक शिक्षण होय. संघवृती, आज्ञापालन, खिलाडूवृत्ती, समाजनिष्ठा, सचोटी, स्वावलंबन, इत्यादी गुणांचा विकास विद्यार्थ्यां-मध्ये होण्यास भरपूर वाव देणारे कार्यक्रम ज्यात आहेत ते शारीरिक शिक्षण. शेवटी जे व्यक्तीविकासास पूरक असून विद्यार्थ्यांना आत्मसंरक्षणास व राष्ट्रसेवेस कार्यक्षम करते ते शारिरिक शिक्षण.

असे शिक्षण सर्वतोपरि ' विद्यार्थी केंद्रित ' असून त्याच्या सर्वांगीण विकासाकरीता आयोजित केलेल्या सामान्य शिक्षणास सर्वतोपरी पुरक आहे.

## जगातील वैचित्र्य

' जर्नेल डी पाविया ' या नावाचे वर्तमान पत्र इटालीतील ' पाविया ' या शहरातून प्रकाशित होत असते. जगांतील सर्व वर्तमान पत्रापेक्षा हे वर्तमान पत्र फारच आगळे आहे. या वर्तमान पत्राची पानें कागदी नसून प्लॅस्टीकची आहेत. आठ पृष्ठ असलेले हे वर्तमान पत्र पावसांत उभे राहून वाचता येते व त्याची घडी करुन खिशातही ठेवता येते. विशेष म्हणजे त्यावर चित्रेही पाहावयास मिळतात.

इ. स. १४३० मध्ये अमेरिकेत गुलामीच्या प्रथेस सुरुवात झाली. प्रथम जेम्सटाउन या ठिकाणी त्याचा उगम झाला. यानंतर २५० वर्षात गुलामांची संख्या वाढत वाढत ४० लाखापर्यंत गेली. ही प्रथा नष्ट करण्यासाठी अमेरिकेत जें युद्ध झाले त्याचा खर्च ५,५५,००,००० पौंड झाला.

# संगीत : एक ओळख

बी. व्ही. उप्पलवार

संगीत कलेच्या अभ्यासाच्या दृष्टीने संगीताची उत्पत्ती कशी झाली ते पहाणे आवश्यक आहे. याबद्दल अनेक मते आढळून येतात.

संगीताची निर्मिती वेदाचे निमाता ब्रह्मदेवापासून झाली असे म्हणतात. त्यांनी ही कला शंकरांना दिली. शंकरापासून सरस्वतीला प्राप्त झाली. ( म्हणून सरस्वतीस संगीताची माता म्हणतात. सरस्वतीपासून ही कला नारदांना मिळाली. नारदानी ही कला किन्नर यांना दिली व किन्नरपासून भरत, नारद, हनुमंत यांना ही कला प्राप्त झाली आणि यानी ही कला पृथ्वी लोकात दिली असे सांगतात.

पंडीत दामोदरांच्या मतानुसार स्वरांची उत्पत्ती पशुपक्षापासून झाली असावी असे म्हणतात. मोरापासून षड्ज, चातकापासून रुषभ, बकऱ्यापासून गांधार, कावळ्यापासून मध्यम कोकिळेपासून पंचम, बेडकापासून भैरव, हत्तीपासून निषाद अशा प्रकारे स्वर अुत्पत्ती झाली.

फ्लारसीच्या विद्वानाच्या मते अशी कथा सांगतात एकदां मुसा सृष्टी सौदर्य पहात जंगलात हिंडत होता. तितक्यांत त्याला आकाशवाणी ऐकू आली " या मुसा हक्की तू अपना असा ( फकीराजवळ असणारा अस्त्र ) अिस फत्तरपर मार " हे ऐकताच त्यानी तो असा जवळच्या दगडावर मारला. त्या दगडाचे सात तुकडे झाले. त्या प्रत्येक दगडाच्या तुकड्यातून पाण्याची धार निघू लागली. त्या सातही धारेस निरनिराळा आवाज होता. त्या सात प्रकारच्या आवाजापासून सप्त स्वरांची निमिती झाली व तेव्हापासून संगीताचा प्रसार झाला.

दुसऱ्या एका फारसी विद्वानाच्या मते असे आहे की, मुसीकार नांवाचा एक पक्षी आहे. त्या पक्षाच्या नाकाला बासरीप्रमाणे सात छिद्रे असतात. त्या आवाजापासून सात स्वराची निर्मिती झालीं व संगीताचा प्रचार झाला.

अितिहासकार बाम्टोडल याच्या मते येशु ख्रिस्त हाच संगीताचा आद्य दाता आहे. एकदा झाडाच्या थंड सावलित झोपला होता. अशा स्थितित त्याला गोड असा आवाज ऐकू आला. त्याची झोप उडाली तो इकडे तिकडे पाहू लागला. त्या झाडावर एक पक्षी होता व त्या पक्षापासून तो गोड स्वर येत होता. येसुने त्या पक्षाच्या आवाजाचे अनुकरण केले. त्या पक्षाचे नांव ' लिण्डा " आणि ज्या झाडावर पक्षी होता त्या झाडाचे नांव " एकाजा " होते. त्या पक्षाला संगीताचा जन्मदाता म्हणतांत. त्या पक्षाच्या पायाच्या हालचालीना नृत्याचे रुप दिले.

ग्रंथानुसार नारदांनी अनेक वर्ष तप केल्यानंतर महादेव प्रसन्न होअून त्यानां संगीत कला दिली. शिवजीनी पार्वतीच्या हवयन मुद्रा पाहून त्याच्या अंग-प्रत्यगांच्या आधारावर रुद्रवीणा तयार केली. पाच मुखातून ५ राग निर्माण केले शिवजी दिशानुसार भैरव, हिंडोल, मेघ, दिपक, देवी पार्वतीपासून कौशिक रागाची उत्पत्ती झाली.

वरील मतांचा विचार केल्यास एकही विचार मनाला पटण्यासारखा नाही. जर संगीताची उत्पती देवादिकापासून झाली असेल तर त्यांना ती प्रेरणा कोठून मिळाली याबद्दल कुठेही उल्लेख नाही. स्वरांची उत्पती पशुपक्षांपासून झाली ही केवळ कल्पना आहे. निश्चित मत देणे योग्य दिसत नाही. किंवा सात दगडांच्या तुकड्यातून निघालेल्या पाण्याच्या धारेमुळे संगीताची निर्मिती झाली असावी हे सुद्धा बुद्धीला पटणारे नाही.

युरोपातील विद्वान डार्विन म्हणतो, सर्व सृष्टीच्या विकासाबरोबर संगीताची उत्पती झाली. जेम्स लँगच्या मतानुसार माणूस चालावयास बोलावयास

शिकला तेंव्हाच संगीताची उत्पती झाली. हे किंचित बरोबर असल्यासारखे वाटते. कारण यास कांही आधार आहेत. युरोपातील विद्वान फ्राईड म्हणतो लहान बालकाचे रडणे, हसणे, नाचणे, गाणे हे सर्व मानशास्त्रानुसार शिकते. आणि हे बरोबर आहे. कारण हे सर्व बालकास शिकवावे लागत नाही. तो स्वतःच्या मताने हे सर्व करतो. बालकाचें क्रिडाविलास पाहून मोठी माणसें त्याबद्दल कौतुक करतात. सहाजिक आहें बाल्य अवस्थेतील बालकाच्या क्रीडा नयनमनोहर असतात. म्हणून याबद्दल वाटणाऱ्या कौतुकातून संगित कलेचा विकास झाला. कारण संगीताचा संबंध मानसिक विकासाशी असतो. शारीरिक विकासाशी नव्हे. बालकांचे निरनिराळे आवाज, नाचणें, गाणें, इत्यादी-कांचें मोठ्या माणसांनी अनुकरण केले. अशा प्रकारे संगीताचा विकास हळूहळू होत गेला. एकदम स्वरांची व रागाची निर्मिती झाली असेल ही अशक्य कोटीची गोष्ट आहे. प्रथम उत्पती मगच विकास म्हणून. बालकाच्या क्रिडाविकासातून झालेल्या आवडीतून संगीताची निर्मिती झालीं. मानसशास्त्राच्या दृष्टीने आपली आवडही संगीताची माता झाली हे मान्य करावे लागते.

वास्तविक संगीत हा व्यापक शब्द आहे. "गीतं, वाद्य तथा नृत्यं त्र्यें संगीतमुच्यते" संगीतामध्ये गायन, वादन व नृत्य या तिन्हीचा समावेश होतो. या तिन्ही-मध्ये गायनास श्रेष्ठ मानतात. संगीतात एकूण सात स्वर आहेत श्रुती पंधरा. अधिक ७ एकूण २२ श्रुती असतात. याच आधारावर निरनिराळ्या स्वर समुहांनी श्रोत्यांना मुग्ध करतो. श्रोत्यांना आनंदित करणें एवढीच संगीताची सीमा नाही.

विश्रान्ति संयोगे सा कला न कलामता
लीयन्ते परमानन्दे ययात्मा सा परा कला

ज्या कलेच्या रसस्वादानी केवळ आनंद व विश्रांती वाटत असेल तर ती कला जाणत्याच्या दृष्टीने कला नव्हे. कला म्हणजे रसस्वाद घेणाऱ्याचे चित्त पर-मात्माकडे लीन होत असेल तर तीच कला श्रेष्ठ होय. संगीत कलेवर मोक्ष मिळविता येतो ही गोष्ट काहींच्या बुद्धीला पटणारी नाही. पण संगीत कलेवर मोक्ष मिळ-विता येतो हे निश्चित. मुद्दा असा की ही कला आप-ल्याला मुळात समजली पाहिजे. कला समजल्या खेरीज त्यावर भाष्य करणे बरोबर नाही. जेव्हां रविशंकरनी सतार वाजवुन अमेरिकेतील लोकांच्या डोळ्यांत अश्रु आणविले. हे सर्व कला समजल्यानंतरचे होय. संगीत ही हृदयाची भाषा आहे. ही भाषा समजली पाहिजे. ही भाषा समजल्यानंतर भावनेवर प्रभुत्व मिळविता येऊ शकेल. भावनेंवरील विजय म्हणजे कलेवरील विजय होय. तेव्हा कुठेही कला पूर्णत्वाला पोचली म्हणता येईल.

अशा प्रकारच्या जीवनात नकळत गोष्टी येत असतात. त्याकडे पहाण्याची सुक्ष्मदृष्टी नसते उदा. एखाद्या गायकानी घेतलेली तान हृदयास भिडून गेली असे म्हणतो त्या कलेचा होणारा आनंद इतर कोण-त्याही आनंदाच्या बरोबर नसतो. हे श्रेय केवळ स्वरांचे होय. गायकांनी केलेल्या हातवाऱ्याचे नाही. दुसऱ्या उदाहरणावरून ही गोष्ट निश्चित लक्षात येईल. चित्रपट नेहमी पहात असतो. त्यातील एखाद्या करूण दृष्यामुळे माणसाला रडू येते. पण हे येणारे रडू केवळ दृष्यावर आधारलेले नसून त्यास असलेंल्या पार्श्व-संगीतावर आधारलेले आहे. हे जर नीट समजल्यास आपोआप कळेल. केवळ दृष्यानें (पडद्यावरील) माणसाला रडू येत नाहीं. इथे सबंध करूण दृष्य आणि करूण संगीत याच्या होणाऱ्या परिणामाशी आहे पण केवळ करूण संगीताने रडू येण्याचे कारण तसे संगीत चालू असताना जाणकाराच्या डोळ्यासमोर आपोआप करूण दृष्ये उभी असतात. मग रडू येणे सहाजिक आहे. पण अितरासाठी तसे प्रसंग निर्माण करण्याची शक्ति किंवा जाणीव नसते म्हणून हा फरक आढळून येतो. अशी दृष्टी निर्माण करता आली पाहिजे. अशी भावना निर्माण झाल्यास तो खरा श्रोता.

आपल्या दररोजच्या वाचण्यात परदेशातील प्रयोग येत असतात. ध्वनी मुळे धातू एकमेकांना जोडता येतात. गाई–म्हशींना संगीत ऐकवून नेहमी पेक्षा जास्त दुध काढण्यात आले. इतकेच काय झाडांना संगीत ऐकवून अधिक फळे घेण्यात आली. ही शक्ती केवळ संगीतात आहे. ही काही जादू नव्हे. पडद्यावर संगीतापासून

निरनिराळ्या आकृत्या दाखविण्यात आल्या. मग दीपक रागाने दीवे लागणें, मेघमल्हारानी पाऊस पडणें ह्या गोष्टीवर विश्वास ठेवणे सहाजिक आहे. संगीतापासून शरीरातील जुने रोग नाहीसे होऊ शकतात. पूत्रहीन स्त्रियांना संगीत ऐकवून विकार नाहीसा करण्यात आला व त्यांना मुलेही झाली. या सबंध गोष्टीचा सुक्ष्म विचार केल्यास संगीत मोक्ष मिळविण्याचे साधन होऊ शकते. मुख्य अडचण संगीतात रस निर्माण करता आला पाहिजे. कारण परमेश्वराला रसस्वरुप मानले आहे. " रसो व सः "

वास्तवीक कलावंताजवळ फार मोठी आकर्षण शक्ती असते. कलेवर प्रभुत्व मिळविल्यानंतर माणसाची मने जिंकता येतात. मनावर विजय म्हणजे परमेश्वरावर विजय. या कलेच्या आधारावर ऋषी मुनींची तपोभंग करता आली. पण हा संगीताचा खरा उपयोग नव्हे. आजही अनेक गोष्टी पहातो ज्या इथे नमद करण्याची आवश्यकता नाही. संगीताचा उपयोग ज्या पध्दतीनें करावा त्या पद्धतीनें केला जात नाही ही खेदाची गोष्ट आहे. ज्यामुळें कलेचे पावित्र्य नष्ट होते, हा निव्वळ कलेचा अपमान आहे. याच कलेवर ज्यांनी मोक्ष मिळविला त्यांचे आदर्श डोळ्यासमोर ठेवण्यासारखे आहेत. स्वामी हरीदास, संत तुकाराम, तुलसीदास, सुरदास, मीराबाई इत्यादिकांनी खरी सेवा केली आणि त्यांनी मोक्ष मिळविला. कलेमध्ये स्वतः देहभान विसरतो तोच खरा कलावंत. कलावंत आपल्या कलेच्या प्रसिद्धीसाठी म्हणुन कलेची सेवा करतो ती खरी कला नव्हे. व जी कला स्वतःसाठी व खऱ्या कलावंतासाठी असते. तेव्हांच या कलेचा अर्थ समजेल. तेव्हा ही कला पूर्णत्वाला पोचली म्हणता येईल. संगीत हे प्राणीमात्रासाठी अमृतरस आहे आत्माचे परमात्मात रूपातंरीत करण्याची संगीत ही मधली सिद्धी आहे. ही गोष्ट निर्विवाद आहे.

## जगातील वैचित्र्य

卐 卐

इंग्लंडच्या बर्मिगहॅम शहराजवळ एक ऑस्टिन कारचें गॅरेज २,१०,००,००० रुपये खर्च करुन बांधण्यात आलेले आहे. हे जगातील सर्वात मोठे गॅरेज म्हणून ओळखले जाते. ही गॅरेज नऊ मजली असून ती मध्ये एका वेळी ३३०० मोटारी उभ्या राहू शकतात.

जगातील सर्वात मोठे दुकान न्यूयॉर्क यथे आहे. त्या दुकानात एकूण ११,००० कर्मचारी आहेत आणि विक्रीसाठी ४,००,००० वस्तु ठेवलेल्या आहेत.

卐 卐

जगांत सर्वात जास्त बोलणारी महिला क्लॅलाइस वेलिंटन ही होय. तीं न थांबता सतत ७२ तास ३ मिनिटे बोलली. ती डरहॅम ( उ. कॅरोलिना ) येथे रहात असे.

व्हिएन्ना येथे जगांतील सर्वात मोठी मेणबत्ती असून ती तेरा फुट उंच असून तिची जाडी एक फुट व वजन पंधरा मण आहे.

# झोपडपट्टी : एक दर्शन

प्रभाकर गोरे

त्या घाणीने माखलेल्या वस्तीतून आम्ही फिरत होतो. नुकताच पाऊस पडून उघडल्यामुळे तिथल्या घाणीची सुटलेली दुर्गंधी जीव गुदमरून टाकीत होती. आजपर्यंत ती घाण, ते जीवन आम्ही मोठ्या तुच्छ नजरेनं दुरुनच पाहिल होतं, पण आजपासून ते सर्व आम्ही प्रत्यक्ष भोगणार होतो. म्हणून त्या दुर्गंधीपासून बचाव करण्यासाठी आता नाक धरुन चालणार नव्हता. ती घाण आम्हाला पचवून घ्यायची होती. त्या जीवनाचा जवळून शोध घ्यावयाचा होता.

आमच्या अगंतुक आगमनामुळे सारी झोपडपट्टी आमच्याकडे विलक्षण कुतुहलाने आणि भेदरल्या नजरांनी पाहात होती. तरण्या पोरी मात्र वेगळयाच आशेने आमच्यापैकी प्रत्येकास न्याहाळीत होत्या. तेथे जवळ अर्ध्या झोपडया मसनजोगी लोकांच्या होत्या. आणि बाकीच्या झोपडया कांही गुरगुर पोचमा, महार, मांग, वगैरे गरीब लोकांच्या होत्या. आमचा मूळ उद्देश तेथील प्रौढ लोकांना थोडेबहूत प्राथमिक शिक्षक देऊन साक्षर करण्याचा आणि त्यांनी वैयक्तीक दुःखे, गरजा जवळून पहाण्याचा होता. पण पिढयान् पिढया हातात घंटा आणि काखेत भिकेची झोळी घेऊन अन्नासाठी दारोदार भटकणाऱ्या त्या माणसांना ज्ञानाच्या लख्ख प्रकाशात आणणे म्हणजे एक माजलेला, हिंस्त्र जंगली जनावरांचा कळपच माणसाळण्या इतके कठीण कार्य होते. ते कठीण असले तरी ही अशक्य मात्र नव्हते. आणि तेहि कार्य आम्ही करून दाखविले असते. पण ते एक निरुपयोगी कार्य ठरले असते. त्याशिवाय त्यांची पिढी तर वाया गेली होतीच. त्यांचा उभा जन्म तर भीक मागण्यात गेला होताच. पण त्यांची जी लहान लहान मुलं होती. ती उद्या मोठी झाल्यावर त्यांच्या हातात सुद्धा ही भिकेची घंटा येणार होती. तेव्हा त्याच्या लहानलहान मुलांना एकत्र करून त्यांनाच अगोदर सुसंस्कृत करणे योग्य होईल. असे आमचे प्रामाणिक मत बनले. आणि आम्ही प्रौढशिक्षणाऐवजी बालशिक्षणाचे कार्य करू लागलो.

मसणजोगीं लोकांची भाषा वेगळीं (तेलगु) होती. कधी कधी औषध म्हणून आमच्या बरोबर ते मराठी मध्ये बोलत असत. त्यांचे बोलणे इतके निबरट आणि मगरुरीचे असे की, समोरच्या माणसाला वेळोवेळी अपमान सहन करून घ्यावा लागत असे. पण पुढे आम्हाला त्यांच्या बोलण्याची सवंय झाल्यामुळे कांही वाटेनासे झाले. मसणजोगी सोडून इतर समाजातली जी माणसं होती ती थोडया चांगल्या स्वभावाचीं होती. निदान आम्ही सांगितलेला शब्द ते मानीत असत. आणि नियमीत त्यांची मुलं शाळेत पाठवीत.

गवत, बोऱ्या, आणि लाकूड यापासून बनवलेल्या कोंबडयाच्या खुराडयात इतक्या लहान झोपडयात ते लोक कसे तरी राहतात. जागोजागी झोपडया समोरच टाकलेला केरकचरा आणि आजूबाजूला लहान लेकरांनी केलेल्या विष्टेवर घोंगावणारे माशांचे थवे पाहुन ओकारी यावी असे तेथील वातावरण नेहमीच असते. अंगातील मळकट कपडयांची लक्तरे झालेली आणि कळकट चेहरे घेऊन कसे तरी जगतात बिचारे ! किती तरी दिवसांत स्नान न केल्यामुळे जवळ जाताच उंटाच्या शरीराचा यावा तसा घुरट घाण वास त्यांच्या शरीराचा येत असे. पिण्याचे पाणी सुद्धा सार्वजनिक नळावरून अथवा नगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांची नजर चुकवून तेथील नळावरून मोजकेच आणावे लागते. नगरपालीकेच्या कर्मचाऱ्यांने पाहून शिव्या हासडल्या अथवा मारले तरीही पुन्हा निर्लज्जासारखे त्यांची नजर चुकवू नळाचे पाणी आणावे लागे.

पूर्वी हेच मसनजोगी लोक गावांत आल्यानंतर बायाबापडया भीत असत आणि ह्या लोकांना मागतील तेवढी भीक घालून ह्याची ब्याद दारातून काढून टाकीत कारण ह्या लोकांचा भेसूर आवतार त्याशिवाय जादूटोणा, भानामती, करणी वगैरेच्या जोरावर केव्हा काय करतील असा गैरसमज पूर्वी खेडयांतील अज्ञानी लोकांत होता. पण विज्ञानयुगाचा परिणाम म्हणून ह्या

लोकांना आता कोणींही भिईनासे झाले आहे. म्हणून भिक्षाही जास्त मिळत नाही. त्यातच सध्याचा दुष्काळ वगैरेमुळे ह्या लोकांची फारच कठीण अवस्था बनली आहे. बरे ! हे लोक काही कामेही करायला तयार नसतात. कारण मुळातच ह्यांचा पिंड फुकटची भिक मागून मिळालेल्या अन्नावर पोसला गेल्यामुळे आळशी, कामचुकार आणि उर्मट बनलेले असतात. दुसरी गोष्ट म्हणजे सध्या दुष्काळामुळे अन्न अन्न म्हणून भूकबळी जाणाऱ्या शेतकऱ्यांनाच कामे अपुरी पडत आहेत. मग ह्या लोकांना तरी सरकार कुठली कामे देईल.

इतके असूनही ह्या लोकांची वृत्ती कमालीची बेफिकीर आणि मस्तवाल आहे. आम्ही त्यांच्या गलीच्छ वस्तीत जाऊन शिकवत असतांनाही ते लोक मुलांना पाठवायला तयार नसत. कारण शिक्षणाची त्यांना मुळी गरजच भासत नसे. त्याशिवाय पोरांचा पोटाचा प्रश्न होता. ना ! दिवसभर सारी पोरं गावांत भीक मागायला जात असत आणि संध्याकाळी तीन वाजता नियमीत शिकायला येत असत, पोरांना आमचा विलक्षण लळा लागला होता. म्हणून त्यांच्या आया-बापांनी कितीही अडथळे आणले तरीही ते दररोज शाळेत येत असत. बाजारच्या दिवशी मात्र सगळी पोरं बाजारात कांदे, गुळ, मिरच्या वगैरे चोरायला आणि मागायला जात असत. चोरून वा मागून आणलेले पाहुन त्यांच्या आया पोरांचे फार कौतूक करीत. दुसऱ्या दिवशी शाळेत आल्यानंतर पोरं मोठ्या आवडीने बाजारातल्या गमती जमती व काय चोरले ते सांगत. ते ऐकून आम्हाला राग येण्याऐवजी वाईट वाटे, त्यांची कींव येई अन् थोडे हसू हीं येई. पुढे मात्र आमच्या सांगण्यामुळे मुलांनी चोरी करायचे सोडून दिले पण आम्ही भिक मागण्यापासून त्यांना परावृत्त करू शकलो नाही. कारण ती त्यांची मुलभत गरज होती.

झोपडपट्टीतील लोकांचे आवडते खाद्य म्हणजे डुकराचे मांस आहे. त्याशिवाय खेकडे, मासे, खारी आणि इतर पक्षी व प्राणीही ते लोक मोठ्या आवडीने खातात. डुकराची मेजवानी असल्या दिवशी सगळी मुले घरी जाण्यासाठी फारच उतावीळ होत व आम्हाला शाळा लवकर सोडावी लागे. त्यादिवशी झोपडपट्टीत सर्वत्र खुशीचे वातावरण असे. मसनजोगी सोडून बाकीचे महार, मांग, वगैरे लोक लागेल तेव्हा हमालीचा व इतर कोणताही धंदा करीत. तेवढे अठरा विश्वे दारिद्र्यच असूनही ते लोक आलेल्या पैशात दारू, शिड्डी, पीत व मटक्या सारख्या जुगारात पैसे नाश करीत असतात. नाईलाज म्हणून केवळ पोटांसाठी त्यांच्या बायका वेश्या व्यवसाय करून पैसे मिळवितात. त्या घाणेरड्या झोपड्यांत सुद्धा काही तरुण बाया व पोरी नटून सजून निटनेटके राहतात व आलेल्या गिऱ्हाई-काची शारीरिक भूक भागवण्याचा धंदा करीत असतात.

एकंदर ह्या लोकांचे बेशिस्त आणि जनावरा समान वागणे, निगरगट्ट बोलणे, खंडीभर घाणीत बेफिकीरपणे राहाणे लाचार आणि घृणास्पद जगणे पाहून आम्हाला क्षणभर वाटे की, आम्ही माणसांच्या राज्यात नसून पशुंच्या साम्राज्यात वावरत आहोत. शेजारीच वाढणाऱ्या उंच उंच इमारती पाहून स्वत:च्या लाचा-रीची दारीद्र्याची त्यांना कधीच खंत वाटली नाही.

## सारे काही अजबच

आफ्रिकेच्या जंगलात हसणारी झाडे आहेत.

卐 卐

आफ्रिकेत अेक विचित्र वृक्ष आहे त्याला फुलाविना फळे येतात.

आफ्रिकेत मॅचिसन फॉलसच्या बाजूला प्रकाश देणारी झाडे खूप आहेत.

卐 卐

आफ्रिकेत अेक विशिष्ठ जातीचे फूल आहे, त्याचा वास घेतल्यास मनुष्य बेशुद्ध होतो.

# सबा !

तेजेराव पुं. निवळीकर,
बी. ए. ( उपांत्य )

इच्यामाइला ! छप्पन बा-या सांगितल तर ह्यो लोक ऐकत का न्हाईत बा ! ह्यो भोसडीचा कोतवाल राम्या गेलाय तर तिकडच, जस विहीरींत पडलेल्या धोंड्यावानी ! सकाळपास्न घसा फोडून सांगतोय की, बाबा रे आपल्या गावास्नी तालुक्याचे सबापती साब येणार हायीत म्हणून ! सबापती साब किती मोट्टा माणुस हाया. त्यो येतोय असल्या पाच पन्नास झोपड्याच्या खेड्यास्नी ! किती छाताड भरून यायाच अभिमानात, पण ह्या भाड्यांना समजताय कुठं ! लिहीताबी येंत न्हाई आन् वाचताबी येत न्हाई आरं पण कायीच येत नसल म्हणून काय झाल ! नुसत येवुन बसायलाबी कायी पैसें द्यायाचीं हायीत होयी ! तवा पास्न लाइुसफीकर वरून सांगतोय की, सबापती साब येण्याचा वकुत झालाया म्हणुन ! कायी ह्या लोकांच्या कानात बोळे गेल्यात होयी ? बर लोकास्नी एक काम धंदे असतील परंतु ह्या गरामपंच्याईतीच्या सबासदांना येयाला काय रोग झालाय की झडपण झालीया !

हं ...... इच्यामाइला पाच सालातुन कंदी नाय ही सबा बोवूलालीया. गरामपंच्याइती मार्फत लाइुस-फिकर बी आनलया. सबापती साबची मोटार येणार हाय म्हणून रस्तेचेरस्तेबी निट केलया. जागुजगी चुना बी घातलथा. रस्त्यास्नी रंगीबेरंगी फरारे लावलया हे कायी दिसत नायीं की डोळ्यात माती पडली मनावं ! ह्यो सगळा समारंब पहायाचा आयुष्यातला किती आनुंदाचा घटका हाव. पण लोकास्नी कळतया कुठ ? म्हणतात " कुणीबी येवुन आमची गरीबी दूर करणार न्हायी. " निवडणुकीच्या येळलाबी त्यो सबापती आला हुता. तेवाबी त्यान सांगीतल होत कीं, " मी निवडून आलो की सर्वास्नी सुख होयील. " कुणालाबी म्या तरास देणार नायी. आनखी तुमच्या गांवचा ' पार ' बांधुन देतोय. तवा " मारुतीराया " तुमच्यावर खुष होयील आन् मग या सालाला तुमचा सगळा शिवार लई पिकल. तवा हरेकाच्या घरातुन बळद बांधावं लागतील ... बळद... !! "

आसं, सबापतीसाब म्हणताच सर्व लोकानी टाळी पिटवली. जस चुलीवर टोपल ठेवून लाहृया भाजल्यावनी आवाज व्हावा तसा साऱ्या चावेडीत आवाज घुमला व्हुता. बाद म्या बी भासनाला उभा टाकलो आण् बोलण्याची शिकस्त करू लागलो. पण थोड चावळु लागलो. आंग उगीचच लटलट कापु लागलं. तवा देशपांडे साबन् सांगितलं " आरं अस काय करांया लागला ग्यानबा. आरं कायी नायी म्हणये तु चवती इता शिकला हायीस कीं रं ! आन् ह्यो लोक काय दुसरे हायीत होयी ! आपल्या घरात लेकरा बाळात बोल्यावनी बोल की. "

आसं देशपांडें साब बोलताच माज्याबी हारदय थोड घट्ट झालं आन् म्या बोलू लागलो.

" श्रीमान देडपांडे साब ...... आणि माज्या बंदु, भगनीणो ... आजच्या जो दिवस निघालाय त्यो लई भाग्याचा हाया ...... का तर कवा नायीते देशपांडे साब आपल्या गावास्नी आल्याता – त्यांच्या पायगुनामुळं आपल्या गावातनं शनी तर जाईलच ... परंतु आसा वकुत मरेपर्यंत येणार नायी ... त्यांच्या विरुद्ध ज्यो उभा टाकलाय त्यो म्हणें चौदावी की पंधरावी शिकलेला हाय म्हणं. आरं पण त्याला देशपांडे साबची बराबरी येतीया का रं ... खुप शिकलेला सवलेला आसल परंतु त्याच्या घरी कायी काळी माती हाया ! हे कायी तुमास्नी समजत नायी होय ...... !

आरं देशपांड्या साबच लई ऋण हाय रं आमच्या गावावर ... हारेक सालाला त्योच आपणाला दिडी दुमणी दाणे देतोया ... लई मायाळु हैता ! त्यानी जर दाने देयाच रोकल तर पाडव्या पासुन पुढं उनाळ्यात तडपडत मरण्याची पाळी यायची, जसी

पाण्याच्या भाहीर मासी फडफडल्यावनी ... ! तवा देशपांडे साबचं आपले मायबाप ह्याया. म्हणुन म्या सर्वांस्नी एक मारुजा करून सांगतोया की, सर्वांनीं मिळून आपण त्यास्नी वर काढ या ......

– हां ... हां आन् एक सांगायच इसरतोया, ते म्हणजे निवडून आल्यावर त्यानी आपल्या गावामंधी मारुतीच्या पायरीशी "परु" करणार हैता ! तावा सर्वाच्या मार्फत म्या देशपांडे साबना सगळयाच्या समोर सांगतोया की आमच्या गावातनं एकही मत तुमच्या शिवाय दुसऱ्या कुणालाबी देणार नायी ! ... येवडं बोलून माज्या जाग्यावर म्या बसुन घेतो. "

आसं भासण होताच पयलच्यावनी पुना एकदा लोकानी टाळ्या मारल्या. म्या हासरा चेरा करतच देशपांड्या साब कडं गेलो. म्या जाताच त्यानी माज्या गळयास्नी मिठी मारली. व आपल्या बरबर शेजारींच बसवलं सगळे लोक खुशीत दिसत होते. तवा मला लई चांगल वाटलं ... बाद सगळे लोक ज्याच्या त्याच्या घरी गेले. देशपांडे साबन मला संगच गावोगाव भासण करायला घेतल हुतं.

निवडणुकीत देशपांडेसाब निवडून आल्याच रेडूवरून कळताच सर्वास्नी लई आनंद झाला. बाद मला त्यांनीं आमच्या वाडीचा सरपंच केलं तवा सर्व्या गावात म्याच मोठा झालो. मातुर देशपांडे साब पुन्ना कदी कदी आमच्या गावास्नी आले नायींत. तर सगळे लोक नाराज होवून मला बोल लावू लागले. मला लई शरम वाटु लागली. माजाबीं नायींलाज हुता ...... आता पंधरा बीस दिवसावर निवडणूक आलिया म्हणून त्यांनी म्या न बोलविताही येण्याच कळविलया व व्यवस्था करायला सांगीतलया. मातुर आता पहिलच्यावनीं कोणीबी इथं भासण अेकायला येत नायीत त्याला म्या तरी काय करु बा.

## सारे काही अजबच

आफ्रिकेतील डास चावल्यास 'ब्लॅक वाटर डिसीज' हा भयंकर रोग होतो. या रोगामुळे मनुष्यास काळी लघवी होवून त्यातच तो दगावतो.

आफ्रिकेत अेका प्रकारच्या कावळ्याच्या अंगावर पट्टे असून त्याचा आवाज घोगरा व कानठळ्या बसविणारा आहे.

★

'स्टार फिश' नावाच्या माशासारखा दिसणारा एक मासा आहे. त्याचा हात कापला तर त्याजागी दुसरा हात येतो. अितकेच नव्हे तर त्या कापलेल्या हाताला दुसरा मासा उगवतो.

आफ्रिकेत शिंका आणणारे झाड आहे. ते तोडित असता आपल्या नाकातून शिंका येतात हे झाड पाण्यात बुडते.

उटाह (अमेरिका) मधील सौ. लीब्राडलीव्ह या २८ वर्षाच्या मातेने दर तासाला ३०८.५६ मैल मोटार हाकून विक्रम केला. त्यांना ५ मुले आहेत.

★

कॅराबवा नावाची एक तांबड्या अिंडियन लोकांची जमात आहे. त्या जमातीतील अग्नीनृत्य करणारे नर्तक पेटलेल्या निखाऱ्यावर अनवाणी नाचत असतात.

# मी जेव्हां पाहुणा बनतो !

संजय खाडिलकर,
वाणिज्य प्रथम वर्ष

मला आठवत नाही की मी कोणत्या अशुभ तिथीला गोविंदरावांकडे पाहुणा म्हणून गेलो. तसा गोविंदरावांचा व आमचा बराचसा घनिष्ट (काहीसा अनिष्ट) संबंध होता. त्यांनी पुष्कळ वेळा मला आग्रहपूर्वक बोलावले होते. एकदां काही कामा निमित्त त्यांच्याकडे आठ दिवस मुक्काम करावा लागला. ते आठ दिवस मी कसे घालवले ते मलाच माहीत. आता एका तासाःसाठीही मी कुणाकडे पाहूणा म्हणून न जाण्याचा निश्चय केला आहे. कुणाकडे उतरण्यापेक्षा लॉजमध्ये रहाणे अधिक पसंत करीन. त्यामुळी लॉजवाल्यांचा तरी फायदा होईल.

सकाळी आठ वाजता रेल्वेतून उतरून मी सरळ गोविंदरावांचे घर गाठले. गोविंदराव जेव्हा एकदा आमच्याकडे आले होते तेव्हां अगदी 'मोगलाई, आग्रहपूर्वक ' त्यांनी मला आमंत्रण दिले होते व तसे माझ्याकडून वचनही घेतले होते की मी त्यांच्याकडे कमीत कमी एकदा तरी यावे. व मी ही त्यांना एक वेळेस येण्याचे आश्वासन दिले.

जेव्हां मी त्यांच्याकडे एक लोखंडी पेटी व वळकटी घेऊन उतरलो. मी माझ्या चेहऱ्यावर हसूं आणीत दारातूने आवाज दिला 'गोविंदराव घरात आहेत काय ? ' गोविंदराव आंघोळ करीत होते. ते नाहणीघरातून जोरात शिंकले की मी दोन पाऊले मागे सरकलो. 'या, या रामराव !' अस म्हणत ओठावर हसूं आणले. परंतु माझ्या पेटी वळकटीकडे पाहून ते थोडे सावरले. मी त्यांना भेटायला न येता त्यांच्याकडे राहायला आलो आहे हे त्यांनी ताडले.

'आपण आलात आम्हाला फार आनंद झाला. असे म्हणत माझ्या पेटीकडेच बघत बसले. मी येऊन त्यांचे काय चांगले झाले– हे त्यांनाच माहीत परंतु मला मात्र त्यांचा चेहरा पडलेला जाणवला.

'इथें आठ एक दिवसाचे काम निघाले म्हटले चला नाही तरी गोविंदराव बोलावतातच आहेत. त्यांचा पाहुणचार घेऊ ' मी सांगितले व हसत विचारले 'काय घरची सर्व ठीक आहेत ना ?' 'ठीक आहेत ' असे तुटके उत्तर देऊन त्यांनी घरात मी आल्याची वर्दी दिली. व उमा, सुमाला आत सामान नेण्याबद्दल फर्मावले.

आवाज देऊनही पंधरा मिनिटं झाली तरी इकडे कुणी फिरकले नाही. त्यांना पाहुण्याबद्दल काडीमात्रही आस्था नसावी. तेवढयात गोविंदरावांची बायको पदराला हात पुसत स्वयंपाकगृहातून बाहेर आली. तिला पहाताच गोविंदरावानी तिला जवळ बोलावले, "हे रामराव, तू यांना ओळखत नसशील परंतु यांच्या वडीलांचा व माझा स्नेह आहे. मी त्यांच्याकडे कितीदा तरी राहिलो आहे. आता रामराव आपल्याकडे आले हे फार चांगले झाले." "या, बसा," मी चहा आणते असे म्हणत त्यांची पत्नी दुसऱ्या खोलीत निघन गेली.

या नंतर मीच माझे सामान उचलून एका बाजूला ठेवले. नंतर मी चहा घेतला व आंघोळ केली परंतु एकंदर वातावरण पोलीस स्टेशनसारखें भासले. मी कपडे करुन बाहेर जाण्यास तयार झालो. मी गोविंदरावाना सांगितले की एक, दोन ठिकाणी भेटायचय, 'काही हरकत नाही कामाशिवाय थोडेच कोणी येतो. मात्र १२ वाजता नक्की जेवायला या.

मला एक दोन ठिकाणी भेटायचे होते तिथे मी चालतच गेलो. जिथे जिथे चहाचा आग्रह झाला तिथे, तिथे चहा घेण्याचे टाळले. कारण मला कल्पना होती की आज काही तरी गोविंदरावानंकडे पक्वान्न मिळणार. जर मी चहा प्यालो तर भूक मरेल व त्यांनी एवढ्या कष्टांनी केलेले पदार्थ फुकट जातील.

ठीक साडेबारा वाजता मी घरी हजर झालो. खूप फिरल्यामुळे मला भुकही कडाडून लागली होती.

घरांत जाऊन मी कोट काढला आणि बसलो. मला आलेले पाहून त्यांची बायको साडीच्या पदरानी तोंड पुसत बाहेर आली व म्हणाली 'आपण आलात' हे ही तुमच्या पाठोपाठ येतीलच. असे सांगुन परत स्वयंपाक घरात निघून गेली.

वेळ जाऊ लागला मी घड्याळात पाहिले. साडे बाराच्या ऐवजी एक वाजुन दहा मिनिटे झाली एव्हाना माझ्या पोटात कावळे ओरडायला लागले ठीक दीड वाजता ते आले. येताच मी सुटकेचा निश्वास सोडला. माझ्याकडे बघत ते हसत म्हणाले आज फार उशीर झाला. केव्हा आलात ? आताच आला काय ?

'नाही अर्धा तास झाला' 'तर मग काही हरकत नाही. या जेऊ या' जेवायला बसलो तेव्हा पक्वान्नाची कल्पना हवेतच उडाली. परंतु आमटी-भाजी इतकी तिखट होती की मी अधिक जेवलो की पाणी अधिक प्यायलो याची शंकाच आहे. 'आज मी प्रवासाने थकल्यामुळे संध्याकाळी जेवणार नाही' हे त्याच वेळी सांगून टाकले. माझी रीं गोविंदरावानी ओढली ते म्हणाले, 'घरुन बाहेर निघाल्यावर शक्यतो एकदाच खावे नाहीतर प्रकृती बिघडण्यास वेळ लागत नाही.' रात्री नऊ वाजता मी घरी आलो तो रामराव माझीच वाट बघत होते. "वाह ! छान झालं आपण वेळेवर आलात चला सव्वा नऊच्या शोला जाऊ." मी खूप थकलो होतो व मला सिनेमा बघण्याची मुळीच इच्छा नव्हती. मी काही टाळाटाळी करायच्या अगोदरच ते म्हणाले 'तुम्ही पहिल्यांदाच आमच्याकडे आलात आम्हाला आमचे कर्तव्य केलेच पाहिजे. त्यांचे एकूण आदरातिथ्य पाहून मी थक्क झालो.

चित्रपटगृहाजवळ आम्ही उतरलो. तर गोविंदरावानी आपल्या कोटाचे सर्व खिसे चाचपायला सुरवात केली व जसे काही पाकीट घरीच विसरलो आहे असे भासविले. त्यांची अ‍ॅक्शन पाहून माझ्या मनात चर्र झाले. माझ्याकडे पहात ते म्हणाले, 'गडबडीत पाकीट घरीच विसरले' आता काय करायचे.'

'चला परत' ... शब्द ओठातच राहिले. मी पाहिले की आता पर्याय नाही. गपचुप वाहनाचे पैसे व तिकीटासाठी दहा रु. नोट दिली गोविंदरावांनी २-६० ची तिकीटे काढली व बाकीचे पैसे मला परत देण्याऐवजी आपली बुद्धी किती मंद आहे ह्यावर भाषण द्यायला सुरवात केली.

रात्री १२ वाजता घरी आलो. मी अर्धवट पेंगतच होतो. तो दरवाज्यात येवून म्हणाले 'जेव्हां कुणी पाहुणा आला तर फार मुष्कील होते कारण की ही जागा घरच्याच माणसाना पुरत नाही. हे ऐकून मला धक्काच बसला. मला वाटलं हे आता मला गल्लीतच झोपवतात. परंतु लगेच ते म्हणाले मी तुमच्या झोपण्याची व्यवस्था संध्याकाळीच केली आहे. शेजारी मनोहरराव राहतात त्यांची बायको बाळंतपणाला माहेरी आहे ते सध्या इथे एकटेच आहेत, तो फार चांगला मनुष्य आहे. जेव्हा इथे एखादी मारामारी होई तेव्हा दोन खाऊन सुद्धा भांडणे सोडवित असे. ते दहा एक पावले चालून मला त्यांच्या खोलीकडे घेवुन गेले.

'अहो मनोहरराव ! अहो मनोहरराव' त्यांनी दरवाजा वाजवला. आवाज दिला असा चांगला पंधरा मिनिटं कार्यक्रम चालला शेवटी मनोहरावानी कडी काढली. आतून कडी लावायला व लाईट बंद करायला सांगून त्यानी पुन्हा आपल्या घोरा सुराच्या आख्यानाला प्रारंभ केला.

रात्री एकाएकी चारपाच लाथा तोंडावर पाठीवर बसल्या मी लाईट लावला तर हे महाशय, (मनोहरराव) मी त्यांच्या लाथा उचलून परत सरळ केल्या. झोपेत त्यांनी विचारले 'काय झाले ? लाथा बसल्या काय ? ही मला फार वाईट सवय' आहे असे सांगून पुन्हा निद्राधीन झाले. त्या लाथांसाठी मला सात आठ वेळा लाईट लावून त्या सरळ कराव्या लागल्या. दुसऱ्या दिवशी बारा वाजता मी घरी आलो. तर हे कुटुंब नवीन कपडे घालून तयार झाले होते. गोविंदराव म्हणाले "तुमच्या वडीलांचे आमच्यावर एवढे उपकार आहेत की मी आपल्यासाठी एक मुलगीही शोधू शकत नाही म्हणजे काय ?"

माझ्या डोक्यात त्यांची कल्पना आली म्हणजे मला मनासारखे स्थळ म्हणून दाखवून दोन चार ठिकाणी मेजवानी झोडण्याचा ह्यांचा बेत आहे. मी लगेच नकार देण्याचे ठरवले परंतु गोविंदरावांनी अडवत म्हटले " घर आले ' मी भिडे खातर गप्प बसलो.

दिवाणखान्यात शिरताच आमचे भव्य स्वागत झाले. मी मनात गोविंदरावाना लाखोली वाहिली. तेवढ्यात एक लठ्ठ सुंदरी बाहेर आली. मी माझे डोके उगीचच पेपरमध्ये खुपसले. हे इनामदारांचे घर होते. गोविंदरावानी ठरविल्याप्रमाणे साग्रसंगीत मेजवानी झाली. इनामदार मुख्यमुद्यावर आले ते म्हणाले आम्हाला मुलगा पसंत आहे. २५ हजार हुंडा देऊ. वडीलांना दाखवायचे नसल्यास आताच साखरपुडा उरकून घेवु. गोविंदरावानी मला दाबायचा बराच प्रयत्न केला. पण न राहून मी माझे लग्न झाले आहे हे घोशीत केले. मग काय विचारता ? हे जेवण्या अगोदर का सांगितले नाही म्हणुन इनामदारांनी गोविंदरावाची चांगली खरड काढली. घरी आल्यावर नवरा बायकोतही चांगलीच जुंपली. मी मात्र छोटी वळकटी घेऊन सटकलो.

मी त्यानंतर प्रतिज्ञा केली की या नंतर फक्त हॉटेलचाच पाहुणा बनेन कुणाच्या घरचा नाही !

## सारे काही अजबच

एक तऱ्हेचा जंत आहे. कापून त्याचे तुकडे केले तर प्रत्येक तुकड्याला एकेक बोट व एकेक शेपटी येते.

★

जगातील प्रचंड घड्याळ न्युयॉर्कला आहे. त्यांत एकूण चार तबकड्या असून त्यांचे प्रत्येकांचे आकारमान २९ फूट ९ अिंच आहे. प्रत्येक तासाचा आकडा चार फूटाचा तर मिनिटाचा आकडा दहा अिंचाचा आहे. मिनिटकाटा १७ फूट लांब असून तास काटा १३ फूट ४ अिंच लांब आहे. या दोन्ही काटयांचें वजन अनुक्रमे १००० व ७०० पौंड आहे. हे घड्याळ २५ मजली अिमारतीवर बसविलेले असून त्याच्या मनोऱ्याची उंची ७०० फूट आहे. या घड्याळाचा तासाचे ठोके देणारा लंबक ७००० हजार पौंड वजनाचा आहे.

★

फ्रांन्स ते ब्रिटीश खाडी १४ १/२ तासात पोहून जाण्याचा विक्रम अंधानी केला आहे.

अमेरिकेतील 'संडे न्युयॉर्क टाअीम्स' या वृत्त पत्राच्या अंकाची संख्या ३६८ पाने (आपल्याकडील वृत्तपत्राच्या आकाराची पाने) असून त्याच्या निम्म्या आकाराची पाने ३४८ आहेत व या सर्वांची किंमत फक्त ३० सेंटस्.

★

प. बर्लिनमधील पांढरपेशा महिला कॅथे डेनिक एक अजब परकी भाषा बोलते. तीची भाषा तिच्या बहीण-भावांना, मित्रानाही समजत नाही. शब्दकोशातही ती सापडत नाही. त्या उलटे शब्द बोलतात. १९३३ साली जर्मन टेलिव्हिजनवर तिच्या या बोलण्याचा एक कार्यक्रम झाला. त्यावेळेसपासून तिला केणानिक हे टोपण नाव मिळाले. उलटे बोलूनही ती एकही चूक करीत नाही. व अडखळतही नाही. उलटे बोलताना ती योग्य शब्द व अक्षरावर भर देते.

★

# सारे काही अजबच !

संग्राहक– गणेश वसंतराव व्यवहारे,
पदवीपूर्व विज्ञान.

卐

आफ्रिकेच्या किलीमांजरो पर्वताच्या उतारावर पॅस्तर सॅमसॅन साकारोगारो नावाचे १५८ वर्षांचे गृहस्थ राहतात. त्यांनी १८५९ साली डॉ. डेव्हिड लिव्हिंग्स्टन यांची भेट घेतली होती. त्यांना ५७ भावू व १४५ बहिणी होत्या. त्यांच्या वडिलांना ३९ बायकात्या. व ते वयाच्या १२३ व्या वर्षी निधन पावले. त्यांना स्वतःला ३ बायका होत्या. १९३८ मध्ये वयाच्या १२५ व्या वर्षापर्यंत त्यांना तिच्यापासून ३ अपत्ये झाली. त्यांची प्रकृती अजूनही उत्तम आहे.

卐

जॉड्रेल बँकेचे शायर येथील ( इंग्लड ) वेध-शाळेतील प्रचंड मोठ्या रेडिओ बिंदुणीतून अद्यापपर्यंत ज्यांचा प्रकाश पृथ्वीवर पोहोचलेला नाही अेवढ्या दूर अंतरावरील 'काळे' तारेही दिसू शकतात. नुसत्या डोळ्यांनी ते तारे पाहण्यासाठी ४७०० वर्षे लागतील.

卐

उत्तरध्रुवावरील टर्न ( समुद्रपक्षी ) दरवर्षी अन्नासाठी किंवा विश्रांतीसाठी न थांबता अटलांटिक-वरुन ३५,४०० कि. मी उड्डाण करतो. स्थलांतरापूर्वी हा पक्षी आपल्या त्वचेखाली चरबी स्वरुपांत शक्तीचा साठा करतो. प्रवास कमी झाल्यावर त्याचे वजन १/३ कमी होते.

卐

न्यूझीलंड, आअीसलंड, व येलोस्टोन पार्क व्योमिंग (अमेरिका) तील ज्वालामुखी प्रदेशात येणारे गरम पाण्याचे झरे नैसर्गिक आहेत. त्यांच्या पाण्याचा झोत ७६ मिटर्सपर्यंत उंच जातो. त्याच्या गरम पाण्यांत स्थानिक लोक बटाटे व अंडी उकडतात.

卐

卐

आफ्रिका खंडाच्या पूर्वकिनाऱ्यावर कोकिळेप्रमाणे गाणारा मासा सापडतो. त्याचे वैशिष्ठ्य म्हणजे तो ६ कोटीवर्षापूर्वीचा असून आजही त्याच स्थितीत आहे.

卐

अमेरिकेच्या जंगलात सापडणारा पेक्टारी हा छोटा प्राणी सहकार भावनेचे शिकारी येताच विशिष्ट शीळ वाजवतो. ती ऐकून थोड्याच वेळात बरेच पेक्टारी तेथे जमतात व शिकाऱ्याला 'भीक नको पण कुत्रा आवर' असे करतात.

卐

म्युनिचची क्लाडिया मायकेल ही ३ वर्षांची जलतरपटू असून तीने अेका खास राखून ठेवलेल्या तलावात ३० मिनिटे पोहण्याचा विहार केला. त्यासाठी तीने हेंझबारमीस्टर या तिच्या शिक्षकाकडून ६ आठवड्यात पोहण्याचे २७ पाठ घेतले. त्यानंतर परवाना मिळविण्यासाठी अर्धा तास पोहून यशस्वी झाली.

卐

सायाळीच्या काट्यांचा पूर्वी टाक म्हणून उपयोग करीत. तीच्या शेंपटावरील काटे पेल्यासारखे असतात. ती जेव्हा बीळ करते, तेव्हा कडक जमीन लागल्यावर शेपटीच्या पेल्याच्या आकाराच्या काट्यात जवळच्या जलाशयातून पाणी भरून आणते व ते बिळात शिंपडून जमीन मऊ करते. त्यामुळे तीला जमीन उकरणे सोपे जाते.

卐

निरोगी माणसाच्या बाबतीत दर सेंकदास ९१ फूट या वेगाने ज्ञानतंतू मेंदूला बातमी पोहोचवितात. दारु घेतल्यावर हा वेग ७ फूट कमी होतो. आणखी घेतल्यावर वेग झपाट्याने कमी होवून शेवटी निरीक्षण व विचारशक्ती नष्ट होते.

सांढा या प्राण्याचे शरीर ३ फूट लांब असते. शेपटी जाड व मजबूत असते. तो जोराचा तडाखा मारु शकतो. त्याच्या शरीरावर २, ३ अिंच जाडीचे खपल्याचे चिलखत असते. त्यामुळे शरीराला मार बसला तरी तो लवकर मरत नाही. सौराष्ट्रात आढळणाऱ्या या प्राण्याचे तेल काढून नपुंसकत्वावर वापरतात त्याला पांढऱ्या मुंग्या आवडतात.

卐

अमेरिकेतील बोंबोलिंक पक्षीमधूर गातो. तो चिमणीसारखा दिसतो. त्याचा वर्ण काळपटच आहे. भाताची कणसे त्याला फार आवडतात. कुरणात, दलदलीच्या जागी उंच भागावर घरटे बांधून राहातो. भात, बिया, सुरवंट, अळी बारीक किडे हे त्याचे आवडते खाद्य होय.

卐

जगातील सर्वात उंच पर्वत श्रेणी डन्फिन 'राअीज' ही पर्वताची रांग आर्क्टिक महासागरापासून अंटा र्टिक्ट महासागरापर्यंत पसरलेली असून त्याची सर्वात उंच शिखरे समुद्राच्या पृष्ठावर आलेली आहेत. ओझोर बेटे व कॅनरी बेटे याच्यातील उंच शिखराबरोबर माअुंट अेव्हरेस्ट बसविले तर ते पाण्यांत बुडेल.

卐

लॅपविंग हा एक टोकदार पंखाचा पक्षी सुसरीचा दंतवैद्य असतो. तो तिच्या जबडयांत शिरुन तिच्या मोठया दातात अडकलेले पाणतंतू व अन्नाचे कण खातो. सुसरीला ते समजले तरी ती त्य.ला यत्किंचितही इजा करीत नाही.

卐

फ्रान्समधील राष्ट्रीय वाचनालयांत ८० लाख पुस्तके आहेत.

卐

कॅलिफोर्निया येथें अि. सी. लिंडसे यांच्याकडे एक अशी कोबडी आहे की ती रोज हिरवे अंडे देते.

卐

व्हिक्टोरिया या ऑस्टेलियातील प्रांताच्या विमेरा जिल्हयात बालमोरल गावो श्री. लिंडसे स्मीट यांच्याकडे अेक १० वर्षाचे गुणी माकड आहे. त्याचे जॉनी असून ते ट्रॅक्टर चालविते, दरवाजा उघडते, बंद करते, शेतकऱ्याच्या मेंढया पाळते, रात्री घराचे संरक्षण करते, सरकारने त्याला मजूर म्हणून मान्यता देवून योग्य प्रमाणात त्याच्या मालकाला उत्पन्नात सूट दिली आहे.

卐

मांजरी ५० दिवसांनी, कुत्री ६० दिवसांनी, बकरी ५० दिवसांनी, गाय २८५ दिवसांनी, म्हैस ३१० दिवसांनी, घोडी ३४५ दिवसांनी, गाढवी ३८० दिवसांनी, हत्तीण ६१५ दिवसांनी व मानवी बाअी ९ महिने ९ दिवसांनी म्हणजे पाश्चात्याच्या वैद्यकाप्रमाणे २८० दिवसांनीं विते.

卐

मँचेस्टर येथे ( ब्रिटन ) अेका जहाजाच्या डोक्यावरुन दुसरे जहाज जावू शकते. जहाजाच्या मँचेस्टर कालव्याच्या डोक्यावरून मार्टन कालव्यातून ब्रिजवॉटरचे पाणी वाहाते. मोठाल्या जहाजाना जहाजांच्या कालव्यातून जातायेण्यासाठी ६२ मीटर्स लांबीचा वरचा कालवा झोका घेवून बाजूला होतो.

卐

अमेरिकेतील राल्फ नावांच्या कुत्र्याला वाचता येत होते.

卐

लंडनमधील एका भाजी विक्याचा मुलगा जॉन थॉम्पसन हा एकदा वर्तमानपत्र वाचल्यानंतर त्यातील सर्व मजकूर शब्दन शब्द म्हणून दाखवू शकतो.

卐

कॅलिफोर्नियात एक झाड असे आहे की, त्याच्या फांद्या एक मैलापर्यंतच्या परिसरात पसरलेल्या आहेत.

卐

जपानमधील अॅना नावाच्या झाडातून सुर्यास्त होताच धुराचे लोटच्या लोट बाहेर येतात.

# कविता —

समुद्रापल्याडच्या त्या गावांत
'पाहुणी' म्हणुन गेलीस
साऱ्यांची नजर तुझ्यावर स्थिरावली
आणि तूं
शून्य मनाने भरती खालची
वाळू झालीस
उगीचच सारवासारव ...
वाकून नमस्कार केलास
तेव्हा समुद्राचे वारे म्हणाले
सोनचाफा बहरला ...
मी मिटलो काळोखाच्या गुहेत
आणि म्हणालो समुद्र ... समुद्र ... मुद्र

– सुरेश तोटावार

★

★

तेव्हा तू स्वप्नांत
स्वप्नात आलीस
बागेत पडल्या चांदण्याचे
पाणी पिउन
मत्त रात्रीचा मोरपंखी
विरह घेवून
सजवल्या गात्रांचा शृंगार
पसरवलास माझ्या अंगांगावर
आणि धुंद केलेस रात्रीला
सर्वस्वाच्या सौद्यावर ...

उठल्या सूर्याला
झोपवायला गेलो
तेव्हा वाटेत
एक गांव लागला
रक्तचंदनाच्या मांडीवर
हाडाचा तंबोरा ठेवून
स्वगंध प्यालेला
गवई भेटला ...

– गंगाधर जोशी

## तरंग

आहेत डोहासारखे
तुझे निळेभोर डोळे
आत टाकतो मी खडा
तरंग देखील निळे निळे !

– बोधनकर यु. आर.

★

## झड

आत्ता,
आणि आत्ता ऽऽ
कंटाळवाण्या अपयशाची झड
सुरु झाली ......
पानझाडी सारखा क्षण न् क्षण
झडणार !
असे ओझे अवघड !

– द. ग. तुमवाड

★

## काळवंडलेल्या वाटेने

काळवंडलेल्या वाटेने जातांना
ठेचा खात ठेचा खात चालतांना
उगीचच वाटते नको हे जीवन
पण त्याच्याच मागे लागते मन
जे करायला तयार असतो
त्यालाच धजत नसतो.

– आनंद बोरगावकर

★

## अशीच तूं लहरी —

घडवलेंस अंगण
चोरामोराचे झाड लावून ...
मस्त गुलाबी
कन्हेरी खुडलीस
काळजाला बोट लावून ...
रात्रीला दिलेली
शेवंतीसुद्धा परत आणलीस
डोळ्याला गळा लावून
आणि आता
फिरायला जाते म्हणत्यस ...
जा –
पण चंद्रालाही बरोबर
घेवू नकोस !
व्यभिचारिणी म्हणुन
चांदण्या तुला हसतील ......

– गंगाधर जोशी

स्वच्छ चांदणी रात्र
चंदनाच्या गंधासारखी सुगंधी
मनेहि अशीच स्वच्छ
केवड्याच्या वासासारखी
गाणे तर तरल मुलायम
मौनाचेहि मोरपीस व्हावें ...
मनाच्याही पानावर
स्वरांचे दहिवर झुलावे ...

एकच रात्र उधळली
तेव्हा तूं स्वप्नात होतीस
अंग-अंग न्हाली चिंब ओली ...
केवड्याने केस बांधले तेव्हा तूं जागलीस

– गंगाधर जोशी

卐

तुझे नाचणीचे मयूर डोळे
सांगन गेले शब्द शिंपले
आठवताना उगीच ढळले
शिल्पावरचे पदर निळे

– नारायण देशपांडे

लक्षच जायचे नव्हते
तिथेच गेले
आणि नजर
पंख भरार झाली
उमलल्या कळ्या
पाकळ्यांची स्पंदने
वेलीला ही ऐकू गेले
निःशब्द कुजबुजणे
भारलेली हवा
पंखावरची संध्याकाळ
बन भरल्या गाण्याचा
उधळला ... शुभ्र गुलाल...

– नागनाथ पाटील

# एक कविता

मदोन्मत्त वृक्ष
प्रफुल्ल खांदे
लाजरी नजर
मनांत चिंतन
लागली चटक
राहवेना सूर
कुठेना कुठें
निघतो धूर
विस्तवाचा भडका
विस्तवानेच गारठा

– आनंद बोरगावकर

# एक कविता अथवा कित्ता

भाग्याचे अक्षर उमटत नाहीत
उमटलेले अक्षर पूसत नाहीत
अक्षरावर उमटलेली गिरवतो कित्ता
कित्त्यातील अक्षर उमगत नाही,
गिरविण्यांची नौका वल्हविता वल्हविता
थकलेल्या हातांनी
किनाऱ्यावरची हिरवळ मुसमुसलेली ती
झाडी मध्येच डोकावून पाहणारे गुलाबाचे
फूल माझ्याकडे पाहून हसतच राहिले.

— रावनपल्ले खानापूरकर

रात्र रात्र छळली
पान पान होऊन
उभा काटा पेटला
रान रान होवून
लक्ष लक्ष दिवे
पेटविले
करुन काळजाचा गाभारा
विसरुन मनोरा
अंग अंग पेटवावे
पाहून फुलोरा

— कु. विजू राजेंद्र

# हिरव्यागार रानात

हिरव्यागार रानात
सोनेरी उन्हात
भरल्या मनास
कुणाची भूल
भूल ताई भूल
चांदीचा पूल
रेशमांची झूल
सार कसं छान छान
चिंचेच पान
चिंचेच्या पानावर
घर माझ लहान

— नागारेड्डी डोंगाले

# आम्हीतले 'मी'

आम्ही म्हणजे कांही नाही
आम्हीतले 'मी'
मेलेलेही नाहीत आणि जिवंत ही नाहीत
अधांतरीच लोंबकाळणारे !

तारेला अडकलेल्या वटवाघळासारखे !
त्याला तारेचा आधार तरी असतो
इथे तरी तो ही नाही
कांही 'मी' ना

'मी' शिवाय कांहीच दिसत नाही
कांही 'मी' स्वतःला जागविण्यासाठी असमर्थ
अखेर 'तुम्ही' कडे पाहणारे 'मी'
लाखात एक दोन आहेतच की !

त्याची अवहेलना करायला ही
हे मुळीच मागे नाहीत ! !
नाही म्हणायला यांच्यात ही
मानवतावाद आहेच की ?

करुण दृष्य पाहून
यांचे दयेचे शब्द ? उतू जातात
जाळावरच्या दुधासारखे ... ! !
पण ...... पण ..... !

— गोविंद डोनगावकर

# वाटतं

वाटतं जांभुळ झाडांनाही
सोन्याचं फळ लागावं

आणि —

चकचकत्या नजरांनी
त्यांना लुबाडावं
वाटतं आपणहि लहानशा पंखांनी
आकाशभर हिंडावं

आणि —

यौवनमत्त झालेल्या पऱ्यांना
सैरभैर करावं
वाटतं आपणहि अवखळ वारा
होऊन पळत सुटावं

आणि —

पोटऱ्यात आलेल्या कळ्याना
बेभान करुन सोडावं

— तेज निवळीकर

卐

# एकटा जीव सदाशिव

निरोप घेणार आहे या जगाचा
हळुवार पणे जातांना

आता अनोखा मार्ग
फक्त नाकासमोर येणार येतील
जाणारे जातील पथावर भेटतील
तेथे आपले

संदेह नको संघर्ष नको
संख्य नको नातलग नको
माग नको पान नको
स्वकीय नको परकीय नको

सोनं नको, नाणं नको
माया नको, ममता नको
एकटा जीव सदा राहो सदाशिव
येतांनां सोबत नव्हती

जातांना का असावी
हीं अमर ज्योती

— रमेश देशमुख

卐

# पानवंताच्या शेवरीवरती –

पानवंताच्या शेवरीवरती
थांबून म्हणालीस,
असाच एकदा खैबरखिंडीतून
सिकंदर आला बारा सूर्याचे बळ एकवटून !
मी म्हणालो, आला तसाच गेला
बिचारा कात टाकून !
तो म्हणाला, गंगा यमुनेच्या दुआबातरी
टाकलाय म्हणे ओंजळभर पाणी
चूळ भरुन !
या भूमीवरुन येणारे पाय जाणारे पाय
असे किती तरी पायच पाय !
तू म्हणालीस, शनीवार वाड्यात
मस्तानीचे प्रेत रडते आहे
मी म्हणालो, तिच्या आसवांत बाजीची विरगाथा
फुरफुरते आहे
तो म्हणाला, ताजमहालच्या शिखरावरती
शहाजहानचे भूत पिसाळले आहे
या दगडावरती त्यांचे नांव आमुचे नांव
असे किती तरी नांवच नांव
ती म्हणाली, पानिपतच्या समरांगणी
पार्वतीबाईचे कुंकु विरघळले आहे
मी म्हणालो, रणजीतसिंगाची ही तलवार
येथेच मोडली आहे !
तो म्हणाला कर्णाच्या रथाचे चाक
कुरुक्षेत्रावर जीवंत आहे,
या धरणीच्या ओठी त्यांची गीता रथाची गीता
अशा किती तरी भगवद्गीता
ती म्हणाली, या स्वस्तीकावर
चंद्र सूर्य खेळत आहेत
मी म्हणालो, माझ्या कवटीवरती
इंद्राचा रथ धावतो आहे
तो म्हणाला आमुच्या खांद्यावर
कालीयांचा फडा डुलतो आहे
या डोक्यावरती त्यांचा भार ह्यांचा भार
असे किती तरी भारच भार

— दत्तात्रय बापूराव आडलूरकर

卐

## हजारोंचा आत्मा

अंधाराच्या साम्राज्यात
होते अनेक जीव दडुन
काळाच्या जबड्यात
गेली कित्येक फूल सुकून
मृत्यू होता काळा अमावस्येच्या रात्रीसारखा
पण कुठे तरी विद्युल्लता सांगत होती
आहे हजारोंचा आत्मा तेवत
प्रखर ज्योती सारखा !

— अविनाश शेवाळकर

卐

## ओलावा

फिरलो, भटकलो वण् वण् करीत
जगाच्या वाळवंटी त्यासाठी
वावरतांता भास झाला ओलाव्याचा
सापडला नाही ओलावा अजून
कित्येकदा घडले असे हे
तरी ओलाव्याचे स्थान मिळेना
अंतरीची तहान भागेना

— कळसकर गंगाधर

卐

卐

## भूक

एकदा लागली
खापराची भूख !
सावली देते,
तेवढेच सुख ! !

मागच गुपीत
असेल काय ?
अशीच व्याली
धरणी माय ! !

सुंदरसा बाळ,
मानव जन्मला।
वरच्या देवाला
प्रश्नच पडला ॥

आता बाळाला
निजवावं कुठं।
मंत्राने निमिले,
खापर खोटं ॥

खापराचा ओटा
खापराचं घर।
मानवाला पडला
स्वतःचा विसर ॥

लागली त्याला
एकदा भूख।
खापर खाऊन
मिळविलं सुख ॥

— 'निलेश' —

卐

## कल और आज

ओ ! मेरे प्यारे बच्चे,
तू रो मत, तेरे लिए नही
यह मेवा और मिठाई
 ओह ! मेरे प्यारे मुन्ने,
 तू रो मत, तेरे लिए नही
 सुन्दर कपडोंकी रोशनाई
ओ ! मेरे प्यारे बेटे
तू देख मत, तेरे लिए नही
किसी की भी सच्ची कमाई
 मेरे प्यारे मुन्ने
 तेरे लिए केवल घोषणाएँ
 दीवार पर लगे पोस्टर
और नेताओंके आश्वासन
शायद अगली योजनामें
तुझे भर पेट खाना,
 कपडे, शिक्षा सबकुछ मिलेगी
 देख अब रो मत
 पडोसी का रडिओ बज रहा है
जन गण मन
अधिनायक जय हे .........
......... जय हे ! जय हे ! जय हे ! !

– गोविंद बा. ( कला उपांत्य )

卐

## एक दिन ऐसा आए

एक दिन ऐसा आए, आँखो का पानी सुख जाए
दिल की बात दिल न समझा तो क्या आँसू व्यर्थ बहाए
एक दिन ऐसा आए, सब की इच्छा पूर्ण हो जाए
खिले कलियाँ सब तन मन सबके भर जाए
दारुण दुःख का खडा यह पहाड, चूर चूर हो जाए
मानव के पथ का रोडा सत् पथसे हट जाए
एक दिन ऐसा आए कि दूविधा दूर हो जाए
शोषित पीडित मानव के सपने सच हो जाए

– होनवडकर बाबुरामराव
पी. यु. सी. कॉमर्स

## माँ !

माँ तू मुझसे दूर है लेकिन
पास मेरे तेरी ममता है
 नाम तेरा जब भी लूंगा मैं
 काम मेरा सब बनता है
माँकी कोख से जनम लिए है
दुनियाके सारे इन्सान
 माँकेही आँचल में पले है
 राम, बुद्ध हो या रहमान
धरती का कागज बनवाकर
लेकर, सागर की स्याही
 शब्द रंग की अभिव्यक्तीसे
 व्यक्त न होगी तेरी बडाई

– इफ्तखार अली, बिलोलीकर
बी. कॉम. द्वितीय वर्ष

卐

## विकृति

था एक जीवन सपना
सुप्त निद्रा में गहन
प्रकृती पुरुष को
जगाया देकर अभय वरदान।
 वरदान या अभिशाप
 दोनो थे मगन अनुराग में
 सावन की मादक ऋतुमें
 थे विलीन मधुप्यार में ॥
भौरोकी गुन गुन कितनी
कोयल की तान थी
भविष्य की स्वप्न माला
हिम गिरीसी साकार थी।
 था युग या क्षण एक
 था सपना या जागृति
 था हिम या गिरी केवल
 थी मानव जीवन की विकृती ॥

– सुगापकर एस. एच.
P. U. C. Arts

## संपादक

मराठी विभाग



श्री. जोशी गंगाधर यशवंतराव
बी. ए. तृतीय

हिन्दी विभाग



श्री. रेनगुंठवार रमेश लिंगुराम
बी. ए. तृतीय



कु. हसीना बेगम
बी. ए. तृतीय
प्रतिनिधी विद्यार्थीनी



श्री. देशमुख एस. टी.
बी. ए. तृतीय
वर्ग प्रतिनिधी



श्री. डाकोरे दत्ता बी.
बी. ए. द्वितीय
वर्ग प्रतिनिधी



श्री. डांगे लक्ष्मण
बी. ए. प्रथम
वर्ग प्रतिनिधी

# वर्ग प्रतिनिधी



श्री. खुर्ने आर. एन.
बी. एस्सी. प्रथम
वर्ग प्रतिनिधी



श्री. अक्येमवार मोगलाजी हुलाजी
बी. कॉम प्रथम
वर्ग प्रतिनिधी



श्री. पाटील व्ही. आर
बी. ए. प्रथम
वर्ग प्रतिनिधी



श्री. पाटील रनवीर अमृतराव
पदवीपूर्व शास्त्र
वर्ग प्रतिनिधी



श्री. लिंगपूरे सीताराम रामचंद्र
पदवीपूर्व वाणिज्य
वर्ग प्रतिनिधी



श्री. कळसकर रमेश
अंतर महाविद्यालयीन
रनिंगमध्ये द्वितीय



श्री. जाधव काशिनाथ
पदवीपूर्व कला
वर्ग प्रतिनिधी
कोचिंग कॅम्पसाठी निवड



श्री पाटील व्ही. आर.
बी. ए. प्रथम, वर्गप्रतिनिधी
अंतर महाविद्यालयीन
कोचिंग कॅम्पसाठी, रनिंगसाठी
निवड

# एन्. सी. सी.
## ( देगलूर महाविद्यालय )



श्री. बोगूलवार व्ही. एस.
बी. कॉम तृतीय
सिनिअर अंडर ऑफीसर



श्री. सोनटक्के विश्वांभर माणिकराव
बी. ए. तृतीय
ज्यूनिअर अंडर ऑफिसर



श्री. दुगंकर एस. एस.
बी. कॉम तृतीय
ज्यूनिअर अंडर ऑफिसर



श्री. नांदेडकर धनंजय गोविंदराव
बी. कॉम. तृतीय एन. सी. सी.



श्री. धुळेकर रमेश संग्राम
बी. ए. प्रथम सी. एच. एम.

## ग्रुप फोटो



श्री. पोशट्टीजी उनगृतवार वर्ग प्रतिनिधी यांच्या समवेत



श्री. पोशट्टीजी उनगृतवार भाषण करीत असताना

महाविद्यालयीन खेळाडू --



टेबल टेनीस खेळाड



व्हॉली बॉल टिम

**ग्रुप फोटो --**



आमदार श्रीमती मृणाल गोरे समवेत प्राचार्य व विद्यार्थी प्रतिनिधी



कलापथक संच प्राचार्या समवेत ग्रुप फोटो



सर्व वर्ग प्रतिनिधीचा प्राचार्या समवेत ग्रुप फोटो



**प्राचार्य डांगे ( शिवाजी महाविद्यालय परभणी ) खाडिलकर जन्म-शताब्दी निमित्ताने भाषण करीत असताना**



क्रिडांगणाचे उद्‌घाटन करीत असताना प्राचार्य धर्माधिकारी

# अभिव्यक्ति

# हिंदी विभाग

"…. हूँ प्रताड़ित
क्यों कि प्रश्नों के नये उत्तर दिये हैं
है चरम अपराध
क्यों मैं लीक से इतना अलग हूँ…
क्या करुँ
जो शम्भु-धनु टूटा तुम्हारा
तोडने को मैं विवश हूँ ।…"

– गिरिजाकुमार माथुर


मार्गदर्शक–

**प्रा. सत्यनारायण जाजू**
**प्रा. हरिकिशन राठौर**

संपादक–

**श्री. रमेश रेणगुंटवार**
कला ( अंत्य )

कु. रंजना देशमुख माळेगांवकर
बी. ए. द्वितीय

# प्र ती क्षा

रात का समय था। बाहर रिमझिम वर्षा हो रही थी। और इसी वातावरणमे किसीके आनेकी आहट सुनाई दी। यह आहट, यह आवाज आजही नही बल्की आठ दिनोसें नीता सुनती आ रही थी। उसका दिल न जाने क्यों घबरा रहा था। उसने पहले पहले इस आवाजकी तरफ ध्यान नही दिया लेकिन दो दिनसे उसका मन उसे भुलनेको तैयार नही हो रहा था। वह आवाज नीताको अनजानी थी। लेकिन आज उसने निश्चय कर लिया कि बाहर जाकर देखे कि किसके आनेकी आहट है। पहले उसने सोचा था कि माँ को जगा दूँ क्यों की आज उसका ध्यान पढाई मे न था। लेकिन तो भी उसनें माँ को न कहते ही बाहर आकर देखने का प्रयत्न किया, लेकिन उसको कोई भी नजर नही आया। थोडी देर तक वह बारीश मे खडी देखती रही। हवा बहोतही थंडी चल रही थी। थोडी देर बादसे फिर वही आवाज...। उसने उपर देखा और वह चौक गयी। एक सुशिक्षीत सूट पहना हुवा नवयुवक सिर पर मफलर ओढकर ढंडमे खडा देख रहा था। उसने नीता को उपर छतपर आने के लिए कहा। लेकिन नीता देखती ही रह गयी। और जो हुवा सो होगा यह सोचकर नीता उपर जाने लगी। एक मन कह रहा था कि, नीता यह तेरा अचानक किसी अनजाने लडकेके बुलानेंपर जाना ठीक नही है। लेकिन एक मन कह रहा था कि न जाने बेचारा आठ दिनोसे यह बारीश मे क्यों आ रहा है। उसका क्या काम होगा पूछना मेरा फर्ज है। उपर छतपर आकर उसने चारो तरफ नजर दौडाई और यह निसर्ग दृष्य देखकर मन रोमांचीत हो उठा। उसका ध्यान अबतक उस युवक के तरफ न था। जब वह सामने आया तो वह घबरा गयी। उसके दिलकी धडकन बढती गयी, साहस बटोरकर उसने पहली बार प्रश्न किया "तुम्हारा नाम क्या है?" तुमनें यहा आनेकी तकलीफ क्यों उठाई? जवाबमे उसने कहाँ " मेरा नाम मनोज है। जब मैंने आपको पहली बार देखा तबसे चैन गवाँ बैठा हूँ। अब वह भावावश मे आकर बोल उठा कि नीता मेरी तरफ देखो मेरी हालत कैसी हो रही है। तुमसे मिलनेका मौका मैनें कई दिनोसे आज पा लीया है। तुम्हे देखकर अब मेरे मनको शांति मिलेगी, मुझे माफ कर देना शायद तुम्हे मेरा इस तरह का बर्ताव पसंद न होगा। तुम्हे मुझपर गुस्सा भी आ रहा होगा लेकिन मैं मजबूर हूँ। मै अब सह नही सकता क्यों कीं मैनें जबसे तुम्हे देखा हैं तुमसे प्यार करने लगा हुँ।

इतनी देर तक वह कहता रहा और नीता चुपचाप सुनती रही। कुछ खयालोमे डुबी सी मालूम हो रही थीं। उसने सफेद रंगकी साडी पहन रखीं थी। उसका रूप उस बरसातमे बहोत ही प्यारा लग रहा था। पानी के बूंद उसके मुखपर पड रहे थे और रोशनी से मोती की तरह चमक रहे थे। उसकी सुंदरता पर मनोज मंत्रमुग्ध होकर देख रहा था।

नीता के समझमे कुछ नहीं आ रहा था। उसे एकही आश्चर्य हो रहा था कि उसकी और मेरी न जान न पहचान, और यह प्यार कैसे कर सकता उसके विचार के बदलते भाव चेहरे पर उभर रहे थे। उसकी विचार श्रृंखला तब टुटी जब नीता कह रही थी मुझे माफ करना मै इस बात पर विश्वास नही रख सकती की तुम्हारा यह प्यार सच्चा है। क्षमा करके आप यहाँसे चले जाइए आइंदा आनेकी कोशीश मत किजीये। और यह शब्द सुनतेही मनोज को लगा जैसे किसीने उसे आसमानसे धरतीपर धकेला है। वह प्रार्थना भरे शब्द मे कह रहा था नीता मुझपर यकीन करो मै धोकेबाज नही हूँ। मुझे तुम्हारी बहोत जरुरत है। मुझे निराश मत करना नीता। मै तुम्हारे बिना जिन्दगी कैसे गुजारु मुझपर दया करो मुझे मत ठुकराओं यह कहते हुये उसने ऊसका हाथ अपने हातोमे लेकर अपने आँखोका का पानी पोछा लेकिन नीता अपना हाथ छुडाकर नीचे भाग चली गयी। मनोजको एक धक्कासा लगा वह निराशासे कितनी देर तक खडा रहा। उसे लग रहा था जिन्दगी में कुछ रहा नही। वह निराशासे गीत गाता चला गया। ' जो दिल मे खुशी बनकर आये वह दर्द ही देकर चले गये हाथ चले गये। जो शमा जलाने आये थे वह शमा बुझाकर चले गये हाथ चले गये।''

उधर नीता नीचे आकर अपने कमरेमे गयी। उसको वह गीत सुनाई पडा और वह फूट फूट कर रोने लगी। उसका मन उसे खाने लगा। रातभर उसे नींद नही लगी। रात भर वह तडपती रही। उधर मनोज की हालत बहुत ही खराब हुअी वह रात भर सो नही सका। उसकी घोर निराशा हुअी थी।

दुसरे दिन नीता सुबह उठकर पढ़ने लगी लेकीन उसे जिधर देखो उधर मनोज का आँसू भरा चेहरा ही दीखने लगा। वह सोच मे पडी उसकी माँ जब इसे बुलाने आयी तब उसे आश्चर्य मालूम हुवा नीता का चेहरा उतर गया था। उसने पुछा नीताबेटी तुम आज उदास दिख रही हो कुछ तबीयत तो ठीक है न? लेकीन नीता के पास कुछ जबाब न था।

आज वह कईं दिनोंसे निराश दिखने लगी थी उसने जिन्दगीभर सुख ही पाया था। कॉलेजमे सब लडकियाँ उसे चाहती थी। उसने अपनी आँखोमे आँसू कभी किसीको दिखाये नही और किसीको दुःखी रहने वह रोकती थी। खूद हसती और दुसरोंको हसाती थी उसका यह गुण उसे प्रभावित करता था। लेकीन आज वह कालीजमे गयी जैसेही सब उसकी तरफ देखने लगे थे क्योंकी आज वह नीता नही थी जो कई दिनोंसे कॉलेज मे आ रही थी। आज नीता के चंचलता को शायद नजर लग गयी होगी। आज कॉलेजमे सब तरफ नीता की चर्चा हो रही थी। लेकीन किसीको साहस न हुवा उसके निराशा उदासिनताका कारण पूछे। वैसीही निराशा लेकर नीता कॉलेजसे बाहर निकली। उसकी नजर मनोजके तलाश मे थी। उसे अब पश्चाताप हो रहा था। रातका दृश्य बार बार आँखोके सामने आकर टकराता। उसे लग रहा था की उसने एक दुःखी दिलको ठुकराकर घोर अपराध किया है। उसे अब मनोजकी दया आने लगी।

रात हो गयी थी। सब जीधर उधर सो रहे थे नीता मनोजके खयालोंमे खोई हुवी थी। रात मे उसने सोनेका यत्न किया लेकीन उसमे उसे सफलता न मिली। इतनेमे उसे किसीकी गुनगुनाहट सुनाई दी उसे वह आवाज परीचीत मालूम हो रही थी। झट वह उठी उसने बत्ती जलाई और खिडकी खोली तभी कानोंपर यह आवाज पडी—

"तेरी दुनियाँसे होके मजबूर चला मै बहोत दूर बहोत दूर चला।'' उसने इधर उधर नजर दौडाई उसे दूर कहींसे मनोज आता दिखाई पडा उसका मन प्रफुल्लीत हो उठा लेकीन मनोज खिडकीके पास से गुजरा उसने कुछ कहा नही लेकीन एक चिठ्ठी उसने खिडकीमेसे नीता को दे दी। नीताने काँपते हातोंसे वह चिठ्ठी उठाली और पढने लगी, लिखा था।

प्रिय नीता

मै यहाँसे दूर बहोत दूर चला जा रहा हूँ। यहाँ रहने मे कोई अर्थ नही है। मुझे यहाँसे तुझसे बहोत दूर जाना है। मै तुम्हे भूलाने का प्रयत्न कर रहा हूँ।

लेकीन नीता यह मुझसे कभी नही हो सकता । एकबार तुम मेरी प्यार की दुनियामे बसी हो और अब नीता तुम्हे भूल जाना यह मेरी बस की बात नही है। लेकीन मै मजबूरीसे यहासे चले जा रहा हूँ । शायद मै तुमसे दूर जाकर तुम्हे भूलने का यत्न करुंगा । और ईश्वर मुझे सहायता करे यही मेरी प्रार्थना है ।

लेकीन नीता मेरे जानेसे पहले मुझे तुमसे कुछ कहना है । तुम्हे देखनेके लिए मेरी आँखे तडप रही है मै समझता हूँ की नारी का हृदय कोमल होता है। उसमे सहानुभुति दिखाने का सामर्थ्य है। भारतीय नारी किसीके दीलसे खेल नही सकती उसके दिलमे ममता का अंश रहता है । मुझे यकीन है तू मेरे प्यार को ठुकरा नही सकती । आज नही तो कल सही लेकीन एक दिन तूम्हे मेरी याद सतायेगी । मै आवारा हुँ, धोकेबाज हूँ यह तुम्हारी कल्पना होगी। लेकीन यह तुम्हारी गफलत है। मै कल शाम ६ बजे गांधीपार्कमे तुम्हारी-राह देखुंगा तुम जरूर आना । मुझे निराश मत करना मै यहाँसे जाते समय तुम्हे देखकर जाऊँगा और फीर कभी कभी तुझे नही मिलूगाँ लेकीन सिर्फ एक बार नीता एकही बांर मुझे मिलनेका कष्ट करो। मुझपर दया करो वर्ना मेरी हालत क्या होगी तुम कल्पना नही कर सकोगी ।

खत लिखता हूँ तेरी याद से शाइ नही समझना ।
मरता हूँ तेरी याद मे जिन्दा नही समझना ॥

सदाकेलिए सिर्फ तुम्हाराही मनोज

अब नीता और मनोज का मिलना बढ गया था । दो दिल एक दुसरे बिना न रह सकते थे । उन्होने एक दुसरे से जुदा न होने की कसमे खाई थी । उनका प्यार दिन पे दिन बढता जा रहा था। एक भी दिन ऐसा न जाता की वह एक दुसरेसे न मिले। लेकीन यह रहस्य रहस्य नही रहा । उनके प्यार की शायद परीक्षा ले रही होगी एक दिन नीता के माँको मालूम हुवाँ और तबसे नीता पर कडक नजर रखी गयी । उसका कही आना जाना बंद कर दिया गया । लेकीन उनका प्यार इतना गहरा हो गया था की यह बंधनोसे वह जिन्दा रह कर भी मौत की तरह जीवन जगाया कर रहे थे । नीता के चेहरेपर एक गहरी पीडा महसूस हो रही थी उसकी हालत बहोत खराब होती जा रही थी । उसका दिल मनोज को देखने के लिए उसकी मीठी बाते सुननेंके लीए तडप रहा था । आज वह दोनो बिछड गये थें लेकीन उनके दिल बिछड नही सकते । लेकीन यह समाज यह समाजोंकी क्रूर बंधने घरके क्रूर बांधनोसे वे मजबूर थे । एक दुसरोको देखने के लिए तडप रहे थे। लेकीन उनकी यह हालत कौन जान सकेगा। आज समाजमे बहुत सुधारणा हुवी है । बहुत प्रेम विवाह हो रहे है लेकीन इन प्रेम विवाहकी पार्श्वभूमी कौन जान सकता है । नीता की तरह मनोजकाभी वही हाल था लेकीन दोनोको अपने सच्चे प्यारपर यकीन था एक न एक दिन उनका मीलन होगा लेकीन कब कितने दिन यह प्यार का इन्तीहाम चलेगा उनके समझ मे नही आ रहा था ।

लेकीन अचानक नीताकी शादी कही दुसरी ओर तय कर दी गयी। जिस इत्तेफाकसे दोनो मिल गये थे उसी इत्तेफाकसे वे एक दुसरे से जुदा हो गये थे। उसने कभी सोचा भी नही था की यह स्थिती आयेगी उसे यह खबर मनोजको भी सुनानेका कोई उपाय न मिला। अब वह बेचारी करभी क्या सकती वह इन बंधनोसे मजबूर हुवी थी । लेकीन कुछ दिनो बाद मनोज को जब खबर मिली तो उसका इसपर विश्वास न हुआ । उसने अपने मनको शान्त रखनेके लिए बहोत यत्न कियां मगर उसका दिल न माना । वह उसी वक्त रात के ट्रेन से बम्बई पहूँच गया । वहाँ जाकर भी उसका दील नीताकी याद मे तडप रहा था ।

कुछ दिनोंके बाद अचानक नीता सामनें नजर आई । वह उसे देखकर हैरान हो गया । क्योंकी उसके कपडे मैलें कुचलें हो गया थे । सर के बाल हवामे उड रहे थे । ऐसे लग रहा था जैसे कई दिनोसें बालको तेल नही लगाया है। पाँवमे चप्पल फट गयी थी। सब से दुःख की बात ये थी की उसके माथे पर सुहाग की बिंदीया नही थी । उसें वहाँ उस हालत मे देखकर मनोज परेशान हो गया । जैसे नीताने उसे देखा वह वही खडी होकर रोने लगी । मनोज जल्दसे जल्द कदम उठाकर नीता कें पास पहुचाँ। मगर उसे उसके साथ बात करने का साहस न हुवा । उसको बहोत कुछ

पुछने का था मगर जैसे मुहमे जबान अटक गयी हो। वह उसे देखता ही रह गया । नीता शरम के मारे मुह नीचे करली और खूद कहने लगी...

जब उसकी शादी तय हो गयी उसे बाहर देखना आना जाना बंद कर दिया था । और उपर इतना कडा पहारा था की वह उसे खत भी न लीख सकी। जब शादी के बाद वह ससुराल गयी उस वक्त उसे सास वगैरे बहोत चाहते थे। उसके पतिका उसपर बहोत प्यार था। मगर उसका दिल हमेशा उदास रहता था। एक दिन हनीमून के लिए जब वह कारमे बैठकर बम्बई आ रहे थे। तो बम्बई के नजदीक ही उसके कारका ॲक्सीडेंट हूवा। उसे तो मार नही लगा मगर उसकें पतिको जबरदस्त मार लगा। उसे वहाँसे बम्बई के हॉस्पीटलमे ले जाते वक्त ही उसका देहान्त हो गया। और उसे सीर्फं सहानुभूती मीली मगर सहाय्य नही मीला। वह कल से दर दर भटक रही थी तो अचानक मनोज मील गया।

उसकी यह दर्दनाक कहानी सुनकर मनोजका दील काँप गया। उसनें उसे उसी वक्त नजदीक कें हॉटेलमे ले जाकर भरपूर खिलाया और उसे अपने साथ अपने मौसीके घर जो की वहाँ रहती थी उसके पास ले गया मौसी तो नीता को देखकर हैरान हो गयी। मौसीने जबान खोलनेसे पहले ही मनोजने कहा मौसी ये बेचारी मुसीबत की मारी यहाँ बेसहारा फीर रही थी। वैसे तो यह अपनेही गाँव की हैं। मगर उसकी बदनसीबी उसे यहाँ लेकें आयी है। बादमे मौसी के पूछने पर मनोजने शुरूसे लेकर आखीर तक कह डाला वह सुनतेही मौसी का दिल पिघल गया। वह उसे प्यार से पीठ पर हाथ फेरा और नजदीक बुलाकर उससें पुछताछ करने लगीं। दिन गुजरते चले गये उधर नीता के घरके ससूराल के परेशान थे। नीता और उसके पतिका समाचार न मीला मगर कुछ दिन बाद अखबारमे वह ॲक्सीडेंट छाप कर आया था। मगर नीताका पता और नाम का कुछ पता न था। इधर मनोज को वहाँ अच्छी खासी नौकरी मील गयी थी। वह इस वक्त भी नीतासे प्यार कर रहा था। मगर नीता उससे खींची खींचीसी रहती थी। इसलीए के मनोज को पसन्द है या नही। और उसे ये गँवार भी न था। की, विधवा की शादी कही प्रेमविवाह मे न बदल जाये। उसका दिल अब भी तडप रहा था मचल रहा था। मगर वह मजबूर थी इधर मनोज की हालत यही थी। वह समाज और अपने रिस्तेदारोंसे डर रहा था। उसी वक्त नीता के ससुराल के उसे ढूंढते वही आ गये। वैसे तो नीता यहाँ है इसका पता न था मगर मनोज के गाँव मे मनोजके मौसीका पता मील गया था। जैसे ही वे लोग आ गये नीताने रोना शुरु कर दिया। उसे मनोज को छोडकर रहना बिलकूल पसन्द न था। मौशी को यह बर्दास्त नही हुवा। मौसी बहोत दिनोसे यह देखते आ रही थी जब ससुरालवाले जबदस्ती करने लगे तब मनोज अचानक बाहेरसे आ गया। नीता भावावश मे आकर उससे लीपट गयी। उसी वक्त मनोज के मौसीने कडी जबानसे नीता के ससुरालवालोसे कहा की वह नीता को अपने पास रखेगी तो बहु बनाकर। यह सूनकर सब हैराण हो गये। यहाँ तक की मनोज भी। आखरी बार उन दोनोकी शादी हो गयी। दो दिल मील गये। वह दोनो आराम से दिन बीताने लगे। सच्चे प्रेमीके प्रेम का अंत यही होता है। मिलते है बिछडते है खुशी होती है गम होता है मगर इतना जरुर है जो लोग प्यारके चक्कर मे फसते है उन्हे खुशींतो मीलती हैं चक्कर बहोत कम ज्यादातर गम उठाने पडते है। तकलीके समाज के नियम और बंधन की हिफाजत करते हुये प्यार जताना पडता है। जो प्रेमी समाज के नियम और बंधनको आँच न आने देते हूवे प्रेम या प्यार करता है। उसे ही सूख मीलता है। मगर यह आसान नही है। उसलीए प्रेम करनेसे पहले तो बहोत खुशी मालूम होती है। समझते है हम किसी पर मरते है। अपने पर कोई मरता है। मगर जब प्यार गहरा होते जाता है और सही कठनाइयाँ लगती है तब मनुष्य व्याकूळ होकर छुटकारा पाना चाहता है। हर प्रेमी व्यक्ति को अपने प्यारका मूल्य चुकाना पडता है। सच्चा प्यार बलिदान माँगता है। नीता के प्यार को पाना उतना सहज नही था जितना मनोज समझता था।

रमेश रेणगुंटवार
बी. ए. ( अंत्य )

# नि र्द यी

मुहल्लेमे होटल होनोके कारण सूबहके समय भीड भी कुछ ज्यादा हीं थी। होटलसे हंसनेकी आवाज आ रही थी। किसीकी गम भरी आवाज आरही थी। जोर जोरसे बाते हो रही थी। कोई कह रहा था, 'अरे क्या यार हमकोतो मटकेने दे दिया झटका।' साला आठ दिनसे उलटी पलटी मार रहा है। हिट फिगरही नही मिलता। उसीसे एक दूसरा आदमी कह रहा था, 'अरे यार मैंने कहा नही था, कि आज डबल घर मारेगा। सालेने आज भी दगा दे दिया।

पडोसके मकानमेसे किसीके कराहनेकी दर्दभरी आवाज आ रही थी। मकान केवल नामको ही था। केवल गिरे हुए मकान के कुछ अवशेष ही थे। और उसी मकानसें यह कराहनेकी आवाज आ रही थी। उस होटलमे जमे हुए आदमींओंमेसे किसीने कहा " अरे यार दिखता है बेचारा बहोत बीमार है, शायद नही बचेगा।" तो दुसरेने कहा 'अरे छोड यार दुनियासे हमे क्या लेना देना, बोल आजका हिट फिगर क्या आ रहा है। लेकिन, पहला आदमी दिलमे कुछ तिलमिला उठा। और उसने होटल के मालिक से कहा, 'अरे हरेश बेचारा उस गंगाका बेटा बहोत बीमार है, उसके लिए एक चाय तो ले जा। अरे चल यार कल साला मटकेमे दस रुपये गए। अगर ऐसा रोज दानधरम करता बैठुंगा तो मेरें होटल का दिवाला उठ जाएगा। अगर उसपर तुझको इतना तरस ही आ रहा है, तो निकाल खिसेमेसे चायके पैसे। लेकिन, सब पैसे रातमें मटकेमे चले जानेके कारण उस आदमीके जेबमेभी पैसे नही थे। उसीसे वह चुप होकर चल दिया। फिर वहा मटकेकी चर्चाए शुरु हो गयी।

उस मकानमेसे कभी रोनेकी आवाज आती कभी कराहनेकी। लेकिन उस करुण दृष्यकी ओर किसीका ध्यान नही था। हरेक अपनी अपनी ध्यानमे मस्त था। उस मकानमें गंगु अपने बीमार बेटेके सिरहाने बैठे रो रही थी। उसका एक दुसरा लडका और लडकी उसे रोते देख खुद भी रो रहे थे।

गंगुके तीन बच्चे थे। एक बीस बरस का बेटा, दुसरा बारह साल का बेटा और एक दस सालकी बेटी थी। गंगा का बडा बेटा जो बीस बरस का था तीन दिनसे बीमार था। शायद उसे कुछ पेटमें बीमारी थी। लेकिन उसके दवा पानीकेलिए उसके पास पैसे नही थे। नही वह बीमार बेटा उठ सकता था, न बैठ सकता था। पेटमे बडें जोरसे दर्द होनेके कारण कराह रहा था।

गंगा का पती मरे तीन साल हो चुके थे। वह अबतक अपने इस बच्चोंका तीन चार घरके बरतन मांजकर किसी तरह निर्वाह कर रही थी। अब बडा बेटा हाथको आ गया था। वह भी अब किसीके खेतकी

